## नोटीस

रा. रा. हरी तनु सोमवंशी, वतनदार महार राहणार शेगांव तालुका खामगांव

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मला माहेरींच ठेविलें आहे. तुह्मांला मजबरोबर संसार करिता येण्यासारखी वस्तुस्थिती नाहीं. मला उगीच नाडवूं नये. मी संसार करण्याला तयार आहे. पण ना इलाजास्तव विनंती करीत आहे कीं मला लग्नाच्या बंधनातून मोकळें करावें, आणि फारकत देऊन माझा मला दुसरा संसार उभारण्यास परवानगी द्यावी. परमेश्वर कृपेनें आपला व माझा संसार जुळेल तर फार उत्तम आहे. नाहींतर मला मोकळी करावी. ही नोटीस पोचल्यातारखेपासून ८ दिवसांचे आंत कायतो निकाल कायमचा करावा तशी गोष्ट न घडेल तर तुमची मुक्तता हीच मुक्ती फारकत समजेन आणि रितीप्रमाणें दुसऱ्या दुनियेदारीची तजवीज जातीच्या पंचामार्फत करीन कळावें ता० २१ मे १९१२ ई.

सही

भागीरथी मर्द हरी सोमवंशी
निशाणी बांगडी

नो. नं. २८०

## नोटीस

नोटीस बेशमी कादरअलीखा वा सवाईखा रा० कसबे रिसोड ता० वाशीम जि० आकोला

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते की माझे नांवचे ताबेगहाणखत ४९० रुपयाचे तुमचे जवळ असून त्यांचे करारचीं मुदत हल्ली संपली त्याचे रुपये तुह्मास देत असतां तुह्मी ते घेतले नाहींत तरी या नोटीसीनें तुह्मांस अगाऊ कळविण्यांत येते कीं सदर्हू रुपये ४९० आह्मी लादुराम बोदुलाल मारवाडी दुकान रिसोड याजपाशीं धरवर ठेविले आहेत ते १९ दिवसांचे आंत घेऊन सदर्हू गहाणखताची पावती द्यावी व गहाण माल 'शेते' खुले करून द्यावे असे न केल्यास सदर्हू गहाण असलेले शेताचे स्वामित्व रुपये २०० दरसाल नुकसानीबद्दल तुह्मास द्यावे लागतील व सदर्हू रुपयाचे व्याज आणि नोटीसीचा खर्च वरील स्वामित्वासुद्धां कोर्टांत फिर्याद करून तुह्मापासून वसूल करून घेऊं कळावें ता० २२ माहे मे १९१२

द० बाजीराव गोविंद मराठे रा. रिसोड

सही

महेमुदखा वा आलीयारखा
रा. रिसोड नि. रेघ

नो. नं. २८१

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मण वा जयराम आप्पा रा. सिर्ले 'नेमान्याचे' ता. बाळापूर पो. चानी व दवलतराव तुळजाजी देशमुख उमरेकर ता. बाळापूर पो. चानी

यांस:—

खालीं सह्या करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे पासून मौजे सिर्ले येथील शेते सर्वे नंबर २०२ एकर २२ गुंठे ३४ आकार रुपये ८॥ याचे खातें लक्ष्मण जयराम आप्पा यांचे नांवें असून ते शेते आह्मी दवलतराव यांचे जवळून तारीख २८ मे सन ११ इ. शेत खरेदी घेतलें त्या दस्ताऐवजावरून आह्मी तुह्मास नंबर नांवें करून देण्याबद्दल सांगितलें परंतु तुह्मी देत नाहीं व दोन चार वेळ पंचासमक्षही तुह्मास ह्मटले आहे. तरी तुह्मी ऐकत नाहीं. ह्मणून तुह्मास नोटीशिनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून १९ दिवसांचे आंत नंबर नांवे करून द्यावा जर याप्रमाणें न केल्यास आह्मी योग्य तजवीज करून व दाव्याचा खर्च व नोटीशिचा खच कोर्ट मार्फत भरून घेतला जाईल कळावें तारिख २६-५-१२

सही

देवमन सुपाजी पाटील द. खु.
चापा वा जमना लवाणी रा.
सिर्ले नि. आंगठा

नो. नं. २८२

## नोटीस

नोटीस दगडु वा भगवान मानभाव राहणार आलेगांव ता० बाळापूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी बहीण नामे सजी मर्द दगडु ही तुमची लग्नाची बायको आहे. लग्नास सुमारे १५ वर्षे झाली ती शाहणी होण्यास २ वर्ष झाली त्याउपर तीला मी तुमचे घरीं आणून घातले ती आपले येथें साहा महिने नांदली. मग आह्मी तिला दिवाळीकरितां आणली. त्यावेळेस तिनें असें सांगितलें कीं मी जशी येथें आहे तशी सासरीं आहे. ह्मणून माझा कांहीं जनरीतीप्रमाणें संसार नाहीं. इतके तिचे ह्मणणें आह्मी खोटे समजलों. कांहीं दिवसानंतर तुह्मी आमचे घरीं पाहुणे आले त्यावेळेस तुह्मी ह्मटले कीं आमचे कुटूंब पाठवावे त्यावेळेस तुमच्या बायकोनें तुह्मास असे ह्मटले कीं मला नेऊन आपण काय करणार? त्यावेळेस तुह्मी सांगितले कीं नांदविण्यास घेऊन जातो. मग तुमच्या बायकोनें सांगितले कीं तुमच्यामध्यें पुरुषत्व नाहीं ह्मणून मी नांदत नाहीं. खरे खोटे करण्याकरितां माझा भाऊ व पंच मिळून तुमचे पुरुषत्व पाहण्याकरितां घेऊन गेले त्यावेळेस आह्मास चारपंचासमक्ष अशी खात्री आली कीं तुमच्यामध्यें पुरुषत्व नाहीं. ह्मणून आपल्यास फारकती मागितली असतां आपण फारकतीही देत नाहीं करितां या नोटीशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तिची फारकती द्यावी. आपण न दिल्यास हीच नोटीस फारकती समजून मी तिला दुसरा घरठाव करून देईन मग तुमचा तिच्यावर नवरेपणाचा व कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळावें ता० २८-५-१९१२

सही

व्यंकट वा दतु मानभाव राहणार
देगांव द० खु०

नो० नं० २८३

## नोटीस

नोटीस बेशमी गुलामनबीखा वल्द अलीबहादरखा रा० बऱ्हाणपूर व सारोला ता० बऱ्हाणपूर जि० खांडवा यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमचे जवळून आज अंदाज साडेसहा वर्षें झाली ७०० रुपये कर्जाऊ घेतले होते. त्या रुपयाबद्दल मी माझे मालकीचे शेत सर्वे नंबर ८९ कोथळी येथील गहाण ठेविले होते. त्या रुपयास दरमहा दरशेंकडा आठ आण्याप्रमाणें व्याज होतें. ते रुपये देण्याचा करार आपण असा करून घेतला होता कीं दरवर्षीं १०० रुपयाप्रमाणें देऊन ७ वर्षांत सगळी फेड करावी. त्याप्रमाणें मी तुमचे सांगण्यावरून तुमची लग्नाची बायको सरदारबी इच्या अन्नवस्त्रा करितां २०० दोनशें रुपये व त्याचे व्याज १२ बारा रुपये दिलें आहे. व पुढें कांहीं कारणावरून रुपये देण्यांत आले नाहीं. आतां एक महिन्यापासून आह्मी तुमचे रुपये घेऊन येत असतो पण आपण रुपये घेत नाहीं. यावरून तुमचा विचार शेत घेण्याचा दिसत आहे. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आपण ही नोटीस पावतांच १५ पंधरा दिवसांचे आंत येऊन आपले रुपये घेऊन जावे. न नेल्यास मी आपल्यास त्या रकमेचें व्याज देणार नाहीं व कदाचित् आपण फिर्यादी वगैरे केल्यास मी कोर्टखर्च वगैरे न देतां आपले आज मित्तीस झालेले रुपये तुह्मी सांगाल त्या इसमास अगर तुमच्या बायकोस देऊं. व आपचे गहाणखत परत घेऊं कळावें. २९।५।१९१२ इ०

सही

महमदइस्माइलखा वा॥ ममसांखान
दस्तुरखुद.

नो० नं० २८४

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. सिताराम वल्द लक्ष्मण थोरांत रा० चिखलगांव ता० आकोट पो० पातूरशेखबाबू यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आह्मी बायकामाणूस सबब आह्मी तुजला सालीना ५० रुपये देण्याचा करार करून आमची शेतें वहाण्यास ठेविलें त्यांस आज सुमारें ५।६ वर्षें झालीं. आजपर्यंत तुझे आमचे ठरल्याप्रमाणें तुझ्या तनखेच्या पैशांत लग्न करून दिलें त्यास दोन वर्षें झालीं. आज मित्तीपर्यंत लग्नाचा हिशोब केला, त्यांत तुजकडेस आमची बरीच बाकी फिरत आहे. तूं आमच्याशीं लग्न झाल्यापासून इमानानें इतबारानें वागत नसून आमचे मालाची नासधूस करीत आहेस. सालमजकूरी ढोरागुरांचा कडबा गवत वगैरे सुमारें १०० किंमतीचा तूं आमचे अपरोक्ष दुसऱ्यास विकून त्याचे आलेले रुपये आह्मास दिले नाहीं तरी ह्या नोटीशीनें तुजला असें कळविण्यांत येतें कीं आह्मी आमचे मुखत्यार रावजी जानजी गवळी पाटील रा० सिंदखेड याजकडे ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत जे नुकसान तूं केलें आहेस तें व तुजकडे लग्नासंबंधीं खर्च झाल्याची बाकी देऊन हिशोब चुकता करून पावती घ्यावी. शेतांत वावरण्याची तुजला मनाई केली आहे. तरी याप्रमाणें न वागल्यास आमचे गडी माणसास अगर इसम मजकूर मुखत्यार यांस हरएक विषयीं हरकत केल्यास कायदेशीर तजविज केली जाईल. त्यांस होणारा खर्च व या नोटीशीचा खर्च तुजला देणें भाग पडेल. कळावें. ता० २४।५।१२

सह्या

राधाबाई मर्द सखाराम थोरांत निशाणी बांगडी.

मनुबाई मर्द सखाराम थोरात निशाणी बांगडी.

तर्फे सीवराम नारायण दस्तुर खु:द.

नो० नं० २८५

## नोटीस

गंगा ज्यान्हवीसमान अंबाबाई जवजे गोविंदगीर गोसावी राहणार मंडारजी ता० बाळापूर जिल्हा आकोला

इस —

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची साक्षांत चुलती कैलासवासी लक्ष्मीबाई जवजे माधोगीर गोसावी राहणार बोरगांवमंजू ता० जि० आकोला इची तूं साक्षात मुलगी आहेस आमची साक्षात चुलत बहीण आहेस आमच्या चुलतीकडून आमची वाडिलोपार्जित स्थावर जंगम इस्टेट हल्लीं तुझे कबज्यांत असून तूंच उपभोग घेत आहेस तुला कन्यापुत्र संतती नसल्यामुळें सदर्हु स्थावर जंगम सर्व जिनगीचे आह्मी पूर्ण हक्कदार असून मालक आहो तुझे हिनहयातीपर्यंत आह्मी सदर्हु स्थावर जंगम जिनगी घेऊं इच्छित नाहीं. हल्लीं आमचे हक्काचे मालकीची इस्टेट विक्री करण्याचे इरायांत आहेस व कांहीं विक्री केली आहेस असे आह्मांस समजले करितां या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं सर्व स्थावर जंगम जिनगी उतन्नासुद्धां कोठें गहाण व खरेदी किंवा फुकट तुला कोणतेच रीतीनें देण्याचा कांहींच हक्क नाहीं. दिली असल्यास किंवा देत असल्यास सदर्हु जिनगीवर घेणाराचा हक्क मुळींच समजला जाणार नाहीं. करितां या नोटिशीनें कळविले आहे तूं कोणतेच तऱ्हेची विल्हेवाट केल्यास आमच्या नजरेस येईल तर आह्मी योग्य कोर्टांत दावा करून नुकसानीसुद्धां व या नोटिशीच्या खर्चासुद्धां भरून घेतले जाईल. कळावें ता० २७-५-१२

सही

लक्ष्मणगीर गुरू बुवगीर गोसावी
राहणार बोरगांवमंजू ता० व जि०
आकोला द० खु०

नो० नं० २८६

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

सौंदर्य

आरोग्य

थोडा खर्च

जेव्हा तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखांना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात, पशांतव्रण, पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभैरी मेहरी, बद, फोड, चट्टे, आंगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

## तर स्वतःचाच राजवैद्य बनून

रोग नष्ट करणें

बरें नव्हे काय ?

डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

# सार्सापरीलानें

ते निखालस बरे होतात.

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

## अनुभवतर पहा.

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तम गुणास ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

## बालामृत हें काय आहे ?

अस्सल बालामृत हें

मुलांना आरोग्य देणारें आहे

तें पुढील रोगांवर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, खोकाळी, शौचालू घाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे.

डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें.

इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊं नका.

किं. ०।२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २।८।९

पत्ता:--हिंदु फार्मसी मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नो. नं. २८७

---

# इराणी बल

मोटारगाडी अटकावितां येते

( जोर ) साखळदंड तोडितां येतो !

## इनाम रुपये ५०० !! इनाम रुपये ५०० !

प्राचीन इराणच्या रुस्तम व अस्पाद यार वगैरे बहादुर पहिलवानांची शक्ती ज्या योगानें जगविख्यात झाली तीं औषधें आह्मी हजारों मैलावरून आणलेलीं आहेत. गंधक सोडा दोन वस्तूंचे कुशलतेनें समिश्रण केलें ह्मणजे ज्याप्रमाणें फुलपावर दारू (Gun Powder) बनते त्याप्रमाणें सालममिश्री, दाडें, बदाम, पिस्ते, डाळिंब, सफरचंद वगैरे अत्यंत शक्तीवर्धक पदार्थांचें सत्व आह्मी शास्त्रीयरीत्या यंत्रानें बनविलेलें आहे. या पांच सात मेव्याच्या कुशल समिश्रणानें विद्युतशक्ती व जोर इतका उत्पन्न होतो कीं कसाही कमताकद मनुष्य असला तरी त्यांस तीन दिवसांत शक्ती येऊं लागते दहा बारा दिवस हे खाल्यावर चेहऱ्यावर लाली चढूं लागते [illegible] ताकद पुन्हां येते. याच्या योगानें धातुपुष्टीही होते. वृद्ध तरुण, स्त्री पुरुष या सर्वांस ही फायदा देणारी व मजेदार वस्तू आहे. दोन महिनें आमच्या सांगण्याप्रमाणें जर याचे सेवन झालें तर मनुष्य मोटारगाडी अडवूं शकेल व साखळदंड तोडूं शकेल खात्री पटविण्याकरितां हा जगविख्यात फळांचा मेवा आह्मी समक्ष तीन दिवस फुकट खावयास देऊं या आमच्या मेव्यांत तांबे, पारा रुप्याचा भाग वगैरे रासायनिक द्रव्यें आहेत असें जो कोणी सिद्ध करील त्यास ५०० रुपये बक्षीस देऊं किंमत एक तोळ्याची २॥ रुपये हें पंधरा दिवस पुरतें. ॥. अर्धो रुपये १।=

बादशाही गोळीः—

१ गोळी खाल्यानें टिकाव व ताकद माहीती पडतेः— किंमत १॥ रु. एक डझनची

## इराणी मर्दानी पट्टी.

या एकट्या पट्टीच्या योगानें मुंबईत हजारों माणसांना फायदा झाला आहे. ज्या माणसाच्या (नसामध्यें) ताकद नाहीं. त्या माणसानें ही पट्टी सहा सात दिवस बांधली ह्मणजे यास जवान मनुष्याप्रमाणें ताकद येते. यापासून आग होत नाहीं किंवा फोड येत नाहीं जर कोणास या औषधाबद्दल भरंवसा नसेल तर आह्मी कान्ट्रक्ट करून हें औषध पैसा घेतल्याशिवाय त्यास देऊं गुण आल्यावर पट्टीची किंमत व बक्षिस निराळें घेऊं किं. १० पट्टीची रु. ९ व पांच पट्टीची किं० रु. ३

---

खानदानी हकीम-सय्यद जाफर हुसेन तबरेजी ( इराण )

जाफरी दवाखाना जे जे. इस्पितलचे समोर जितेकराच्या नव्या बिल्डिंगच्या शेजारी पहिला माळा, मुंबई जाफरी दवाखान्यांत. नो० नं०१५७

---

ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[ १८६९ ]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

भांडवल तेरा कोटी रुपये.

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे व वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड नो. नं. १३

---

# Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered No. N.4

# वऱ्हाडसमाचार.

## Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला— सोमवार तारीख १० माहे जून सन १९१२ ई० [ अंक २३

### वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

### नोटिशीचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्य.केची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अग-त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप-याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९$\frac{३}{४}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. Phillips.
आकोला २१·९·१० } एजंट
नो० नं० २

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख क्षोभ, हानी जीवन मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापारमें किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काममें कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा ≈। रुपयेमें भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा प्रत्र मौजुद हैं, विशेष परिचय के अर्थ ⌐॥ आना का टिकट भेजकर सूचीपत्र मगां लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्मा
नं ४ चित्तीखाना आगरा.

### निराश्रित बाल रक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनर्विवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्याही पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्या-मुळें त्याना कितीं दुःखे सोसावी लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार,. व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व. घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्ये-कांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टी विषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनु-मान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निरा-श्रित बालरक्षण गृह** स्थापन केले आहे भाड्यानें घेतलेले घर केव्हां सोडावे लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेले घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १९-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. २९०

### खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.

यांचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | " | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाल | " | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | " | १ |
| नागाच्या गोळ्या | " | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | " | ७ |
| खोकल्याच्या गोळ्या | " | २ |
| पोलादभस्म | | ३ |
| लक्ष्मी विलास | " | १·५ |
| त्रिभूवन कितीं | " | २ |
| श्वास कुठार | " | २ |
| सुवर्णमालनीवसंत | " | ६॥ |
| लघुमालनीवसंत | " | २ |
| समिर पन्नग | " | ५ |
| रससिंदुर | " | ३ |
| चंद्रोदय | | १५ |
| हिंगाष्टक चुर्ण | बाटली | ०≈ |
| डोळ्यांचें औषध | " | |
| मोठी | " | ।= |
| लहान | " | -+- |
| लिनिमेंट आयोडिन | " | .॥. |
| टि. आयोडिन | " | ।= |
| महावातास्त्र तेल | " | |
| मोठी | " | ॥≡ |
| मध्यम | " | ।-॥ |
| लहान | " | ⌐≡ |
| उसाचा शिर्का | " | ।≡ |
| मध बाटली. | | |
| मोठी | " | ।= |
| लहान | " | ⌐=॥ |
| पिंनसावर तेल | " | .॥. |
| ग्लिसराईन बाटली. | | ⌐≡ |
| गजकर्ण अर्क | " | ।= |
| गजकर्ण मलम | " | ⌐=॥ |
| शंखद्राव. | तोळा | .॥. |
| कुंचल्यादि वटी | " | .॥. |
| हिंगणबेटाचे तेल | " | ०= |
| नारायण चुर्ण | " | ०= |
| इच्छाभेदी जुलाब डझन | | ०= |
| गृहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | " | २ |
| शितोपला चुर्ण | " | ०= |
| पोपचिंच्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | " | ०= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.
ता. १।१।१२
जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला

### एका नांगराची किंमत १००००

जर किर्लोस्कर बंधूंनीं एकच नांगर तयार केला तर त्याची किंमत दहा हजार रुपये होईल.

#### कारण.

जेव्हां आपल्या कारखान्यांत किर्लोस्कर बंधु लोखंडी नांगर तयार करितात. तेव्हां त्याच्या-साठीं जगांतील अत्यंत अधुनिक यंत्र सामुग्रीचा उपयोग केला जातो. व त्याबद्दल होणाऱ्या खर्चाकडे काडीमात्र लक्ष दिलें जात नाहीं. परंतु हजारों नांगरावर हा मोठा खर्च सारखा वाटून गेल्यामुळें आपण जाणतच आहा कीं योग्यतेच्या मानानें नांगराची किंमत अतिअल्प होय.

दुसऱ्या कोणत्याही आउतांबरोबर आमच्या आउतांची तुलना करा. साधेपणा, मजबुती, उपयुक्तता व किंमत या गोष्टी लक्षांत धरून आपल्या मनास जो माल उतरेल तो विकत घ्या.

सचित्र क्याटलॉग नंबर 'ब' ची मागणी करा. त्यामध्यें आपणांस प्रत्येक आउताची सविस्तर माहिती सांपडेल.

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध
जिल्हा सातारा).
नो० नं० २८८

### सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रिया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगारि, वतसिोआमूशण, वस्त्रतआदनमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, टपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुदे भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशी-करण मुर्दा विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडी
अलीगढ.
नो० नं० १९

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पहावा खात्री न पटल्यास पैसे परत.

-पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोलें

वऱ्हाडसमाचार.

ज्येष्ठ वद्य १० शके १८३४ परिधावी

## देशाचार आणि आरोग्य.

आमच्या देशाचें अतिशय मोठें नष्टचर्य ह्मणजे आमच्या समाजोन्नतीचा मूळ पाया नाहींसा होऊन भलत्याच पायावर तिची उभारणी होऊं लागली आहे ही गोष्ट होय. आमचें वाङ्मय ध्या, आमची राजकीय सुधारणा ध्या, सामाजिक सुधारणा ध्या, शिल्पकला ध्या, सर्वांचा पाया आमची मूलप्रकृति असावयास पाहिजे, पण तिची विस्मृति होऊन पाश्चात्य वाङ्मय, पाश्चात्य समजुती, पाश्चात्य आचारविचार, व पाश्चात्यकला यांनीं तो पाया मरून काढण्याचे प्रयत्न झाले. आरोग्याच्या बाबतींत सुद्धां हाच प्रकार दृष्टीस पडतो. आमचें जुनें हल्लींच्या काळाला अनुरूप नसलें तरी तें आमच्या प्रकृतीला हितावह ठरलें होतें, आमच्या अंगवळणीं पडलें होतें. त्यांत योग्य त्या सुधारणा केल्या असत्या ह्मणजे काम झालें असतं. पण तें घडलें नाहीं. मूळचें अगदीं सुटलें, आणि आमच्या कृतीला अगदीं विरुद्ध अशा पायावर नव्या सुधारणेची उभारणी झाली. येथें सगळें चुकलें. कोणत्याही देशांतल्या लोकांचे आचार व त्यांचें आरोग्य यांचा अन्योन्य निकट संबंध असतो. आमचे देशाचार आमच्या लोकांच्या आरोग्याशीं इतके संबद्ध होते कीं पहिले सुटल्याबरोबर दुसऱ्याची खराबी तत्काळ झाली. पूर्वींच्या लोकांचा नेम होता कीं सकाळीं ब्राह्ममुहूर्तावर उठावें, प्रात:स्नान करावें, व थोडा व्यायाम करावा. सूर्योदयाच्या पूर्वीं उठणें हें आरोग्याला फार हितकर असतें, इतकेंच नाहीं, तर मग सगळ्या दिवसभर माणसाचे अंगांत काम करण्याला उत्साह व उमेद वाटते. उष्णदेशांत सकाळीं उठणें हें कष्टप्रद नसतें व प्रात:स्नानानेंही अपाय होण्याचा संभव नसतो. शीतप्रधान पाश्चात्य देशांत सूर्योदयापूर्वीं निजून उठणें हितावह नाहीं असें पाश्चात्य वैद्यक सांगतें. तेव्हां तिकडे उशीरा उठण्याचा देशाचार आहे तो योग्यच ह्मटला पाहिजे. पण आमच्या लोकांनीं आपली जुनी रीत सोडून पाश्चात्यांची रीत कां उचलावी व सूर्यवंशी कां बनावें तें कळत नाहीं. सकाळीं उठल्यावर उष्ण चहा पिण्याचें कारण वस्तुत: आह्मां लोकांस बिलकुल नाहीं. पाश्चात्य पितात ह्मणून आमचे लोक पिऊं लागले व आपल्या शरीरांची हानि करून घेऊं लागले. पूर्वींच्या आमच्या लोकांची राहणी किती साधी असे. पर्णकुटीसारख्या कच्च्या व श्रीमंतांनीं पक्क्या विटांच्या घरांत राहावयाचें. त्याच्या ऐवजीं आतां फ्याशनेबल बंगले आले. साधी भुई वारंवार झाडून सारवून स्वच्छ ठेवतां येत असे. आतां थंडगार फरशी व त्यावर म्याटिंग वगैरे प्रकार आले. म्याटिंग वर्ष सहामहिन्यांनीं एकदां काढावयाचें. मग त्याच्या आंत धूळ, मळ वगैरे शिरतील आणि रोगोत्पादक जंतु ठाणें देतील यांत काय नवल आहे? फरशी रोज धुतली तरी रोगजंतूंचा नाश करण्याचें सामर्थ्य जसें गोमयाच्या अंगीं आहे तसें साध्या पाण्याच्या किंवा फिनाइलच्याही अंगीं नाहीं. शिवाय ताज्या शेणाइतकीं स्वस्त व सुलभ अशीं फिनाइल किंवा क्यारबॉलिक लोशन हीं द्रव्यें नसल्यामुळें श्रीमंताशिवाय इतर फारच थोडे लोक त्यांचा उपयोग करतात. बहुतेक लोक शेणानेंही सारवीत नाहींत व लोशनही टाकीत नाहींत. याचा परिणाम हानिकारक झाला तर त्यांत काय मोठेंसें आश्चर्य आहे? पूर्वींचे आमचे कोळ स्नान केल्याबरोबर आपापलीं धोतरें स्वत:हातानें धूत, व घरांतलें पाणी भरीत. बायका दळणकांडण घरचे घरीं करीत. त्याच्या योगानें आयता व्यायाम होऊन संसार गरिबीनें करतां येत असे आतां मध्यम स्थितींतल्या लोकांना स्वत: धोतरें धुणें, पाणी भरणें व बायकांनीं दळणकांडण घरीं करणें हें आपल्या दर्जास कमीपणा आणणारें वाटतें. एकीकडे गरीबी वाढत चालली आहे ह्मणून ओरड करावयाची, आणि इकडे पाहावें तर विलास वाढत चाललेलें. हा विरोध आमच्या लोकांच्या--विशेषत: सुशिक्षितांच्या ध्यानांत कसा येत नाहीं याचें आश्चर्य वाटतें. पूर्वीं व्यायामाबरोबर गृहकृत्यें फुकट होत त्या जागीं आतां व्यायामालाही पैसे पडतात आणि गृहकृत्यें महाग मजुरी देऊन करून घ्यावीं लागतात. फुकटचे नमस्कार घालण्याची आमची संवय गेली, आणि तिची जागा आतां महाग मोलाचे डंबेल व डेव्हेलपर यांनीं पटकाविलेली आहे. पण तें आमच्या लक्षांत येत नाहीं, किंवा आह्मी तिकडे मुद्दामच दुर्लक्ष करतों. कधीं चतुर्थी ह्मणून, कधीं एकादशी ह्मणून कधीं सोमवार ह्मणून किंवा कांहीं व्रतांच्या निमित्तानें आमचे लोक उपास करून शरीरांतलें अजीर्ण नाहींसें करीत. या उपासांच्या मुळाशीं धर्मश्रद्धाही असे. धर्मश्रद्धा गेली तर जावो, पण निदान आरोग्याच्या दृष्टीनें तरी या उपासांचा फार उपयोग होता. आतां उपवासही राहिले नाहींत. तेव्हां तो उपयोगही अर्थात त्यांच्याबरोबर गेला. मग अजीर्णाला घालविण्यासाठीं डाक्तरचीं टिकचरें आणि मिक्श्चरें यांच्या शिवाय आह्मां लोकांना अन्य गति उरली नाहीं यांत आश्चर्य नाहीं.

अशीं आणखीं हवीं तेवढीं उदाहरणें देता येतील. पण विस्तारभयास्तव देत नाहीं. आमच्या ह्मणण्याचा इत्यर्थ हाकीं आमचे देशाचार जे पिढ्यानपिढ्या चालत आले आहेत ते उगाच निरर्थक आहेत असें समजूं नको. ते आमच्या हिताचे होते ह्मणूनच अनुवंशपरंपरेनें चालत आले. वाईट होते, हानिकारक होते ते आह्मी वेळोवेळीं टाकीतच आलों. तसे आमच्या जुन्या आचारांत सध्याच्या कालमानानें जे वाईट--अपायकारक--असतील, ते खुशाल सोडा. पण सगळेच त्याज्य समजून त्यांचा अनादर करूं नका. त्यांच्या पायावर तर आमच्या समाजाची प्रकृति अवलंबून आहे. तो मूळचा पाया निष्कारण खणून काढून त्याचे जागीं आमच्या प्रकृतीशीं विसंगत असे पाश्चात्य आचार तुह्मी घेऊं लागला तर त्यासारखी हानि कोणतीही नाहीं.

---

## आरोग्यखात्या संबंधीं नवा सरकारी ठराव.

हिंदुस्थान देशाच्या आरोग्याच्या सुधारणेकडे सरकारी अधिकाऱ्याचें लक्ष विशेष प्रकारें अलीकडे लागलें आहे ही फार संतोषाची गोष्ट आहे. या संबंधांत नुकताच एक सरकारी ठराव बाहेर पडला आहे. या ठरावानें आरोग्यखात्यांतल्या अधिकाऱ्यांचे हातांत अधिक सत्ता देण्यांत आली असून त्यांची संख्याही वाढविण्यात आली आहे. ज्या ठिकाणीं अशा अधिकाऱ्यांची संख्या पुरेशी नाहीं त्या प्रांतांत नवीन अधिकारी नेमण्यांत येतील त्या प्रांताला एकेक स्यानिटरी कमिशनर नेमावयाचा आहे व तो त्या त्या प्रांताच्या सरकारानें नेमावा असें ठरविण्यांत आलें आहे. त्याच्या हाताखालीं मदतनीस ह्मणून आठ डप्युटी कमिशनर नेमिले जातील. पैकीं दोन बंगालसाठीं, दोन मद्रास इलाख्यांत, दोन संयुक्त प्रांतांत व दोन पूर्वबंगाल व आसाम प्रांत यांचे करितां. आजपर्यंत देशी गृहस्थांना डेप्युटी स्यानिटरी कमिशनरच्या जागा फार करून मिळतच नसत. पण आतां तें द्वार त्यांच्यासाठीं या नव्या ठरावानें खुलें करण्यांत आलें आहे. या डे० कमिशनराचा पगार ९०० रुपयांपासून १००० रुपयांपर्यंत टराढविण्यांत आला आहे. 'तुमची हद्द येथपर्यंतच, पुढें नाहीं' असें जें लायक देशी गृहस्थांना सांगण्यांत येते असे, तें आता डे० कमिशनरच्या जागे पुरतें तरी रद्द झालें आहे ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. आमची खात्री आहे कीं या जागेचें काम सरकारच्या पसंतीस येईल असें करून आमच्यांतले लायक गृहस्थ स्यानिटरी कमिशनरच्या जागेवरचा आपला हक्कही लवकरच शाबीत करतील. या बाबतींत सरकारनें जो सढळपणा दाखविला आहे त्याबद्दल त्यांना आह्मी धन्यवाद देतों.

---

## स्यानिटरी बोर्ड.

लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठीं आजपर्यंत स्यानिटरी बोर्ड होते. पण त्या बोर्डांत कार्यकारी कामदारांची संख्या इतकी अल्प होती कीं या बोर्डाचें अस्तित्वही फारसें कोणाला कळलें नव्हतें. ह्मणून अगोदर कामकरी लोकांची संख्या वाढविणें हें सरकारचें काम होतें. हें काम बहुधा जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जन कडेच असे व त्या अधिकाऱ्याकडे दवाखाने व हॉस्पिटलें यांची तपासणी, व तुरुंगांतल्या कैद्यांचें स्वास्थ्यरक्षण या दोन्हींचा भार पडल्यामुळें कोणतेंही काम त्याच्या हातून चांगलें होत नसे. यासाठीं या नव्या ठरावानें मोठमोठ्या म्युनीसिपालिट्यांना फर्स्टग्रेडचा व लहान म्युनीसिपालिट्यांना दुसऱ्या ग्रेडचा स्यानिटरी कामदार देण्याचें ठरविलें आहे. एखाद्या म्युनीसिपालिटीला या बड्या आफिसराच्या पगाराचें ओझें सहन झालें नाहीं तर सरकार योग्य ती मदत करणार आहे. स्यानिटरी बोर्डाचा खर्च इत:पर प्रांतिकसरकार व म्युनीसिपालिट्या सोसतील या व्यवस्थेनें शहरांतील लोकांचें आरोग्य सुधारण्यास कांहीं मदत होते कीं काय तें आतां पाहावयाचें आहे. सरकारनें केलेली ही योजना सर्व प्रकारें योग्य आहे यांत शंका नाहीं, व तिच्या योगानें शहरांत आतां अधिक स्वच्छता वगैरे राहून लोकांना आरोग्याचें महत्वही कळूं लागेल अशी आह्मी आशा करतों. पण खेड्यापाड्यांचें काय? त्यांच्यासाठीं कांहीं निराळी योजना करण्याचा विचार आहे कीं काय तें कळत नाहीं. नसेल तर सरकारनें या गोष्टीकडे लवकर लक्ष पुरवावें अशी आमची नम्र सूचना आहे. खेड्यापाड्यांत आरोग्यरक्षणाच्या नैसर्गिक तजविजी शहरापेक्षा अधिक असल्या तरी खेडवळ लोकांचें अज्ञान हा जबरदस्त शत्रु त्याना त्या तजविजींचा योग्य फायदा घेऊं देत नाहीं. तेव्हां या गोष्टीकडे सरकारचें लक्ष लवकर जाईल अशी आह्मी आशा करतों.

---

## चिनांतली अफू.

चीन देशाशीं हिंदुस्थानांतल्या अफूचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनीं त्या त्या व्यापारासंबंधानें सरकारकडे जो अर्ज पाठविला आहे त्याविषयीं लंडन टाईम्स पत्रानें बराच कडक लेख लिहिला आहे असें ह्यटरच्या तारेवरून समजतें. थोड्यावर्षां पूर्वीं या बाबतींत हिंदुस्थान सरकारचा चीनच्या सरकाराशीं करार झालेला आहे व त्या कराराप्रमाणें ठराविक मुदतींत अफू खाण्याचें चिनी लोकांचें व्यसन नाहींसें व्हावें ह्मणून चिनी सरकारानें त्या देशात अफूची लागवड होऊं देऊं नये असें ठरलें आहे. पण या कराराविरुद्ध तिकडे ती लागवड होत आहे, आणि हिंदुस्थान सरकारानें मात्र करार योग्य रीतीनें पाळून अफूची निर्गत अगदीं संपुष्टांत आणिली आहे. यामुळें हिंदुस्थानचें फार मोठें नुकसान होत आहे. यासाठीं सरकारनें चीनला कराराच्या शर्ती पाळणें भाग पाडावें असें अर्ज करणाऱ्यांचें ह्मणणें आहे. वस्तुत: कोणत्याही देशाचें दुर्व्यसन तेथील सरकारनें करार केल्यानें नाहींसें होईल असें समजणें हीच अगोदर चूक आहे. कायदा व्यसनाला कांहीं निर्बंध मात्र घालूं शकतात, पण त्याला निर्मूळ करण्याचें सामर्थ्य कायद्याचे अंगीं नसतें. तें सामर्थ्य शिक्षणांत आहे. व्यसनें वाईट खरीं, पण तीं निर्मूळ करण्याचे व्यवहारिक मार्ग स्वीकारावयास पाहिजेत. तरच कांहीं उपयोग आहे. असो. चीनी लोकांचें अफूचें व्यसन नाहींसें करण्याचें

पवित्र कार्य एकट्या चीनचें नाहीं, तें सर्व मानव जातीचें आहे या व्यापक दृष्टीनें अफूचा व्यापार बंद करण्यापासून हिंदुस्थानचें कोट्यावधि रुपयांचें नुकसान होण्याचा संभव उघड उघड दिसत असतांही हिंदुस्थान सरकारनें मोठ्या तत्परतेनें चीन सरकारशीं करार करून अफूची निर्गत एकदम कमी केली व थोड्याच वर्षांत ती अजीबात बंद करण्याचें ठरविलें. पण चीनसरकारनें कराराच्या शर्ती पाळल्या नाहींत व खुद्द चीनमध्यें त्या मादकद्रव्याची लागवड बिनहरकत चालू आहे.

पार्लमेंटमध्यें झालेल्या या विषयावरील वादविवादावरून असें दिसतें कीं चीन देशांत राज्यक्रांति झाली आहे या सबबी खालीं तेथील सरकार आपल्या शैथिल्याचें समर्थन करूं पाहत आहे. पण खरी स्थिति अशी आहे कीं ही क्रांति होण्यापूर्वीच त्या देशांत अफूच्या लागवडीस प्रारंभ झाला होता. चीनच्या प्रजासत्ताक राज्याचे अधिकारी आपला करार पाळण्यासारख्या स्थितींत नसतील, तर चिनच्या हिताला हिंदुस्थाननें बळी पडावयाचें कीं काय हा प्रश्न अर्थातच उभा राहणार आहे. सन १८१७ पर्यंत चीन मधलें अफूचें व्यसन निर्मूळ होण्याची फार थोडी आशा उरली आहे. उलट चीनमध्यें अफूची लागवड वाढत आहे. तामग हिंदुस्थान सरकारनें तरी कराराच्या शर्ती कां पाळाव्या? चीननें स्वतः अफू पिकविण्याचा सपाटा सुरू केल्यामुळें इकडून गेलेला माल तसा पडून राहिला आहे व हिंदी व्यापाऱ्यांचें कोट्यावधि रुपयांचें नुकसान झालें आहे. आमच्या व्यापाऱ्यांचें येवढेंच ह्मणणें आहे कीं हा पडून राहिलेला माल चीनी सरकारनें स्वीकारून कराराच्या शर्ती पाळाव्या. हें ह्मणणें अगदीं न्यायाचें आहे असें कोण ह्मणणार नाहीं?

## टाइम्स काय ह्मणतें ?

या विषयावर लिहितांना लंडनचें टाइम्स पत्र ह्मणतें कीं चीननें जरी माघार घेतली तरी हिंदुस्थाननें अफू पाठविण्याचें बंद करावें. कां? तर यांनीं आजपर्यंत या व्यापारावर पुष्कळ नफा मिळविला आहे! 'टाइम्स' ला काय? परस्पर हजवायाचे घरावर तुळसीपत्र! पुनः भूतदयेबद्दल सर्वांकडून वाहवा आहे ती आहेच! पण टाईम्सच्या या लेखाचा भयंकर परिणाम होणार आहे. आतांपर्यंत चीनमध्यें दोनतीन परगण्यांतच काय ती अफू पिकविली जात असे. पण आतां ती राजरोस रीतीनें इतर प्रांतांतूनही पिकवितील, आणि आज पंधरा कोट रुपयांचा हिंदी माल चीनमध्यें पडून राहिला आहे तो कुजून हिंदी व्यापारी कराराच्या नांवानें ढळढळा रडतील याची वाट काय? टाइम्सला हिंदुस्थानच्या हिताहिताबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. पण हिंदुस्थान सरकारही हा सगळा प्रकार स्वस्थ बसून पाहणार काय?

## प्रेस आक्ट हवा कशाला ?

लॉर्ड मिंटो साहेबांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानासाठीं जो प्रेस आक्ट झाला त्याची व्याप्ति राजद्रोह व कट नाहींसे करण्याच्याही पलीकडे आहे असें लॉर्ड क्रू साहेबांनीं बोलून दाखविल्या पासून इंग्रजांनीं चालविलेल्या हिंदुस्थानच्या वर्तमानपत्रांत मोठी खळबळ उडून राहिली आहे. या आक्टानें अनेक देशी पत्रांचे एका मागून एक बळी घेतले आणि शेवटची आहुति ह्मणजे 'केसरी' पत्रापासून घेतलेला पांच हजार रुपयांचा जामिन होय. राजद्रोहासारख्या भयंकर प्रसंगीं अशा आक्टांची एखादे समयीं जरूरी लागते पण हल्लींच्या सारख्या शांततेच्या काळांत सुद्धां या आक्टाची जरूरी क्रू साहेबासारख्यांस वाटावी हें आश्चर्य आहे. देशी व इंग्रजी पत्रांना एकच कायदा लागूं करण्याची लॉर्ड क्रू साहेबांची इच्छा आहे ती त्यांच्या मनाच्या समतेची निदर्शक आहे आणि त्याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. पण ही समता दाखविण्यास त्यांना इतर प्रसंग हवे तेवढे आहेत. सर्वांच्या मानेवर या आक्टासारखी तरवार लोंबती ठेवण्यानें ती ज्यास्त व्यक्त होते असें नाहीं सध्याचा काळ दोन वर्षांपूर्वींच्या काळाहून अगदीं निराळा आहे. सध्याच्या काळांत कोणतेंही देशी पत्र सरकार विरुद्ध तोंडसुख घेण्यास तयार नाहीं, मग राजद्रोहाचा फैलाव करण्याची गोष्ट तर दूरच. सध्याच्या काळांत चिरडीस जाऊन सरकाराविषयीं अप्रीति उत्पन्न करणारे लेख लिहिणे आणि पुनः आपल्या राजनिष्ठेचा टेंबा मिरविणें ही गोष्ट आंग्लो-इंडियन पत्रकर्त्यांनाच शक्य आहे. पाहिजे असला तर त्यांच्या पुरता तो कायदा सरकारनें ठेवावा, पण अगदीं गाय झालेल्या बिचाऱ्या देशी पत्रांसाठीं प्रेस आक्टाची तूर्त मुळींच जरूर नाहीं मग तो ठेविला आहे कशाला?

## शोचनीय मृत्यु.

काशी येथील सेंट्रल हिंदु कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. रिचर्डसन हे तां. १ जून रोजीं हृदयाची क्रिया बंद पडून मृत्यु पावल्याची दुःखदायक बातमी आली आहे. डा० रिचर्डसन हे पुर्ण विद्याव्यासंगी आणि विद्यार्थ्यांवर स्वतःच्या लेकरांप्रमाणें प्रेम करणारे असून त्यांचें वर्तन व शील यांची छाप विद्यार्थ्यांवर फार लवकर पडत असे. हे रसायन शास्त्रांत इतके निष्णात होते कीं खुद्द युरोपखंडांत त्यांची कीर्ति आहे असा थोर विद्वान् मिसेस ॲनी बिझांट यांच्या परिश्रमामुळेंच हिंदुस्थानास लाभले होते. पण त्यांच्या अनुकरणीय वर्तनाचा व विद्वत्तेचा फायदा हिंदी विद्यार्थ्यांस मिळतो न मिळतो तोंच दुर्दैवानें यांच्यावर घाला घालून त्यांना आमच्या मधून उचलून नेलें. ते स्वतः ख्रिस्तीधर्माचे असतां त्यांनीं आपलें आयुष्य हिंदु कॉलेजच्या सेवेला अर्पण केलें होतें यावरून ते भूतदयेनें किती प्रेरित होते तें स्पष्ट दिसतें. त्यांचें तैलचित्र नुकतेंच त्या कॉलेजाच्या दिवाणखान्यांत ठेविलें होतें. प्रत्यक्ष मूर्तीच्या अभावीं आतां त्या तैलचित्राकडे पाहूनच विद्यार्थ्यांना आतां उच्च मनोवृत्तीचें शिक्षण घेणें भाग आहे.

## तुर्कस्थानचे पदभ्रष्ट सुलतान.

तुर्कस्थानचे पदभ्रष्ट सुलतान हे हल्लीं सालोनिका येथें बंदिवासांत आहेत. तेथें त्यांचे दिवस कसे काय जात आहेत त्यांचें उत्कृष्ट शब्दचित्र आमचे वाचकांसाठीं गमतीचें ह्मणून येथें देतोः—

सुलतान साहेबांना एका छोट्याशा टुमदार बंगल्यांत सैन्यांच्या पाहऱ्याखालीं ठेवण्यांत आलें आहे. पाहरा सक्त आहे हें सांगावयास नकोच. या पाहरेवाल्यांना उभे राहण्यासाठीं ह्मणून ज्या कोठड्या केल्या आहेत त्याच्या खिडक्यांची अशा रचना आहे कीं कोणत्याही दिशेनें मनुष्य बंगल्याकडे गेला तरी तो दिसावा.

प्रसिद्ध रोमनवक्ता व मुत्सद्दी सिसेरो हा सालोनिका येथेंच कैदेंत होता, व तें ठिकाण येथून जवळच आहे असें सांगतात. सुलतानसाहेब अहोरात्र एकटे बसतात. त्यांच्या चेहेऱ्यावर दुःख, चिंता, व उदासीनता यांचें प्रतिबिंब स्पष्ट उमटलेलें असतें. ज्यानें आजपर्यंत शेंकडों प्राण्यांना केवळ चैनीखातर निष्कारण यमसदनाला पाठविलें त्याला स्वतःला कोणी मागून येऊन आपली मान कापणार नाहींना अशी धास्ती वाटणें स्वाभाविक आहे. न जाणो आपले दिमतीस दिलेले नोकरचाकरच एखादे दिवशीं आपला घात करतील ही भीती त्यांचा रात्रीं देखील डोळ्याशीं डोळा लागं देत नाहीं. सारें जग आपल्यावर उलटलें आहे आणि आपल्या विरुद्ध कट करीत आहे या कल्पनेनें तर त्यांचा सारखां पिच्छा पुरविला आहे. त्यांना लोभ ज्यास्त आहे कीं जीवाची भीती ज्यास्त वाटत आहे हें सांगणें कठीण आहे. त्यांनीं आपल्या डबोल्याच्या रक्षणार्थ आपल्या तुरुंगाच्या भिंती उंच करविल्या, व दारांना आंतून जड लोखंडी अडसर नुकतेच लावविले. ते कोणाची भेट घेत नाहींत. कोणकोणत्या रूपानें येऊन केव्हां आपला घात करील याचा नेम नाहीं असें त्यांस नेहमीं वाटतें.

त्यांची प्रकृति चांगली आहे. नेहमीं एकेजागीं बसून राहिल्यामुळें व व्यायाम नसल्यामुळें अंग सुटत चाललें आहे त्यांची बरदास्तही राजासारखी ठेविली आहे. सालोनिका येथील मुख्य लष्करी कामदार मधून मधून स्वतः येऊन तपासणी करीत असतो. पण बहुधा सुलतानानें निरोप नेण्यासाठीं बोलाविल्याशिवाय किंवा सुलतानाला कांहीं निरोप कळवावयाचा असला तर येतो सुलतानाच्या तैनातीला दोन हकीम आहेत ते पाळीपाळीनें आठवड्यांतून तिनदा सुलतानाच्या समाचाराला जातात. कधीं कधीं सुलतान मुद्दाम त्यांना बोलावतात, पण ते आल्यावर त्यांची भेट घेण्याची लहर निघून जाते. अर्थात त्यांना तसेंच परत जावें लागतें.

कोणतेंही औषध घेण्यापूर्वीं सुलतानसाहेब ते प्रथम त्या हकीमाकडून किंवा नोकराकडून घेवविताात. एकदां सुलतानासाठीं हकीमानें क्विनीन दिलें. तें अगोदर त्या हकीमालाच घ्यावें लागलें. तें घेतांना त्यानें थोडेसें वेडेवांकडें तोंड केल्याबरोबर सुलतानानीं ती बाटली हिसकावून घेऊन मोरींत ओतून टाकिली. जेवतांनासुद्धां अगोदर अन्नाचा एकेक घास नोकराकडून खावविण्यांत येतो. तो घेतांना यत्किंचित अप्रसन्नता दिसली कीं बिघडलें.

सुलतानाची एक चंगी लायब्ररी आहे. तींत जुनीं तुर्की भाषेंतली पुस्तकें आहेत. प्रचलित विषयावरचें कांहींएक त्याच्या पर्यंत जाऊं देत नाहींत. त्यामुळें जगांत काय चाललें आहे त्याचा गंधसुद्धा त्यांना नाहीं व तो मिळावा अशी सुलतानाचीही इच्छा नाहीं.

सहामहिन्यांपूर्वीं त्यांनीं आपलें चारित्र लिहून ठेविलें होतें, पण एके दिवशीं मनाला पश्चात्ताप वाटून तें त्यांनीं फाडून टाकिलें.

अठरामहिन्यांपूर्वीं त्यांच्याच मागणीवरून त्यांना एक लहानशी हत्याराची पेटी आणवून देण्यांत आली होती. त्यांचा उपयोग करून सुलतान साहेबांनीं बसल्या बसल्या दोन मशिदी लांकडाच्या कोरून तयार केल्या.

रात्रीं निजल्यावर कोणी आंत येऊं नये ह्मणून ते आंतून दाराला कुलुप लावून निजतात. बिछान्याची जागा आज येथें तर उद्यां तेथें अशी नेहमीं बदलतात. निजण्याची वेळसुद्धां बदलतात. अशाकरितां कीं अमक्यावेळीं ते निजले असतील अशी खात्री कोणाला देतां येऊं नये.

## हिंदु आणि मुसलमान.

सध्या अनेक ठिकाणीं हिंदु-मुसलमानांचाप्रश्न हा अतिशय महत्त्वाचा होऊन बसला आहे. अशावेळीं महर्षिपदाप्रत जाऊन पोंचलेल्या परलोकवासी न्या. रानडे यांचे या प्रश्नाविषयींचे विचार लोकउत्सुकतेनें वाचतील अशी आह्मां[illegible] आशा आहे. न्यायमूर्ति ह्मणते कीं व्यव[illegible] स्थितरणाची आवड आणि आज्ञाधारक[illegible] हे गुण दोन्हीं जातींत नाहींत. स्थानि[illegible] बाबतींत स्वातंत्र्याची आवड, नागरिकां[illegible] कर्तव्यें करण्यास लागणारे गुण, यांत्रि[illegible] विषयांत बुद्धीची गति, शास्त्रीय शोधां[illegible] हौस, धाडस, संकटांना तोंड देण्या[illegible] तयारी व स्त्रीजातीचीं संकटें निवारण्या[illegible] मर्दपणा या गुणांची सर्वांचे ठायीं मे[illegible] वाण आहे दोघांची ही स्थिति सार[illegible] असल्यामुळें दोघांनींही हातांत हात घा[illegible] उद्योग केल्या खेरीज चालावयाचें न[illegible] एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चि[illegible] दोघांच्या शाळा निरनिराळ्या आणि [illegible] संबंध निराळे असें दूरीकरण होणें [illegible] सारखी शोचनीय गोष्ट दुसरी कोण[illegible] नसेल. किती शहाणपणाचे आणि दृष्टीचे हे उद्गार आहेत!

## आह्मां हिंदूंची धर्म बंधनें

गोवें येथें नुकतेंच निवूं लाग[illegible] 'प्रभात' वर्तमानपत्रांत, वस्तुस्थिति नि[illegible]

या मथाळ्याखालीं सध्याच्या आमच्या धर्माची सद्यःस्थिति फार मार्मिकपणानें वर्णिली आहे. ती अशीः—

सनातनवाद्यांच्या मोहबतीखातर आपण असेंच गृहीत धरूं कीं, आमचा हिंदुसमाज ही वेदपुरुषाची तिसरी पिढी आहे, हिंदुसमाज अतिशय वृद्ध आहे, त्याच्या इतक्या वयाचा समाज पृथ्वीवर दुसरा नाहीं. पण हें गृहीत धरलें, तर ओघानें त्याची वृद्धत्वसुलभ अशक्तता, क्षीणताही कबुल करणें भाग आहे. आणि तशी ती कबूल केली तर मग ह्या ज्ञातान्या राष्ट्रपुरुषाच्या शरिरावर धर्मबंधनाचीं हीं असंख्यात आभरणें आहेत, त्यांची अनावश्यकता कबूल केल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

काय ? हिंदुस्थान सोडून तुह्मी कोठेंही जा, तेथें तुह्मांला हजारों जातींनीं विदीर्ण झालेला समाज, मत्सराग्नीच्या तीव्र ज्वाळा, अनाथ बालविधवांचा कठोर आक्रोश, वेश्यांचा बडेजाव वाढवून खराब केलेली दानत; कोट्यावधि देवतांपुढें मान वांकवावी लागत असल्यामुळें भेटेल त्यापुढें बोरूप्रमाणें वाकण्याची सवय अंधरूढीचा करडा अंमल इत्यादि प्रकार सांपडणार नाहींत. एकाच धर्माच्या अनुयायांत रोटीबेटीव्यवहारास साफ बंदी, नव्हे नुसता एकाचा स्पर्श दुसऱ्यास असह्य वाटण्याजोगा उच्चनीच भाव फक्त हिंदुसमाजातच आहे. ज्या आभरणांनीं राष्ट्रपुरुषांचा एकूनएक अवयव वेष्टिला आहे, तीं अशा मासल्यांचीं दूषणीय लाछनास्पद आभरणें आहेत.

ज्या वयांत सगळें विश्व आनंदमग्न दिसावें, व अमानुष कार्य सुशक्य वाटावें, त्या तारुण्यांत हिंदु जवान किती पेंगळत, निराश, दैववादी दिसतात ? दुसरीकडे पाहिलें तर कोणी दाक्षिणध्रुवाच्या शोधाची पैज उचलीत असलेला दिसतो, कोणी नायगाराच्या प्रचंड धबधब्याचा तोल अजमावतो, कोणी समुद्राचें पैल तीर पोहत जाण्याची उमेद धरतो ! तेंच आपल्या हिंदुस्थानाकडे पहा. कोणी मुमुक्षु बनतो, कोणी ब्रह्मत्रियेवर पुराणें झोडतो, कोणी रामनामाच्या जपानें राष्ट्रोद्धार होईल, असा बुद्धिवाद देतो ! अलौकिक धाडस, असामान्य कर्तबगारी, अलोट महत्वाकांक्षा, राक्षसी कल्पना, हिंदूंच्या डोळ्यांपुढून जातच नाहींत. पण ह्यांत आश्चर्य नाहीं. भेटेल त्याला नमस्कार करावा, दगडधोंड्यापुढें लोटांगणें घालावीं, असलें नेभळट बाळकडू ज्यांला लहानपणीं धर्मानें पाजून ठेवलें, अर्थात धर्मानेंच ज्यांची मान खालीं ठेंचली, रूढीच्या सन्निपातानें ज्यांच्या डोळ्यांवर झांकड पडली, ज्ञातिमत्सराचें विष आंगांत भिनून राहिल्यामुळें एकूनएक अवयव लुळा झाला, अशांच्या हातून काल्पनिक ईश्वराच्या नांवानें टाळ कुटीत बसण्यापलीकडे स्पृहणीय कामगिरी न व्हावी, हेंच साहजिक आहे.

---

## मि० स्टेड यांचा प्रेतात्मा.

'रिव्हयु ऑफ रिव्हयूज' मासिक पुस्तकाचे सुप्रसिद्ध संपादक मि० विल्यम स्टेड हे टिटानिक बोटीच्या अपघातांत सांपडून मरण पावले याबद्दल आज सारें जग हळहळत आहे. अशावेळीं त्यांच्या प्रेतात्म्यानें विलायतेंतल्या एका प्रसिद्ध स्त्रीला जो निरोप पाठविला आहे तो वाचण्याविषयींची उत्कंठा प्रेतात्म्यावर विश्वास नसणाऱ्यांना वाचावासा वाटेल, मग प्रेतविद्येवर विश्वास असणारांस तो तसा वाटेल यांत नवल नाहीं. ह्मणून सदर निरोप आह्मी येथें देत आहों. जिला हा निरोप आलेला आहे ती बाई स्वतः प्रेतविद्येची मोठी उपासिका आहे. हा निरोप प्रथम विलायतेंतल्या 'लाइट' नांवाच्या पत्रांत प्रसिद्ध झाला त्याचा सारांश येणें प्रमाणें.

या बाईला ता० २३ एप्रिल रोजीं एकाएकी असें वाटूं लागलें कीं कोणी प्रेतात्मा येत आहे. कांहीं वेळानें पेन्सिल उचलून आपणांस लिहिण्यास तो लावित आहे असें वाटूं लागलें. ती बाई लिहूं लागली. कांहीं ओळी लिहिल्यानंतर खालीं स्टेड असें नांव आलें. मग तो प्रेतात्मा ह्मणाला— खरोखर मी माझें अंतर्याम तुह्मांस कळविण्यासाठीं आलों आहे. तुह्मांला पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या आहेत. ही माझी विनंति—नव्हे आज्ञा—समजा. किती आत्मे या घटकेस साह्यासाठीं याचना करित आहेत ! मी सांगतों तो त्याचाच निरोप समजा. या माझ्या गोष्टी प्रसिद्ध करण्याचा कोणाला आग्रह करूं नका. मीच या कामासाठीं दुसऱ्यांचें साह्य मागणार आहे. पण तुमची लेखणी तेजस्वी ह्मणून याकामीं प्रथम तुमचें साह्य घेतों.

स्त्री– काय ? गेल्या रवीवारीं तुह्मी माझ्याशीं संभाषण करित होतां काय ?

प्रेतात्मा– होय. तुमचा एक नातलग मला तुमचेकडे घेऊन आला होता. परलोकीं गेलेल्या आत्म्यांचे साठीं—विशेषतः जे आत्मे पापमय व दुःखी अशा पृथ्वीच्या मायापाशांत बंध होऊन राहिले आहेत त्यांच्या साठीं मीं प्रार्थना केली होती. त्यांच्यासाठीं प्रार्थना करण्यासाठीं दुसऱ्याही साधुवर्तनाच्या माणसांस सांगा. अशा कामीं यापूर्वी तुमचें साह्य मला मिळालें आहे. 'लाईट' पत्रांत ही गोष्ट प्रसिद्ध होणें चांगलें आहे. तुह्मी असा घोटाळ्यात कां पडल्या आहां ? माझी इच्छा आहे कीं प्रेतात्म्याबरोबर गोष्टी करणाऱ्या लोकांनीं एकजूट करून आयुष्य असून मृत्यु पावलेल्या अश्यांच्या साठीं प्रार्थना करावी. या लोकांपैकीं कित्येक हंसतां हंसतां परलोकाला गेले. परंतु परलोकीं किती दुःख भोगावें लागत आहे तें सांगतां येत नाहीं. त्यांचें दुःख पाहून माझ्यासारख्याची छाती फाटून जाते. भूलोकींच्या मायेनें अजून त्यांना सोडलेलें नाहीं. त्यांच्या उद्धारासाठीं प्रार्थना करा अशी माझी विनंति आहे. हें माझें संभाषण लवकर सर्वांना जाहिर करा. या लोकांचीं दुःखें तुह्मांला प्रत्यक्ष पाहतां किंवा ऐकतां आलीं असतीं तर तुमचें अंतःकरण खात्रीनें द्रवलें असतें, व त्यांच्या उद्धारार्थ तुह्मी यत्न केले असते.

---

## इजिप्त मधील गडबड.

अलाहाबादच्या पायोनियर पत्राच्या केरो येथील बातमीदारानें इजिप्तच्या सद्यःस्थितीचें जें वर्णन केलें आहे त्यावरून त्या देशांत लवकरच कांहींतरी मोठी गडबड होणार आहे असा सुमार दिसतो. तो बातमीदार ह्मणतो 'येथें (इजिप्त देशांत) बाह्यतः सर्वत्रशांतता दिसत आहे खरी; पण अंतर्यामी मोठी खळबळ उडून राहिली आहे. आमच्यासारख्या पुष्कळ इंग्रजांना येथें आपण एखाद्या ज्वालामुखी पर्वतावर राहिलों आहों असें वाटत आहे. या ज्वालामुखीचा केव्हा स्फोट होईल याचा कांहीं नेम सांगतां येत नाहीं. परंतु कांहीं झालें तरी आह्मास विशेषसें भय बाळगावयाला नको. कारण कीं येथील ब्रिटिश एजंटांनीं सर्व प्रकारचे तरतुदीचे बेत अगोदरच करून ठेविले आहेत.' आमच्या वाचकांना हें ठाऊकच आहे कीं हिंदुस्थानचे माजी कम्यांडर-इन-चीफ लॉर्ड किचनेर हे सध्यां इजिप्तमध्यें ब्रिटिश एजंट आहेत हे लष्करी अधिकारी असतां गतवर्षीं यांची नेमणूक एकाएकीं ईजिप्तमधल्या ब्रिटिश एजंटाच्या जागीं ह्मणजे राजकीय खात्यांत कशी झाली याचें गौडबंगाल त्यावेळीं विलायतेंतल्या चांगल्या चांगल्या जाणत्या लोकांना समजेना. त्यानंतर कांहीं दिवसांनीं ईजिप्तच्या न्यायखात्याचे मुख्य प्रधान रुष्दद पादशहा यानीं आपल्या जागेचा राजीनामा दिला. आणि आतां असें कळतें कीं आपल्या ह्मणण्यास होयबा ह्मणणारें प्रधानमंडळ नेमून राज्यकारभार करण्याचा खेदिव साहेबाचा विचार आहे. मुकाव्यानें पण आपल्या मनाजोगती सगळी व्यवस्था घडवून आणण्याची व तसें करताना अनुल्लंघनीय वाटणारीं संकटेंही अचानक उलथून पाडण्याची हातोटी लॉर्ड किचनेर साहेबाचे ठायीं किती पूर्णत्वानें वसत आहे हें लॉर्ड कर्झन साहेब व ते यांच्या मधल्या वादापासून पुष्कळाना ठाऊक झालें आहे. तेंव्हां बाह्यतः जरी खेदिवाच्या नांवानें सगळ्या राज्यकारभारांतल्या क्रांति होत असल्या तरी त्याचे खरे सूत्रधार कोण असले पाहिजेत या विषयीं चाणाक्ष माणसात मतभेद असण्याचें कारण नाहीं. पायोनियरचा बातमीदार ह्मणतो त्याप्रमाणें ईजिप्तच्या राजकीय भूगर्भाखालीं जी खळबळ चालली आहे तिचें आणखी कोणकोणतें स्वरूप दृष्टीस पडतें तेंच आतां पाहावयाचें आहे.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—अरबी समुद्राकडील वातावरण पर्जन्याला असावें तितकें अनुकूळसें नसल्या कारणामुळें मृग नक्षत्रावर विशेष भरंवसा नाहीं. वारा फारच सोसाट्याचा सुटतो. उष्णकाळांत फरक पडत आहे. रोगराई ह्मणण्यासारखी कोणतीच नाहीं.

श्रीमंत चक्रवर्ती बादशहाच्या ४८व्या वाढदिवसानिमित्त ठिकठिकाणीं महोत्सव झाले. पातुर्डा ता० जळगांव येथील कांहीं मंडळींनीं मिरवणूक, गायनवादन, व्याख्यान इत्यादि आनंदाच्या गोष्टी विशेष थाटानें केल्या त्यात रा. रा. व्यंकटराव सरदेशमुख, दवळे, सोफासे, दुबे वगैरेंनीं पुढाकार घेतला होता.

मेजर फ्रेडन साहेब डिपुटी कमिशनर हे रजेवर विलायतेस या सनांत जाणार असल्यामुळें त्यांच्या जागीं रा. रा. ब्राऊन साहेब अ.सि. कमिशनर यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. गौरीशंकर दुबे, मुनसफ यांस उमरावतीस नेमून रा. रा. विष्णु नारायण बापट एम. ए. एल. एल. बी. आफि. मुनसफ उमरावती हे परत शाळापात्याकडे आले.

रा. रा. साजीराव पोलीस इनस्पेक्टर आकोला व चंदासिंग इन्स्पेक्टर, बुलढाणा यांस अनुक्रमें ३ वर्गाची बढती देण्यांत आली.

**गहूं**—सर्व ब्रिटिश इंडियांत गव्हाचा पेरा जेवढा होता त्याचा शतांश वऱ्हाडांत असून वऱ्हाडच्या दसपटीनें मध्यप्रांतात आहे. वऱ्हाडांतील गव्हाच्या पीकाचा अंदाजा ७९।८० हजार टनाचा असून बुलढाणा जिल्हा या पीकासंबंधानें फार मागसलेला आहे.

**जवस**— गळिताच्या धान्यामध्यें जवस हा राजा असून त्याचें उत्पन्न वऱ्हाडांत गेल्या १० वर्षांत दुपटीनें वाढलें आहे. यंदाचा अंदाजा १९ हजार टनांचा आहे. मध्यप्रांताचें हेंच उत्पन्न १३० हजार टन होईल. हे दोन्ही आंकडे मिळून ब्रिटिश इंडियाच्या एक त्रितीयांश बरोबर आहेत. या पिकाकडे अजून शास्त्रीय पद्धतीनें लक्ष्य दिलें नसून सर्व भर कपाशीकडे आहे.

बाळापूरास बेंच–मॅजिस्ट्रेटाची संस्था असावी आणि तेथें एक मुनसफ कचेरी असावी अशा विषयीं त्या तहशिलीच्या लोकांची स्थानिक सरकारापाशीं प्रार्थना असून त्या संबंधाचा अर्ज करण्याचें घाटत आहे.

**स्तुत्य उपक्रम**—मराठा शिक्षण परिषदेच्या फंडानिमित्त प्रत्येक मंगलकार्यांमध्यें एक ठराविक कर बसवावा ह्मणून वऱ्हाडच्या मंडळीची मनीषा आहे. या सामाजिक ॠणाच्या फेडीचें उदाहरण उमरावती व आकोला येथील तहशीलदारानीं फार चांगलें घालून दिलें आहे.

'गणागोविंद पुस्तकमालें'तलें १ लें पुस्तक दसतलीला हें आह्माकडे आलें आहे त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

---



## जाहिर नोटीस

सर्वत्र ब्रह्मवृंद मंडळीस कळविण्यात येते कीं, श्रीमत् जगत् गुरु आदिपीठ महासंस्थान श्रृंगेरी शंकराचार्य मठाकडून अभीर जाती प्रकरणांत फैसल्याप्रमाणें आह्मी तारीख २३-५-१२ गुरुवारीं येथील गृहस्थ रा. पांडुरंग भालचंद्र टोपले यांचे घरीं स्वामीतर्फे भोजनाची पुढी गांवकरी ब्राह्मणासह केली आहे. भोजनाचा बेत उत्तम प्रकारचा असून पंक्तिला मंडळी ५०-६० होती. फराळाचें बंड मोडून भोजनाची वहिवाट सुरू केली आहे. जे दुराग्रही ब्राह्मण भोजनास जाणार नाहींत, तें जगत्गुरुच्या ठरावाप्रमाणें दोषी ठरविले जातील. कळावें ता० ३१-५-१९१२

सर सुभेदार प्रजाधिकारी वामन

बाळकृष्ण वऱ्हाड व खानदेश

संस्थान श्रृंगेरी हल्लीं मुक्काम

आकोला.

नो० नं० ३१०

## [नो]टीस

रा. रा. [...]र्जी कासनको पारली कंदाटदार लोहारचाळ उमरावती (रेल्वे स्टेशना नजिक यांस—

खालीं सही करणार यांजकडून जाहिर नोटीस देण्यांत येतें कीं माझी आई नामें रुखमाबाई मर्द शामराव मराठे पवार इनें ११-१-१९१२ रोजीं मृत्युपत्र लिहून नोंदून दिलें आणि त्या अन्वयें स्थावरजंगम जिन्नगी आह्मास दिलेली आहे. सदर्हू रुखमाबाई गेल्या मार्च महिन्यांत मरण पावली; तुह्मी विश्वासूक व खात्रीचे गृहस्थ ह्मणून तिनें उमरावती येथील दहिसांतीतील धाब्याचें दुमजली घराची (श्रीखंड्याचे मकाना जवळील) किल्ली तुमच्या हवाली केली आणि दागदागिना किंमत, रुपये अंदाजा ९०० व रोखनगदी रुपये १८० व तुह्माजवळ रुखमाबाईच्या क्रियाकर्माबद्दल तिनेंच ठेवलेले रुपये २०० दोनशे व बँके व्याक बुक नंबर १२ ह्या सर्व वस्तु तुमच्या हवालीं आमच्या व पंचासमक्ष केल्या आहेत व त्यासंबंधी तुमच्या सहीचा कागदही आहे.

सदर्हू घर पूर्वी उमरावतीच्या अंबासंस्थानास देण्याचा संकल्प होता पण तो रुखमाबाई इनें आपल्या शेवटील तारिख ११-१-१९१२ च्या मृत्युपत्रानें रद्द करून सर्व जिन्नगी आह्मास दिलेली आहे.

आह्मी घर व जंगम जिन्नगी ताब्यांत मागण्यास ता० २-६-१२ रोजीं तुह्माकडे समक्ष आलों तेव्हां तुह्मी तुमच्या वकिलांचा सल्ला मिळेपर्यंत काहीं करितां येत नाहीं असा जबाब दिला. वरील गोष्टीला काहीं अवधि लागेल तथापि तुह्मास या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी घर किंवा इतर कोणत्याहि चीजवस्तु आमच्या स्वदस्तुरच्या लेखाशिवाय दुसऱ्या कोणाच्या हवालीं करूं नये. आणि तुमची तुह्मी योग्य कायदेशीर खात्री करून सर्व स्थावर जंगम माल व ब्यांक बुक पंचासमक्ष आमच्या हवालीं करावें. कळावें ता० ३-६-१२

सही

गंगुबाई आई रुखमाबाई मराठे पवार राहणार आकोला द० खु०

(२) हंमीरराव भास्करराव पटवर्धन अज्ञान पालन करणार आई गंगुबाई आई रुखमाबाई.

नो० नं० २९३

---

## नोटीस

नोटीस बेशमी बाबाराव वल्लद आकाजी अ० पा० करणार झाबुबाई मर्द आकाजी रा० व्याळ हल्लीं वस्ती भांबेरी यांना—

खालीं सह्या करणार यांजकडुन नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुमचे पासून तुमचे मालकीचे शेतें, शेत सर्वे नंबर २७८ एकर २३ आकार ३३ याचें खातें सुकदेव यांचे नांवे असून यांतील एक द्वितिअंश हिस्सा पुर्वेकडील आंब्याचें झाडांसहित, व शेत सर्वे नंबर ३६६ एकर २ गुंठे १८ आकार रुपये ९॥ याचे खातें रामजीचें नांवे असून त्यांतील पश्चिमेकडील आठवा हिस्सा व तिसरें शेत सर्वे नंबर २८४ एकर १४ गुंठे ३४ आकार रुपये ११ याचे खातें मुर्यभान याचें नांवे असून यांतील बारावा हिस्सा यदीं भागाचा सदरहु शेतांतील हिस्से आह्मी तुमचे कर्जाबद्दल सावकाराचें कर्ज दिल्यावरून तीं सर्व शेतें तुह्मी आह्मांस ३३१॥ रुपयास ६ वर्षांचे माडेपट्याच्या करारानें दिले आहे त्यावरून आह्मी वरील शेतांची किस्तकारी व खत वगैरे देऊन जमीन चांगली तयार केली आहे ती जमीन चांगली झाली असे पाहून आपण दुसऱ्याच्या ह्मणण्यावरून ती जमीन आह्मापासून काढु इच्छित आहां. व खोटे सांगून आह्मांस फसवित आहा व असें सांगता कीं शेत सर्वे नंबर ३६६ एकर २ गुंठे १८ हे शेत जप्त झाले आहे तरी आपण असे समजावे कीं आह्मी तुमच्या अशा लबाड्यास मुळींच भिणार नाहीं. जरी ते शेत जप्त वगैरे झाले असल्यास त्याची पद्धानें देणारावर जबाबदारी राहते हें आपण मुळींच विसरतां कामा नये आपणास त्याच शेताचे कोणी ज्यास्त रुपये देत असेल तर त्याची किस्तकारी केल्याबद्दल देत असेल. हे आपण पक्के समजावे. जर आपण याउपर आह्मास शेतासंबंधीं अडवूं पाहाल किंवा अडवाल तर आह्मी तुमच्यावर रीतसर काम चालवूं. व याउपर अशी खोटी नोटीस द्याल तर फौजदारींत काम चालऊं कळावें तारीख २९।५।१९१२ इ०

सह्या

ईश्वरदास मंगलदास मारवाडी द. खु.

विठोबा जैराम पाटील तर्फखंडाळ दस्तुर खुद्द.

नो० नं० २९४

---

## नोटीस

नोटीस बेशमी विनायकराव देशपांडे रा० बाळापूर (साहरा) ता० बाळापूर पो० बाळापूर यांस——

खालीं सही करणार यांजकडन नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्माला मौजे कोळासे येथील शेत पांच वर्षांचे करारानें निम्मे बटाईनें वहाण्यास दिलें होतें. तें आह्मी २ वर्षे पर्यंत व तुमचे आमचें मध्यें तंटा वगैरे काही न होतां व्यवस्थेशीर रितीनें आह्मी वाहीलें. आह्मी शेताची किस्तकारी चांगली केली व शेत तयार झाले असे पाहून आपण चौथें पिकाचें वेळीं आह्मांस शेतांतून काढून देऊन सर्व माल वेऊन गेलें व ह्मणालें कीं आजपासून आमचे शेतांत येऊं नये. व आह्मी तुह्मांस शेत देत नाहीं. व तुह्मी आह्मांस नोटीस दिली कीं तुह्मी शेत वहा अगर नका वाहुं आह्मी तुमचें पासून निकाची नुकसानी भरून घेऊं जर आह्मी त्यांतील मालच नेला नाहीं तर नुकसानी काय भरून देणार व आतां ह्मणता कीं तुह्मी शेत वहाण्यास या तर आह्मी शेत वाहण्यास तयार आहो परंतु मागील निम्मे माल अगर त्याची किंमत आह्मांस द्यावी ह्मणजे आह्मी शेत पुनः वाहूं करितां नोटीशीने कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आमचा निम्मे माल अगर त्याची किंमत आणून द्यावी या मुदतींत तुमचे कडून न घडल्यास आह्मी कोर्ट मार्फत योग्य तजवीज करूं. व आपण आमचा माल न देतां शेत तसेंच पडीत पडूं द्याल तर त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. कळावें. ता० ३।६।१२

सह्या

विघू वल्लद गंगाजी माळी रा० कोळासे ता० व० पो० बाळापूर नि० आंगठा.

गणु वल्लद शंकर बेलदार रा० कोळासे नि० आंगठा.

नो० नं० २९५

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र सेट सावकार व इतर लोक यांस व पन्नाबाई जवजे ग्यानासिंग रजपुत राहणार आपोती बु॥ इस:—

खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटीस देण्यांत येते कीं पन्नाबाई जवजे ग्यानासिंग ही माझी आजी आहे तीला पुत्रसंतान नसून तिनें तिची इस्टेट माझ्या नावानें मी लहान असतांच करून दिली आहे. व त्या इस्टेटीवर वहिवाट माझी आहे त्यापैकीं सर्वे नंबर ६१ चे शेत सिताराम वाले. व सर्वे नंबर १९ चे रामकार्टीने या दोन्ही शेतांतील हिस्से गांवातील काहीं विरुद्ध पक्षाचे लोकांचे मतानें ऐकून ती पट्ट्यानें लावूं पाहते अगर त्यावर कर्जही काढू पाहते तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीन आहे. मी तुला अन्नवस्त्रही देत आहे. करितां या जाहिर नोटीशीनें कळवितो कीं तूं या इस्टेटीवर कोणाचे कर्जही काढूं नये व ही शेते कोणास वहितीस देऊं नये. दिल्यास व कोणाचे कर्ज काढल्यास माझी इस्टेट व मी जबाबदार राहणार नाहीं. तिनें कोणास शेते वहीतीस दिल्यास ते कोणी करूनये केल्यास ते रद्द समजले जाईल. कळावें तारीख ४-६-१२ इसवी. सही

मोतीराम गुलाबसिंग रजपुत रा० आपोती बु॥ द० खु०

नो० नं० २९६

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस व शेट सावकार यांस कळविण्यांत येते कीं माझी चुलती नामें सकू मर्द बोंबटाजी तेली साकरकार रा. आगर ता० आकोला इच्या नावानें माझा चुलता नामें बोंबटाजी हा मयत झाल्यामुळें ती जिनगी माझी चुलती नामें सकू मर्द बोंबटाजी इच्या नावानें आहे. तर त्या जिनगीवर ती हयात आहे तोपर्यंत तिनें उपभोग घ्यावा तीला त्या जिनगीवर कर्ज काढण्याचा व गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देण्याचा अधिकार नाहीं. करितां नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तिचा त्या इस्टेटीवर आमचे सही शिवाय गहाण, खरेदी, व बक्षीस घेऊं नये. व कर्जही देऊं नये दिल्यास ते बातल समजले जाईल. व त्याबद्दल ती इस्टेट व आह्मी जबाबदार नाहीं. कळावें तारीख ३-६-१२ इ०

सही

रावजी वा॥ रंजाजी तेली साकरकार दस्तुर खुद

नो० नं० २९७

---

## नोटीस

रा. रा. गुरुदिनलाल वा॥ भोलालाल परदेशी कलाल रा० सावरगांव ता० दारव्हा जि० यवतमाळ यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे उंबर्डेबाजार प्र० कारंजा ता मुर्तिजापूर जि० आकोला येथील तुमचे शेत सर्वे नंबर ४१ एकर गुंठे ७८१ आकार रुपये ७८८ चे सालिम शेत पावणेसाहाशें ५७५ रुपयास मला तीन महिन्यापूर्वी विकत दिलें असून मौजे मजकुरचे बाजारांत पुष्कळ लोकांसमक्ष तुह्मी मजजवळून १० दाहा रुपये इसार घेतला व शेत माझे ताब्यांत दिलें. खरेदीखत वैशाख महिना झाल्यानंतर येऊन करून देऊं असा करार केला वैशाख सपून सुमारे वीस दिवस झाले तरी अजून तुह्मी खरेदीखत करून देण्यास आले नाहीं. करितां तुह्मी नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत येऊन खरेदीखत करून देऊन पैसे घेऊन जावें तसे न केल्यास रीतीप्रमाणें व्यवस्था करणें भाग पडेल. शेताची रक्कम दगडु मनाजी कोल्हे याचे जवळ धरवर ठेविली आहे. रकमेचें व्याज चालूं महिन्यापासून तुह्मास द्यावें लागेल. मुदतींत तुह्मी न आल्यास मला योग्य कोर्टांत दाद मागावी लागेल त्याबद्दलचा खर्च व नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. ही नोटीस दिली सही ता० ३-६-१९१२

सही

विठु वा॥ लक्ष्मण तेली राहणार उंबर्डाबाजार ता० मुर्तिजापूर

नो० नं० २९८ द० खु०

---

## नोटीस

बेशमी रा. रा. जानजी वा॥ रामजी कुणबी गावंडे राहणार सोनागिरी ता० बाळापूर यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला थाप देऊन पीकपट्टा लिहून घेण्याच्या मिषानें बाळापुरास नेऊन पीकपट्याऐवजीं खरेदी लिहून नोंदून घेतली असें आतां मला इतर नातलगाकडून समजून आलें. तुह्मी ६०० रुपये मला दिल्याची खोटीच गोष्ट खरेदींत लिहून घेतली आहे. या कपटाच्या व लबाडांच्या रितीनें शेती मिळत नसते. ही नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत अस्सल खरेदीचा कागद परत आणून पंचासमक्ष माझ्या हवालीं करावा. तसें करण्यास चुकाल तर तुह्मावर फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल. ता० २७-१-१२ची खरिदी रद्द आहे त्या अन्वयें सोनागीरी येथील सर्वे नंबर १६ एकरगुंठे २३८३० आकार रुपये ३९८१४ ८३ यांतील मध्यभागच्या एकत्रितिअंश हिश्यावर तुह्माला मालकीचा किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचा हक्क पोचत नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्माला द्यावा लागेल. कळावें ता० ४ जून १९१२ इ. सही

सहीची निशाणी शिवराम वा॥ भगवान याची मु० आकोला रा० बाभूळगांव जाहागीर ता० बाळापूर

नो० नं० २९९

## नोटीस

नोटीस बेशमी रा० रा० जानकीराम पुजाजी सइतवाड रा० बोथकाजीचे व तुळशी मर्द आकाजी सइतवाड रा० बोथ ता० खामगांव जि० बुल्ढाणा

यांसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं. नंबर १ ची मुलगी ह्मणजे (तळसी मर्द आकाजी सइतवाड] ही माझी लग्नाची बायको असून लग्न होण्यास अजमास १७-१८ वर्षें झाली ती शाहाणी झाल्यावर बरेंच दिवस माझे येथें संसार केला. त्यापासून माझे पोटचे तिला एक मुलगी व मुलगा आहे. तुह्मी कांहीं दिवसानंतर तिला घेऊन गेले त्यानंतर मीं बरेचवेळां आणून घालण्या कारितां आपणास पत्र लिहले होतें व आमचे वडिल व चुलता असे तुमचे येथें माझ्या बायकोस आणण्याकारितां आले होतें त्यावेळेस आपण सांगितले कीं तुह्मी जर माझे येथें राहात असाल तर मी माझी मुलगी नांदवितो. न राहात असाल तर मी माझी मुलगी पाठवित नाहीं असे आपण आह्मास जबाब दिला मग आह्मी आपले गांवीं परत आलो तर आतां या नोटिशीनें कळविण्यात येते कीं ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत आणून घालावे. न आणून घातल्यास मी तुह्मास तिच्या खावटी बद्दलचा व कोणत्याही खर्च बद्दलचा जबाबदार राहणार नाहीं आपण दावा वगैरे केल्यास खोटे समजले जाईल. कळावें. ता० २-६ १२

सही

आकाजी गणपत राहणार माहाळुंगी जाहगीरी तालुका मलकापूर जि० बुलडाणा दस्तुर खुद्द

नो० नं० ३००

---

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. सकू मर्द बोंबटाजी तेली साकरकार रा. आगर पो० आगर ता० आकोला इसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं बोंबटाजी हा माझा सखा चुलता असून तो दोन तीन महिनें झाले मयत झाला. त्याचे क्रियाकर्म वगैरे मी माझे बापाप्रमाणें केलें असून त्याचे जिनगीवर माझा हक आहे. त्याचे नांवाचे दोन शेते आहेत व राहण्याचे घर १५ खांचीं आहे. शिवाय तुझें आंगावर डागडागीनें (सोन्याचे) व (चांदीचे) आहेत. तुझी वर्तणूक चांगली नाहीं. व तुझे मनांत जिनगीची अफरा तफर करून गंधर्वाचा नवरा करण्याची इच्छा दिसते कारितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं वर लिहिलेली इस्टेट तूं कोणास गहाण, बक्षीस, खरेदी वगैरे देऊं नये व ती गहाण टेऊन कोणाचे कर्जही काढूं नये तूं ह्यात आहे तोंपर्यंत त्या जिनगीचा उपभोग घ्यावा. माझा चुलता नामें बोंबटाजी याचे हातचे कोणाचे कर्ज टेणें नाहीं. व घेणेंही नाहीं. तूं जर कोणास इतक्याउपर गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे दिल्यास व कर्ज काढल्यास ते आतल समजलें जाईल. व त्याबद्दल जिनगीवर जबाबदारी नाहीं कळावें तारीख ३-६ १२

सही.

रामजी वा॥ हंजाजी तेली साकरकार दस्तुर खुद्द

नो० नं० ३०१

---

## नोटीस

नोटीस बेशमी शंकरआप्पा कालुआप्पा पांगर मुक्काम कारंजा यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचें मजबरोबर लग्न झाल्यानंतर तुह्मी मला वर्ष दोन वर्षें नांदविलें पुढें तुमचे मातोश्रीनें माझ्याबद्दल तुमचेजवळ चुगल्याचाहाड्या लावून माझेविषयीं तुमचें मनांत अतिशय द्वेशभाव उत्पन्न केला. त्यामुळें तुह्मी मला अतिशय त्रास देऊन फारच मारहाण केली तरी तेंव्हडाही मी त्रास सोसला. पुढें तुह्मी मजला बाळंतपणाकरितां ह्मणून बापाचें घरीं नेऊन घातलें. पुढें मी बाळंतीन होऊन मजला मुलगी झाली त्यासही सुमारें अडीच वर्षें झालें असतील तेव्हांपासून मी बापाचेंच घरीं आहे. तूह्मी मला नेण्यांस याल असें वाटत होतें परंतु तसें कांहीं दिसले नाहीं. ह्मणून मी तुमचे घरीं येतें अशाबद्दल दोन चार निरोप दिले. अखेर जातीमध्यें एक दोन वेळा पंचाईतीही झाल्या तरी तुह्मी कोणाचेंच कांहीं ऐकलें नाहीं. तरी माझ्या बापानें चार महिनें माझे पोषण केलें पुढें करिना ह्मणून निरूपायास्तव मला उभयतांचें उपजीवीके करितां ह्मणजे अन्नवस्त्रां करितां सावकाराचे कर्ज काढणें भाग पडलें आमचें उभयतांचें गरीबी रीतीनें खर्चास अंदाज दरमहा रुपये १० प्रमाणें खर्च झाला त्या मानानें कर्ज रुपये ३०० झाले. आतां कोणीही कर्ज देऊं शकत नाहीं. तुमचे नांवाविनवा प्रमाणें मला मजूरी करणें गैर वाटते व तशी माझे ठंगी शक्ती नाहीं ह्मणून निरूपायास्तव ही नोटीस करणें भाग पडले आतां ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचें आंत वरील खर्चाची रक्कम देऊन माझी पावती घ्यावी. आणि यापुढें माझे जिवास कोणत्याच प्रकारची इजा व धोका होऊं नये अशाबद्दल योग्य जामीन देऊन मला नांदवावें मी येण्यास तयार आहे. याप्रमाणें तुमचेकडून न झाल्यास आता तुह्मी खास खरोखरच नांदवित नाहीं असें समजून मी दुसरा घरठाव करील. पुढें तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. व करणारें इसमावर कोणतेच प्रकारची जोखम नाहीं. हीच फारकती आहे असें समजावें. माझे पुर्वी तुह्मी लग्नाचे कुंटूंबाचें फारच हलअपेष्टा करून शेवटी तुह्मी तीची फारकती दिली अशा तऱ्हेची आपली वर्तणूक आहे हे गांवांत सर्वांस माहीतच आहे. या नोटीशीचें उत्तर देण्याला तुह्मास कोणत्याच तऱ्हेची सवड नाहीं व मग तेच कांहीं कांहीं दिल्यास ते खोटे आहे असे समजतील व नोटीशीचा खर्च आणि पुढें मी तुमचेवर दिवाणी फौजदारी खटला करून वरील सदरहू रुपये वसूल करण्याची तजवित करील हे पूर्णपणें लक्षांत आणावें कळावें तारीख ६-६-१९१२

सही

गया जवजे शंकरआप्पा पांगेर रा० कारंजा निशाणी इच्या हातची बांगडी. दस्तुर तुकारामआप्पा उकर्डाआप्पा वाणी नंदे रा० कारंजा.

नो० नं० ३०२

---

## जाहिर नोटीस

नोटीश बेशमी सुरजमल जसकरण मारवाडी रा० लोणार व रामरख सुरजमल मारवाडी मुंदडा रा० मौजे देऊळगांव वायसा प्रगणे लोणार ता० मेहकर जि० बुलडाणें यांना--

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी कासाई मर्द दाजीबा ही माझी साक्षांत भावजई व मारुती हा माझा पुतण्या आहे याजजवळून मौजे देऊळगांव येथील शेत सर्वे नं० ६५ एकर ३४ आकार रुपये १४ व शेत सर्वे नं० ६६ एकर ३३ गुंठे ४ आकार रुपये १३ या प्रत्येक शेतांत माझा आठ आण्याचा हिस्सा आहे. तुह्मी माझा हिस्सा त्यांच्या जवळून दगलबाजीनें माझे सही शिवाय गहाण लिहून घेतला याबद्दल तुमचेवर विश्वासघाता संबंधानें फिर्याद करणें भाग आहे कारितां या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत माझा हिस्सा मला मुकाट्यानें मोकळा करून द्यावा. न दिल्यास कोर्टांत काम चालविल आणि कोर्टाचा खर्च व नोटीशीचा खर्च भरून घेतला जाईल. व इतःपर कोणीही माझे भावजई पासून वरील शेतासंबंधानें देवघेव करूं नये केल्यास ज्याचा तो जबाबदार राहील कळावें. ता० ९-६-१२

सही

वेनाजी वलुद दशरथ गरजे जात वंजारी राहणार देऊळगांव वायस ता० मेहकर नि० आंगठा.

नो० नं० ३०३

---

## नोटीस

नोटीस बेशमी कासाई मर्द दाजिबा व मारुती वा॥ दाजिबा रा० देऊळगांव

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा नवरा नाम दाजिबा हा माझा सखा भाऊ होता व तो वडील होता त्याचे नावानें मौजे देऊळगांव येथील माझी व त्यची शेते मिळून सर्वे नंबर ६५ एकर ३४ आकार १४ व सर्वे नं० ६६ एकर ३३।४ आकार १३ हें दोन नंबर आहेत व त्यांत माझा प्रत्येक शेतांत एकाद्वितीऑश औंच हिस्सा आहे. तो मरून आज अंदाजा ५-६ माहिनें झाले तो मेल्यावर तूं ते दोन्ही शेतें दगलबाजिनें सुरजमल जसकरण मारवाडी रा० कसबे लोणार व रामरख सुरजमल मारवाडी मुंदडा रा० मौजे देऊळगांव यांस तारण गहाण लिहून दिले आहे ते तूं माझा हिस्सा मला नाविचारतां गहाण लिहून दिला याबद्दल मला कोर्टांत काम चालविणें भाग आहे. कारितां या नोटिशीनें कळविण्यात येते कीं नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत माझे निम्में हिश्याचें रुपये भरून देऊन माझा हिस्सा मला मोकळा करून द्यावा वरील मुदतींत तूझें कडून माझा हिस्सा मोकळा करून न दिल्यास मला कोर्ट मार्फत काम चालवावे लागेल. व नोटिशीचा व कोर्टाचा खर्च भरून घेनला जाईल. तूं यापुढें माझे शेतीतील हिस्याची देवघेव करू नये कळावें तारीख ९-६-१२ इ०

सही.

वेजाजी वा॥ दशरथ जात वंजारी अडनांव गरजे रा० देऊळगांव-विसा नि० आंगठा ता. मेहेकर

नो० नं० ३०४

---

## नोटीस

नोटीस बेशमी निंबाजी वल्लद गणाजी चांभार राहणार मौजे ब्राह्मणवाड तालुके दर्यापूर यांस–

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी व इतर पंच यानीं आपसांत सल्ला करून मला ता० १६-५-१२ चें प्रभातपत्रांतून नोटीस दिली त्यातील मजकूर सर्व खोटा आहे. रामनाथ माहाराज याचे देऊळ माझे वडिलार्जित एकट्याचे मालकीचे आहे त्यावर तुमचा अगर इतर पचांचा कांहीं हक्क नाहीं व सदर्हु देवस्थानाचे इमारतीकरितां तुह्मी मजपाशीं कांहींच दिले नाहीं. तुमचेशी व माझेशीं जातीसंबधीं वाद असल्यामुळें तुह्मी नोटिशींत मजकूर खोटा लिहला आहे. देवस्थानाचे वर्गणीकारितां मी कधींच वर्गणी केली नाहीं कारण देऊळ माझे एकट्याचे मालकीचे असल्यामुळें त्याला पैसा मी आपले घरून आजपर्यंत लावीत गेलो त्यांत कोणाचा हक्क नाहीं. तुह्मी लिहलेला मजकूर सर्व खोटा आहे. ता० २३ ५-१२

सही

देवाजी वा॥ ढकाजी चांभार रा० कोकर्डा द० खु०

नो० नं० ३०५

---

## नोटिस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं शेत सर्वे नंबर २१ एकर चार गुठें २८ आकार ६ मौजे कळंबे ता० मगरूळचे आमचे जवळ ४०० चारशे रुपयाचे तारन गहाणखत हरपलें तरी जो आणून देईल त्यास १५ रुपये इनाम देऊं सदर्हू नंबराची खरेदी अगर तारन अगर बक्षीस आमचे रुपयाची अदाई झाल्याशिवाय कोणी घेईल तर रद्द समजलें जाईल. ता० ३०-५-१२

सही.

बाबू जयकिशोरीलाल गंगादीन साहु मसोला खुर्द

नो० नं० ३०६

Registered N N.4

# वऱ्हाडसमाचार.

**Berar Samachar.**

वर्ष ४६ ] आकोला— सोमवार तारीख १७ माहे जून सन १९१२ ई० [ अंक २४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोंटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगत्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ { G. A. Phillips. एजंट

नं १

### मुंबई बॅंकचें सोनें.

मुंबई बॅंकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बॅंकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बॅंकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६; तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बॅंक आकोला २१.९.१० { G. A. PHILLIPS. एजंट

नो० नं० २

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापारमें किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काममें कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपयेमें भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेजकर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्मा
नं ४ चित्तीखाना आगरा.


## निराश्रित बाल रक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्याही पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कमा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखे सोसावी लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टी विषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केले आहे भाड्यानें घेतलेले घर केव्हां सोडावे लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेले घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. २६०


## खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

**जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.**

यांचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेंखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | " | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाल | " | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | " | १ |
| नागाच्या गोळ्या | " | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | " | २ |
| खोकल्याच्या गोळ्या | " | २ |
| पोलादभस्म | | ३ |
| लक्ष्मी विलास | " | १५ |
| त्रिभूवन किर्ती | " | २ |
| श्वास कुठार | " | २ |
| सुवर्णमालनीवसंत | " | ६॥ |
| लघुमालनीवसंत | " | २ |
| समिर पन्नग | " | ५ |
| रससिंदुर | " | ३ |
| चंद्रोदय | | १५ |
| हिंगाष्टक चुर्ण | बाटली | ०= |
| डोळ्यांचें औषध | " | |
| मोठी | " | \|= |
| लहान | " | -+- |
| लिनिमेंट आयोडिन | " | .॥. |
| टि. आयोडिन | " | \|= |
| महावातास्त्र तेल | " | |
| मोठी | " | ॥≡ |
| मध्यम | " | \|-॥ |
| लहान | " | ०≡ |
| उसाचा शिर्का | " | \|≡ |
| मध बाटली. | | |
| मोठी | " | \|= |
| लहान | " | ०=॥ |
| पिनसावर तेल | " | .॥. |
| ग्लिसराईन बाटली. | | ०≡ |
| गजकर्ण अर्क | " | \|= |
| गजकर्ण मलम | " | ०≡॥ |
| शंखद्राव. | तोळा | .॥. |
| कुंचल्यादि वटी | " | .॥. |
| हिंगणबेटाचे तेल | " | ०= |
| नारायण चुर्ण | " | ०= |
| इच्छभोदी जुलाब डझन | | ०= |
| गृहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | " | २ |
| शितोपला चुर्ण | " | ०= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | " | ०= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.

ता. १।१।१२

जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला.

## हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें पूर्व स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधा विकणाऱ्या दुकानांवर व डॉ. एच एल. बाटलीवाला जे. पी. मु बरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

### सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रिया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगरिं, वतसिोआमूशण, वस्त्रतआदवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुदे भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडी
अलीगढ.

नो० नं० १९

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोले

## नोटीस

नोटीस बेशमी माधवराव रायसिंग कुणबी राहणार कजबे रोहीणखेड ता० मलकापूर जि० बुलडाणे यांस—

खालीं सही करणार दवलत वल्लद दत्तुपाटील राहणार मौजे सोनबर्डे प्रगणे रोहीणखेड ता० मलकापूर जि० बुलढाणा यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आह्मांस मौजे सोनबर्डे येथील शेत सर्वे नंबर ८ हा ता० २६।१२।११ इ० रोजीं ७०० रुपयास विकत दिलें ज्या दिवशीं सवदा झाला त्या दिवशीं तुह्मांस चाळीस रुपये बयान्याबद्दल दिलें नंतर खरेदी दस्त. ऐवज घेण्याकरितां दोन वेळा १४ १४ रुपये दिले व तुह्मी सांगितल्यावरून तहशीलीचे वेळेस शेताचा सारा २९।=९ परभारे भरून भरून दिले. असे एकंदर ७४ रुपये ७ आणे ९ पै तुह्मांस पोंचले आहे ज्या दिवशीं सवदा झाला त्या दिवशीं जमीन माझे ताब्यांत दिली. मी जमिनीची किंसतगागी, नांगरून दुरस्त करून त्यांत ६०० गाडी खत टाकले आहे. सदरहु नंबराचें खरेदीखत प्रथम मोतीराम तुकाराम यांनीं लिहिलें. व ते खरेदीखत सखारामपंत देशपांडे यांची साक्ष टाकण्याकरितां तुह्मी घेऊन गेलें. कांहीं दिवसांनीं तुह्मी ह्मणाले कीं सदरहु दस्तऐवज ठिकाणावर नाहीं. नंतर दुसऱ्यानें खरेदीचा दस्तऐवज भगवान सखाराम गुमास्ते यांचे हातानीं लिहून पुर्वी प्रमाणें साक्ष टाकण्या करितां घेऊन गेलें त्या खरेदीखतावर सखारामपंताची साक्ष टाकण्याचे कारण असे कीं सदरहु जमीन त्यां जवळ गहाण आहे असें तुह्मी सवदा होण्याच्या वेळेस सांगितल्यावरून सवदा देण्याचे वेळेस तुह्मी कबुल केलें कीं सदरहु गहाणाचे रुपये अगोदर भरून देऊन खरेदीवर त्यांची साक्ष टाकून देऊं त्याप्रमाणें साक्ष टाकण्याकरितां खरेदिचादस्तऐवज तुह्मी घेऊन गेले आहां. आतां आमचे ऐकण्यांत असे आले आहे. कीं सदरहु जमिनीची तुह्मी पुन्हा विक्री करण्याबद्दल ह्मणत आहा. वरून तुह्मांस या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं सदरहु जमीनीवर तुमची कोणत्याच प्रकारची मालकी राहीली नाहीं. ठरल्या प्रमाणें तुह्मी गहाणखताचे पैसे भरून देऊन खरेदी खतावर साक्ष टाकून खरेदीखत रजीष्टर करून व तुमचे राहिलेलें रुपये नोंदणारे अंमलदारासमक्ष नगदी घ्यावे. अगर गहाणाचे पैसे तुह्मी न भरल्यास गहाणखत दस्तऐवजाचे रुपये व्याजामुद्दां आह्मास मजरा देऊन बाकीचे रुपये तुह्मी राजिष्टर कचेरींत नगदी घ्यावे त्याप्रमाणें तुह्मी न केल्यास व अयोग्य रीतीनें जमिनीची विक्री अगरची लागवण केल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. ही नोटीस ता० २९ माहे मे सन १९१२ इ. द० बापु दानाजी पाटील रोहिनखेड.

सही

दौलत दत्तु पाटील सोनबरड मु० रोहिनखेड द० खु०

नो० नं० ३११

## नोटीस

नोटीस बेशमी ज्यानकीराम मंगणीराम मारवाडी साहु दुकान जनतापेठ आकोला यासः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मापासून १००० रुपये एक रुपया व्याजाप्रमाणें घेऊन गहाणखत लिहून दिलें व तुमचा माझा करार रुपये देण्याचा चार वर्षांचा होता करार होता परंतु तुह्मी माझी समजूत करून दस्तऐवजांत ६ सहा महिन्याचा करार घालून करारापुढे २ दोन रुपयाची शर्त लिहून घेतली आणि १००० हजार रुपयातून ९४० रुपये तुह्मी मकला दिले व ६० रुपये देणें राहीले मी तुह्मांस मध्यंतरी व्याजाचा हिशेब करून व्याज देण्याकरितां अलो असतां शर्ती व्याजासह रुपये घेईन असे सांगितल्यावरून मी थक्क झालो नंतर आपली समजूत करण्यांकरिता शीवराम पाटील यास आणलें व त्याजला आपण आपल्या हद्दाप्रमाणेंच १९६० रुपये झाले असे तारीख १०।५।१२ चे सुमारास सांगितलें माझे रुपये ६० घेणें वजा जाता १९०० रुपये घेण्याचें कबूल केलें, वरून मी रा. रा. मोतीलाल बनसीलाल साहू दुकान आकोला याजपासून कारवाई करून त्याना तारीख १७।५।१२ रोजीं दोन हजाराचे गहाणखत लिहून देऊन नोंदुन दिले व त्यांत तुह्मास १९०० रुपये देणेबद्दल लिहून दिले पुढें रुपये १९०० तुह्मास घेणेबद्दल मी पुष्कळवेळां विनंती केली पण तुह्मी माझ्याशीं कांहीं भाषण केलें नाहीं अखेरीस मोतीलालचा गुमास्ता मनोहर विठ्ठल व गोविंद बाळकृष्ण असे तारीख ९।६।१२ रोज रविवारी १९०० रुपये घेऊन आले, तुह्मी त्याना शीवराम पाटलासमक्ष सांगितले कीं मी कांहीं रुपये घेत नाहीं. माझे रुपये १७०० होतात त्यावरून तुह्मास मोतीलालचे गुमास्त्यानें गहाणखत दाखवा, व हिशेब करा, व रुपये घ्या, असें ह्मटलें असतां तुह्मी हिशेब करित नाहीं असें सांगून त्याचे बरोबर तक्रार केली व मजलाहि १९ दिवस पावेतों विनाकारण त्रास दिला असो आतां तुह्मास हा नोटीशीनें कळविण्यात येते कीं तुह्मास देण्याकरितां रुपये १९०० मोतीलाल बनसीलाल साहु यांचे दुकानावर अनामत ठेविले आहे ते नोटीस पावल्याबरोबर त्यांचे पासून घेऊन त्याना मी तुह्मास लिहून दिलेले गहाणखतावर तुह्मी भरपाई करून देऊन गहाणखत त्यांचे स्वाधिन करावे तुमचे व्याज तारीख १७।५।१२ पासून बंद झाले तुह्मी जर मजवर विनाकारण हद्द करून फिर्याद वगैरे कराल तर मी कोर्ट खर्चाबद्दल व १९०० रुपयापेक्षां ज्यास्त रकमेबद्दल जबाबदार नाहीं शीवाय माझा खर्च व नोटीसीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल कळावें तारीख १०।६।१२ इ. सही

सिदू वा सुर्यभान पाटील रा. यावलखेड ता. आकोला.

नो० नं० ३१२

## नोटीस

रा० रा० नारायणराव बापुराव देशमुख राहणार हिसोंग यांस—

खालीं सही करणार यांजवरून नोटीस देण्यात येतें कीं तुमचे स्वतःचे हिसोंग येथील शेतें मी पट्ट्यानीं केलीं आहेत ती येणें प्रमाणें—

| सर्वे नंबर | एकर | गुंठे हिसा |
| --- | --- | --- |
| २१७ | २२ | २ निम्मा |
| २०२ | २० | ३६ |
| १९६ | १४ | ३८ निम्मा |
| ६४ | २८ | २८ |

दापूर रस्त्यावरील शेत एकर १५ ही सर्व शेतें मी पट्ट्यानीं पांच सहा वर्षांच्या करारानीं करून आपणास नोंदून दिलें आहे. हीं शेतीं मी कुंदाकाडी वगैरे काढून दुरुस्त केली आहे. व या शेतांचें स्वामित्वा बद्दलचे रुपये वरील अनुक्रमानें दिलेल्या नंबराचें सरजावें. १२०॥, २३१, ६०॥, २६०, १९१ या प्रमाणें आह्मी स्वामीत्वाची रक्कम देत असतो. वरिल लिहिलेली शेती अदावतीमुळें आपण कांहीं विचार न करतां जबरदस्तीनें मला न विचारतां दुसऱ्यास लावून काढली आहे. तर या नोटीशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत पट्ट्यानीं केलेली शेतें आमच्या ताब्यांत द्यावी आह्मी पेरणी करण्यास तयार आहों. न दिल्यास माझे नुकसानीबद्दल व मोगणें राहिलेले सालाबद्दल दर तऱ्फनीस दरसालीं २९ रुपये प्रमाणें नुकसानी भरून घेतली जाईल व आपणास कोणत्याही प्रकारें नुकसानी सुटणार नाहीं. आजतारखे पर्यंतचे आपल्या शेतीचे मालकीचे पैसे चुकतें आह्मी आमच्या हिशोबांनीं देऊन चुकलो आहों तुमच्या हिशोबांनीं कांहीं निघाल्यास तुह्मी आमचे दहिगांव दुकानीं येऊन हिशेब करून घेऊन जावे. तुह्मी ह्मणाल कीं पैसे थकल्यामुळें दुसऱ्यास शेती लाऊन काढली ही तक्रार ऐकणार नाहीं. आपण दावा केल्यास तो रद्द समजला जाईल. व माझे नूकसानीबद्दल दिवाणी दावा करून रकम भरून घेईल कळावें. ता० ११।६।१९१२ इ०

सही (मारवाडींत)

सिवनारायण मोहनलाल तर्फे मजनलाल रा० आकोला

नो० नं० ३१३

## नोटीस

नोटील बेशमी नामा वल्लद सुर्यभान जात कुणबी अडनांव अरब रा० उकळीवरूडा ता० आकोट यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न होण्यास आज सुमारें १० वर्षे झाली मी शाहाणी झाल्यावर माझ्या आईबापानीं बरेच वेळां मला नेण्याकरितां त्यापणास निरोप पाठविले होते तर आपण सांगितलेलें नो नेत नाहीं. आणि मी शहाणी झाल्यापासून आईबापापासून वेगळी राहून सावकाराचे दरमहा ४ रुपये प्रमाणें कर्ज काढून खात आहे. आता कोणी मला कर्ज देत नाहीं करितां या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं मी काढलेले सावकाराचें तीन वर्षांचे वर्ष झालेले रुपये १४४ हे आठ दिवसांचे आंत देऊन टाकावें. व मला नांदविण्यास घेऊन जावें. मी आपल्या इसार करण्यास तयार आहे. न घेऊन जाल तर हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा घरटाव करीन. मग तुमचा मजवर व मुंगर्भांच्या नवऱ्यावर कोणतेही प्रकारचा हक्क चालणार नाहीं. व सावकाराचे देण्याबद्दल दावा करून देसे भरून घेतले जातील कळावें. ता० १२।६।१२ इ० सही

कोंडी भर्त नामा कुणबी रा० आकोला नि० हालची बांगडी०

नो० नं० ३१४

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार याजकडून सर्व शेट सावकार व इतर लोक यांना कळविण्यांत येते कीं गणेश सखाराम हें आमचे वडील असून तें आज दिड वर्षा पासून वेडे झाले आहेत तरी यांचे पासून कोणीही त्यांची स्थावर जंगम जिनगी गहाण, खरेदी अगर कोणतेच प्रकारे घेऊं नये व यांना कर्जाऊ पैसे देऊं नये यांना कोर्टांत नालायक ठरविला आहे. व याच्या सर्व जिनगीवर हक्क आमचा आहे. कधीं कधीं त्याचे डोकें फिरत असतें. व तो कोणते वेळीं काय करिल याचा नेम नाहीं. हल्लीं तो आपले मौजे धामन बुजरूक येथील शेत सर्वे नं० ९७।७० हें विकण्याच्या विचारांत आहे. आह्मी त्याचे योग्य वारस आहो. व अशा तऱ्हेनें शेती वगैरे विकल्यानें आमचे बरेंच नुकसान होईल तें होऊं नये ह्मणून कळविले आहे व कोणाचे कोणतेच प्रकारचे नुकसान होऊं नये ह्मणून सुचविले आहे. कोणी जर ती शेते गहाण, खरेदी, अगर पट्ट्यानें घेतले असेल तर ते रद्द समजावे व पुढे कोणी घेईल तर ते बातल समजले जाईल कळावें ता० ६-६-१९१२ इ०

सही.

विठ्ठल गणेश पटवारी मु० धामनबुजरूख

नो० नं० ३१५ ता० आकोट

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं मौजे सोनबरड प्रगणे रोहीनखेड येथील शेत स० नंबर ८ मी माधवराव रायेसींग रोहीनखेडकर याज पासुन ७०० रुपयास विकत घेतलें आहे. त्यात ७४।=९ चा भरणा माधवराव यास नगदी करून दिला आहे व सदर्हु जमीन सवदा झाल्यापासुन माझ्या ताब्यांत आहे. सदर्हु जमीनीवर माधवराव यांची कोणत्याच प्रकारची मालकी राहीली नाहीं तरी या नोटीशीनें सर्वांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हु जमीन माधवराव पासून कोणी गहाण व खरेदी अगर दईतीस घेऊं नये घेतल्यास ती कोणीच जबाबदार राहणार नाहीं. हीं नोटीस कळावें तारीख २९ माहे मे सन १९१२ दस्तुर बापु दानाजी पाटील कसबे रोहणखेड

सही.

दौलत दतु पाटील सोनबरड मु० रोहीनखेड दस्तुर खुद ता. २९-५-१२

नो० नं० ३१६

## जाहिरात

या जाहिरातीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, खालीं लिहिलेला स्थावर इस्टेट आमच्या पूर्ण मालकीची असून ती आमच्या ताब्यांत आहे. तीचें वर्णन मौजे चरणगांव ता० बाळापूर येथील शे० स नं० ९२ एकर २६ गुंठे २६ आ० रु० ४० यातील दोन जोडीचा हिस्सा नात्याचे काठचा पश्चिमेकडील बाजूचा अलगवाटलेले निम्मे घर पश्चिमेचें बाजूचें, मौजे दोलखेड ता० बाळापूर येथील स० नं० २९ एकर २७ गुंठे २८ आकार रुपये २८ यातील तीसरा हिस्सा पुर्वेकडील बाजूचा अलग वाटलेला येणें प्रमाणें वरील इस्टेट आमचें पूर्ण मालकीची वाडवडीलार्जीत असल्यामूळें ती मालकीचे व वारसाचे नात्यानें आमचे ताब्यांत आमचा साक्षात चुलत चुलता जानची यांचे मरणानंतर आली आहे. पूर्वें ती इस्टेट आमची सख्खी चुलती बहीजाबुगी कन्या ही विधवा असल्यामूळें व तीचे पालनपोषण करण्यास तीचे नवऱ्याचे नातलगापैकीं कोणी नव्हतें ह्मणूनच आह्मी वरील इस्टेटवर मालकी व ताबा आमचा ठेऊन तीजला घर राहण्यास दिलें व शेती वाहून उपजीवीका करण्यास दिलेली आहे आतां आमचे ऐकण्यांत असें आलें आहे कीं पारवती ही आह्मांस फसविण्याच्या इराद्यानें वरील इस्टेट दुसऱ्यास तीजला पैशाची जरूरी नसतां गहाण, खरेदी, बक्षीसपत्र पट्टेखत करून देणार आहे तर ते कोणी घेऊं नये घेतल्यास ते बातल व रद्द समजलें जाईल त्या दस्तऐवजास आमची इस्टेट कोणतेच प्रकाची जबाबदार राहणार नाहीं तरी जाहीर खबर दिली आहे. आकोला ता० १२-६ १९१२ इ०

सही

नामदेव लटुजी देशमुख रा० चरणगांव

२ पुंडलीक सीवराम देशमुख दस्तुर खुद.

३ मारोती वलद जैराम देशमुख दस्तुर खुद.

नो० नं० ३१७

## नोटीस

नोटीस बेशमी रतन ह्यांगोजी सुतार रा० भाम ता० मुर्तीजापूर पो० धनज व पांडू वा। ह्यांगोजी रा० कांरजा ता० मुर्तीजापूर यांस:-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा बाप नामें विठोबा सुतार यानें तुमच्या आईला ह्मणजे त्यांचे बहिणीला राहण्यास मौजे भाम येथील आमचे स्वतःचे घर दिलें होतें. परंतु तिला विकण्याचा, किंवा गहाण, खरेदी, व बक्षीस, वगैरे देण्याचा अधिकार दिला नव्हता. तुझी आई वारली व आतां माझा बापही वारला आहे. आह्मांस असें कळतें कीं तुह्मी तें घर विक्रिकरितां काढण्याच्या विचारांत आहा, परंतु तुह्मालाही ते घर विकण्याचा अगर गहाण खरेदी, व बक्षीस, वगैरे देण्याचा अधिकार नाहीं इतक्या उपर दिल्यास तें बातल समजलें जाईल करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून ६ महिन्याचें आंत आह्मास घर खाली करून द्यावें कारण वरसातचे दिवस असल्यामुळें तुह्माला मुध्दा कदर्गे बरोबर दिसत नाहीं वरील मुदतींत तुह्मी घर खालीं करून न दिल्यास आह्मी कोर्ट मार्फत योग्य तजवीज करूं व या नोटिशीचा खर्च व कोर्ट खर्च भरून घेतला जाईल कळावें तारीख ७-६-१९१२ इ०

सही.

वामन विठोबा सुतार रा० भाम ता० मुर्तीजापूर पो० धनज नि. आंगठा

नो० नं० ३१८

## नोटीस

नोटीस बेशमी गणपत वलद मानाजी ओकर्ते कुणबी रा० रामापूर ता० आकोट जि० आकोला यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझी बायको नामे तानी इजला एक महिन्यापूर्वी आपले कडे आपले सांगण्यावरून घोडे व मनुष्य देऊन रवाना केले त्या वेळेस आमचे घोडे वापस करण्याचें तें न करितां ठेऊन घेतलें घोडे वापस न आल्यामुळें मी व माझा बाप असे गाडीबैल घेऊन तेथें आलो असतां आमची बेइज्जत करून आह्मी आणलेले गाडीबैल वगैरे सामान अंदाजा किंमत रुपये ४९० चे छिनून घेतले आह्मी आपणास हे सामान घेण्याचें कारण विचारलें असतां आपण मुलीचे खावटींत हें सामान घेतले असें आपण ह्मणाला तरी आपणास या नोटीशीनें कळविण्यात येतें कीं आह्मी तिजला वागविण्यास तयार आहो. आपली इच्छा तिजला येथें पाठविण्याची नसल्यास आपण ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आमचे अटकाविलेले सामान आमचकडे पोंचतें करून द्यावे आह्मी खावटी देण्यांस तयार आहो. असें आपणाकडून न झाल्यास आह्मी सदरहू सामान तिचे खावटी दाखल एकदम दिले असें समजूं व आपणास या पुढें खावटी मागण्याचा अधिकार राहणार नाहीं. सबब मुद्दाम या नोटीशीनें कळविलें आहे कळावें ता० २७।५।१९१२ दस्तुर बळवंत गोविंद.

सही

रामराव टिकाराम कोकाटे रा० अंजनगांवसुर्जी ता० दर्यापूर जि० उमरावती.

नो० नं० ३१९

## नोटिस

रा० रा० मुकुंदराव भास्कर देशमुख राहणार भांबेरी तालुका आकोट यांस:--

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी १ हजार पेंडी कडबा दरशेंकडा १० रुपये भावानें मला विकला आणि तुह्मी मजकडून इसाऱ्याचा १ रुपया घेतला तुह्मी आज तीन महिने मला चकावित आहां आणि कडबा मोजून देत नाहीं मी जो कडबा घेतला तो मी वापरासाठीं घेतला आहे. हें तुह्मास ठाऊक असून तुह्मी आतां मला फसवित आहां. हल्लीं कडब्याचा भाव २० रुपये शेंकड्या प्रमाणें आहे, तर तुह्मी ही नोटीस पोंचतांच २ दिवसाचें आंत कडब्याचें माप करून रुपये चुकते द्यावे. तसें न कराल तर तुह्मावर नुकसानी दाखल दरशेंकडा १० रुपये प्रमाणें १०० रुपये आमचे भरून द्यावे लागतील. आतां मुदत मिळणार नाहीं. पाऊस पडल्यावर कडब्याचा भाव उतरेल तेव्हां आह्मी कडबा घेणार नाहीं. या नोटीशीचा खर्च तुह्मावर पडेल तुह्मी कडबा न दिल्यामुळें ही नोटीस देणें भाग झालें आहे कळावें. ता० १ जून सन १९१२ इ०

सही

सपतराव जानराव देशमुख राहणार भांबेरी दस्तुर खुद्द.

नो० नं ३२०

## नोटीस

र.. रा. जयराम कृष्णाजी गावंडे कुणबी चेलक प्र. पातूर ता. बाळापूर यास—

मी खालीं सही करणार नोटीस देते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून तुमचे पासून मला दोन मुली व एक मुलगा आहे. इतके दिवस मी तुमचेपाशीं सुखानें नांदत होते. परंतु गेले वर्षापासून तुमचे अंगावर भयंकर महारोग दिसत आहे त्यामुळें याउपर मी तुमचेपाशीं रहाण्यास कबूल नाहीं. व मी माहेरी येतानाही तुह्मास पूर्णपणें बजावले होते कीं तुमच्या भयंकर रोगामुळें आतां मला तुमचे घरीं परत येण्याची इच्छा नाहीं. तरीही पण तुह्मी वारंवार तुळंग्यास माझे आईचे घरीं येऊन, मी येत नाहीं असे साफ कळविले असतांही दांडगाईनें हात धरून ओढता व बळजबरीनें नेण्याचा प्रयत्न करिता. व दुसऱ्या खेपेस तुह्मी माझे अज्ञान मुलासही आपलें घरीं माझे जवळून मी नको ह्मणत असताही बळजबरीनें घेऊन गेले. यापुढें जर तुह्मी अशा रितीनें येऊन दांडगाई करून मला त्रास द्याल तर तुमच्यावर फौजदारी केली जाईल. या नोटिशीनें मी तुह्मास साफ कळवित आहे कीं तुह्मास भयंकर महारोग असल्याकारणानें माझी तुमचे घरी येण्याची इच्छा नाहीं. तरी तुह्मी दांडगाई करून मला नेण्याचा प्रयत्न यापुढें करूं नये. पाहिजे असल्यास तुह्मी दिवाणी कोर्टात फिर्याद करावी. तसेच या नोटिशीनें मी आपणास कळविते कीं तुह्मी मला ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत फारकत देऊन टाकावी तसे न केल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग माझेवर तुमचा कोणत्याही तऱ्हेचा हक्क राहणार नाहीं. कळावें मु० आकोला ता० ७।६।१२

सही

तुळसी मर्द जयराम कुणबी रा० तुळंग ता० बाळापूर

नो० नं० ३२१

## नोटिशीचें उत्तर

राधी मर्द सुकदेव पाटील रा० गव्हाण ता० खामगांव पो. शेगांव ईस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची नोटीस पावली मजकूर समजला. व तो सर्व खोटा आहे. मी माझ्या जिनगीची मालकीण आहे मला वाटेल तें त्याचें करीन व आणखी तुह्मी माझे वारसही होऊं शकत नाहीं. माझ्या मागे जिनगीचे वारस माझा सासरा नामे सुपडाजी वा। पांडू हा आहे. सर्व जिनगी समाईक आहे तेव्हां अर्थातच मजमागें ताबा व हक्क त्यांचा अगर त्यांच्या वारसाच राहणार. आजपर्यंत आमचे पालण पोषण त्यांनीं केलें व माझे यजमान त्यांना बापाप्रमाणेंच मानत आले व अजून तसेच वर्तन त्यांनीं मजशीं ठेवले आहे.

सही

शेवंती मर्द मोतीराम पाटील अ० पालन करणार सुपडाजी वा। पांडुजी पाटील राहणार काजीखेड ता० बाळापूर पोष्ट शेगांव नि० आंगठा सुपडाजी यांचा

नो० नं० ३२२

## नोटीस

कीसनराव बापूराव देशमुख राहणार नारखेड ता० मलकापूर जि० बुलढाणा यांस:-

खालीं सही करणार याजकडून या जाहिर नोटीसीनें कळविण्यांत येते कीं मौजे नारखेड ता० मलकापूर जि० बुलडाणा येथील

| शेत स. नं. | एकर गुंठे | आ. रु. | हिस्सा |
|---|---|---|---|
| ११३ | ३०४१० | ९२ | ॥= |
| ११७ | २३८२९ | ४१ | ।॥। |

ही दोन्ही शेतामधील हिस्से तुह्मी आमचे पासून तारीख १०।४।१२ इसवी रोजीं रक्कम रुपये ४७०० शेला खरेदी घेण्याचे ठरविलें आणि इसाराबद्दल कांहीं न देता त्याच दिवशीं आह्मांस एक रुपयाचे स्टांपावर कबुली चीठी १९ दिवसांचे कराराची लिहुन दिली त्यांत तुह्मी असें लिहून दिले आहे कीं आह्मी कराराप्रमाणें १९ दिवसाचे आंत रुपये ४७०० देऊन खरेदी खत लिहुन नोंदुन घेऊं याप्रमाणें करारापावेतो आमचेकडून झाले नाहीं तर तुह्मांस १००० रुपये नुकसानीचे देऊं त्याप्रमाणें आपला करार पुरा झाला असून आपण रक्कम देऊन खरेदीखत करून घेतले नाहीं ह्मणून या नोटीसीनें आपल्यास कळविण्यात येतें कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे नुकसानीचे एक हजार रुपये देऊन कबूलीखत परत घ्यावें याप्रमाणे न केल्यास आह्माला कोर्ट मार्फत दाद मागून कोर्ट खर्चासुद्धां रक्कम वसूल करावी लागेल कळावें ता० ३०।५।१२ इ.

सही

उत्तमराव गोविंदराव देशमुख रा० अंत्रीमलकापूर ता० बाळापूर द० खुद्द

मानीकराव गोविंदराव देशमुख रा० अंत्रीमलकापूर ता० बाळापूर द० खुद्द

नो० नं० ३२३

वऱ्हाडसमाचार.

आषाढ शुद्ध २ शके १८३४ परिधावी

## हिंदुस्थानांतील रेलवे.

मद्रास रेलवेचे म्यानेजिंग डायरेक्टर मि० प्रिस्टले यांनीं विलायतेंत रॉयल सोसायटी ऑफ आर्टस या संस्थेपुढें हिंदुस्थानांतल्या रेलवे संबंधानें जो एक उत्कृष्ट निबंध वाचला तो अनेक कारणांनीं अत्यंत महत्वाचा आहे. यांत सामान्यतः आमच्या लोकांना माहित नाहींत अशा पुष्कळ गोष्टी आहेत. हिंदुस्थानांत रेलवेचा प्रसार कसा झाला, रेलवे कंपन्या व हिंदुस्थान सरकार यांच्या मधला संबंध कसा आहे, कंपन्याशीं सरकारनें केलेले करार वेळोवेळीं कसकसे बदलत गेले, आणि आज रेलवेचा प्रसार झपाट्यानें होण्यासाठीं काय करणें जरूर आहे त्याविषयींची एकत्र माहिती—विशेषतः रेलवे कंपन्यांची सांपत्तिक स्थिति व सरकारचें धोरण यांच्या संबंधाची इतकी माहिती एकत्र केलेली अन्यत्र आमचे पाहण्यांत नाहीं. ह्मणून प्रथम या निबंधाचा सारांश देऊन मागाहून त्यासंबंधाचे आमचे विचार आह्मी थोडक्यांत सांगणार आहों. इतर विषयाप्रमाणें याही विषयाला सामाजिक, नैतिक, वगैरे अंगें आहेत, पण त्यांचा विचार मि० प्रिस्टले यांच्या निबंधांत केलेला नाहीं. केवळ सांपत्तिक दृष्टया केलेला विचार त्यांच्या निबंधांत आहे. हिंदुस्थानांत अगदीं पहिली रेलवे काढण्याची कल्पना ईस्ट इंडिया कंपनीचे वेळीं सन १८४९ सालीं कांहीं खाजगी गृहस्थांच्या डोक्यांत आली आणि कंपन्या उभारून आह्माला रेलवे बांधूं द्या असा त्यांनीं ई. इ. कंपनीला अर्ज केले. आह्मी जें या व्यापारांत भांडवल घालूं त्याबद्दलची ग्यारंटी सरकारनें द्यावी अशी त्यांची मागणी होती आणि ई० इं० कंपनी या मागणीला अनुकूल नव्हती. तथापि केवळ प्रयोगाखातर. ह्मणून प्रथम कलकत्त्यापासून राणीगंजपर्यंत, मुंबईहून कल्याणपर्यंत आणी मद्रासहून अर्कोनमपर्यंत अशा तीन लैनी (एकंदर १९२ मैलांच्या) प्रथम बांधण्यांत आल्या. हा प्रयत्न यशस्वी झाल्याचें पाहून व हिंदुस्थानाला रेलवेची अत्यंत अवश्यकता असें वाटून लॉर्ड डलहौसी साहेबांनीं १८५३ सालीं लिहिलेल्या आपल्या मिनिटांत निदान प्रत्येक इलाख्याच्या मुख्य ठिकाणाचा बंदराशीं संबंध जोडणाऱ्या रेलवे बांधण्याविषयीं जोराची शिफारस केली, आणि त्यामुळें सरकारची ग्यारंटी घेऊन आठ कंपन्यांनीं हिंदुस्थानांच्या निरनिराळ्या भागांत सवापांच कोट रुपयांच्या भांडवलानें रेलवे बांधिल्या, सरकारनें त्यांना जमिनी फुकट देऊन दर शेंकडा ५ टक्के व्याज देण्याची हमी घेतली, आणि याबद्दल पंचवीस वर्षांनीं सगळी रेलवे आपल्या ताब्यांत देण्याचा रेलवे कंपन्यांकडून करार करून घेतला. रेलवे कंपन्यांना चांगला फायदा पडेल व आपणांस बहुधा नुकसान भरून द्यावें लागणार नाहीं अशी कंपनी सरकारची समजूत प्रत्यक्ष अनुभवानें खोटी ठरली. असें होण्याचें कारण त्यावेळीं जरूरीपेक्षां अधिक मजबूत सडका वगैरे करण्यांत कंपन्यांनीं निष्कारण अधिक भांडवल घातलें. याचा परिणाम असा झाला कीं सुमारें वीस वर्षांत सुमारें १६॥ कोट रुपये केवळ हमीखातर सरकारला भरावे लागले त्याच वेळीं या देशांत भयंकर दुष्काळ पडल्यामुळें कंपन्यांना हमी बद्दल येवढी रकम देण्याला पैसे कोठून आणावे अशी सरकारला पंचाईत येऊन पडली व त्यामुळें हमी देण्याची योजना रद्द झाली. मग असें ठरलें कीं सगळ्या रेलवे स्वतः सरकारनेंच बांधाव्या आणि त्या साठीं वाटेल तर कर्ज काढावें किंवा खजिन्यांतली शिल्लक तिकडे लावावी काटकसरीसाठीं रेलवेची सडक अरुंद ठेवावी. याप्रमाणें कांहीं रेलवे बांधील्या गेल्या. पण या रेलवे बांधण्याची मोठी जबाबदारी घेण्यासही सरकार लवकरच कंटाळलें, आणि पुनः पूर्वींची हमी देण्याची पद्धतिच बरी असें वाटून पूर्वींपेक्षां कांहीं स्वलती कमी करून सरकारनें खाजगी कंपन्यांकडून बंगाल— नागपूर सारख्या कांहीं रेलवे करविल्या. कालक्रमानें लढाया व दुष्काळ बंद पडल्यावर खजिन्यांत शिल्लक राहिली, तेव्हां स्वतः रेलवे बांधण्याचें काम सरकारनें पुनः हातांत घेतलें. इतक्यांत हुंडणावळीचे भाव चढल्यामुळें अडचण येऊन पुनः सरकारचें मन पालटलें, आणि इ० स० १८९३ पासून ग्यारंटीचे ऐवजीं रिबेटची पद्धति सुरू झाली. सरकारनें जमीन फुकट द्यावी; कंपन्यांनीं रेलवेच्या छोट्या शाखा काढाव्या, आणि या शाखापासून मुख्य लैनीला जें उत्पन्न होईल त्यांतून शेंकडा १० टक्के ह्मणजे ४ टक्के व्याजपडे इतकी रक्कम मोठ्या रेलवेनीं धाकट्या रेलवेला द्यावी या कराराला रिबेट हें नांव आहे. या करारापासूनही सरकारला बरेच नुकसान सोसावें लागलें; आणि शिवाय यापासून रेलवेचा प्रसार व्हावा तसा मुळींच झाला नाहीं. तेव्हां सरकारनें रेलवे बांधण्याचें काम पुनः स्वतःच्या हातांत घेतलें. पण आतां सरकारला ग्रह अनुकूल झाले आणि सन १९०० पासून रेलवेच्या संबंधांत नुकसान न येतां उलट १ कोटीपेक्षां ज्यास्त नफाच होऊं लागला आणि तेव्हांपासून हिंदुस्थानांत रेलवेचा विस्तार धडाक्यानें करण्यास सरकारला हुरूप वाटूं लागला. पण आतां सरकारला असें वाटूं लागलें कीं रेलवेच्या मोठ्या सडका पक्क्या बांधण्यांत पैसा खर्च करण्यापेक्षा कमी खर्चाच्या लहान सडका केलेल्या अधिक चांगल्या. ह्मणून १९०८ सालीं हिंदुस्थानच्या रेलवेची चौकशी करण्यासाठीं स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं लॉर्ड इंचकेप व इतर यांची एक कमिटी नेमिली. या कमिटीनें असा रिपोर्ट केला कीं हिंदुस्थानाच्या विस्ताराच्या मानानें पुष्कळ अधिक रेलवे पाहिजे आहेत. तेव्हां सरकारनें त्या बांधण्यासाठीं अधिक रकमेची मंजुरी द्यावी. पण गेल्या दोनतीन वर्षांत सरकारला इतर कांहीं बाबतींत अनपेक्षित रीतीनें खर्च करावा लागल्यामुळें कमिटीच्या ह्मणण्याप्रमाणें रेलवेकडे अधिक खर्च फारसा करता आला नाहीं. सध्या माल नेण्याला पुरेसे डबे नाहींत भरी जो ओरड आहे तीही कांहीं अंशीं यामुळेंच आहे. असा हा हिंदुस्थानांतल्या रेलवेचा मोठा गमतीचा इतिहास आहे. या संबंधाचे आमचे विचार लवकरच आह्मी वाचकांपुढें मांडूं.

---

## साहित्याचे आदर्श.

प्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार लॉर्ड लिटन यानीं आपल्या एका कादंबरींत मनुष्य समाजाच्या भावी आदर्श स्थितीचें एक चित्र रेखाटण्याचा यत्न केला आहे. त्यांत त्या आदर्श समाजांतल्या व्यक्तिसंबंधानें त्यांनीं अनेक गमतीच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्या सगळ्या सांगण्याचें हें स्थल नव्हे. तथापि एका गोष्टीचा मात्र येथें उल्लेख करतों. ती गोष्ट ही कीं त्या समाजांतल्या लोकांना शेक्सपियरचीं नाटकें वाचून आनंदावाचून दुसरी कशाची प्राप्ति होत नाहीं. आरबी भाषेंतल्या सुरस व चमत्कारिक गोष्टी वाचून सामान्य माणसाला जसा करमणुकी पलीकडे कांहीं लाभ घडत नाहीं तशीच गोष्ट त्यांची शेक्सपियरच्या ग्रंथाविषयींची आहे. आज आमचें मन शेक्सपियरच्या वाचनांत जें गढून जातें तें केवळ मनोरंजनाखातर नव्हे, तर शेक्सपियरनें आपल्या कल्पनेनें बनविलेली सृष्टि ही सध्याच्या खऱ्या प्रपंचाची हुबेहुब प्रतिकृति आहे अशी प्रतीती त्याचे ग्रंथ वाचतांना आह्मांस पावलोपावलीं येते ह्मणून एखाद्या परिचित माणसाला प्रत्यक्ष पाहून जितका मनुष्याला आनंद होतो, त्यापेक्षाही ज्यास्त आनंद त्याचा कुशल चित्रकारानें हुबेहुब काढलेली तसबीर पाहून होत असतो. तसें शेक्सपियरच्या वाचनाचें आहे. पण आमच्यांतल्या दुराकांक्षा, लोभ, संशयवृत्ति, स्पर्धा, द्वेष इ० मनोवृत्ति एकदा मावळल्यावर मग जर शेक्सपियरचे ग्रंथ वाचण्यास कोणी हातीं घेतले तर त्याला त्या ग्रंथांत अगदींच निराळी सृष्टि दिसूं लागेल, आणि अरेबियन नाईटसमधले एका डोळ्याचे राक्षस, किंवा जादुगाराच्या चमत्कृति जनक कृति इ० प्रकार वाचून जशी आपली आज निवळ करमणूक मात्र होते तशी शेक्सपियरच्या ग्रंथाची स्थिति होईल. आज त्या ग्रंथाना विद्यमान संसाराचें चित्र ह्मणून जो मान आहे तो यापुढें त्यांना न मिळतां केवळ करमणुकीचीं साधनें येवढाच त्यांचा उपयोग राहील. युरोपांत ही स्थिति केव्हां येईल तें सांगता येत नाहीं. पण आमच्याकडे मात्र असा दिवस लवकरच येणार आहे असें दिसतें. कॉलेजांत असतांना शेक्सपियरचीं नाटकें वाचून मनाला जो आनंद वाटत असे, तो आनंद कालक्रमानें मावळत चालला आहे आणि आपल्या हिंदुत्वाचा आदर्श त्याची जागा पटकावून त्याला मागें मागें लोटीत आहे. शेक्सपियरविषयींचा पूज्यभाव त्यामुळें जरी आमच्या मनांतून गेला नाहीं, तरी पूर्वींची ती आमची मनोवृत्ति आतां राहिलेली नाहीं असा अनुभव पुष्कळांना खास आला असेल आतां आमच्या मनाला शेक्सपियर वाचून जें काय वाटतें तें हें कीं पाश्चात्य जगताचें मन फार कठोर आहे. तीव्र स्पर्धा, जयाकांक्षा, आणि अहंकार यांचें दुर्भेद्य पटल त्या समाजाच्या मनावर चढलें आहे. तें इतकें कीं शेक्सपियरच्या तीक्ष्ण मर्मभेदी वाक्शस्त्रांनीं सुद्धां त्याचें छेदन करून आंतल्या रसाचा झरा बाहेर काढणें मोठें दुष्कर झालें आहे. भयंकर संघर्ष, तीव्र आणि मर्मभेदी वाक्य आणि ज्वालामय हृदयभेदी वियोगांत परिसमाप्ति यानीं सुद्धां त्याच्या मनांला करुणेचा पाझर फुटत नाहीं. अर्थात अशा समाजांतल्या कवींना व नाटककारांना त्या लोकांच्या हृदयवृत्ति हलवून सोडण्याला महत्प्रयास पडत असले पाहिजेत. त्यांच्या कादंबऱ्यातून दुःखें, विपत्ति, संकटें यांचें उत्कट चित्र काढण्याचा जो परमावधीचा यत्न दिसतो त्याचें कारण त्या समाजाच्या हृदयाचें काठिन्य हें असलें पाहिजे. पण आमची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. अहंकार, स्पर्धा, प्रभृति राजसगुणांपेक्षां आमच्या प्राचीन कवींनीं सात्विक गुणांचाच महिमा अधिक गाइला आहे. आमच्यांतल्या गृहस्थाश्रमी माणसाचा आदर्श पहा. तो आत्मसंयमनपर, उदारवृत्तीचा, निरभिमानी, आणि सदय असा असावयाचा. आमच्या मनाची कोमलता इतक्या लांबच्या पल्ल्याला गेली आहे कीं तिला दोषाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आह्मी लोक अकर्मण्य, आमचे हातून कोणतेंही धाडसाचें, किंवा साहसकर्म घडणें बहुधा अशक्यच आहे असा आमच्या संबंधानें टीकाकारांचा आक्षेप आहे. आह्मी या प्रपंचाच्या जीवनकलहांत मागें मागें पडत चाललों आहों. इतर राष्ट्रें भराभर पुढें चाललीं आहेत, आणि आह्मी मात्र एकेक पाऊल मागें मागें सरत आहों. ही आमची दुर्दशा ह्मणा, सुदशा ह्मणा, होण्याकारण—अंशतः तरी— आमचा मायावादावरचा भरवसा हें आहे. प्रत्यक्ष गोष्टींचा आह्मी विचारच करीत नाहीं. जन्मांतरीच्या कर्मांचीं फळें भोगल्यावाचून सुटका नाहीं, व्यर्थ धडपड केल्यानें तीं चुकणार नाहींत अशी मनाची दृढ समजूत झाल्यावर सद्यः प्राप्त स्थितीच्या निराकरणाचे प्रयत्न मनुष्याच्या हातून होणें शक्यच नाहीं. ईश्वर करतो तें बरेंच करतो, त्याच्या इच्छेपुढें आपल्या प्रयत्नाची काय मात्रा चालणार आहे? बहुजनसमाजाच्या मनाची ही स्थिति असल्यावर त्या समाजाच्या हातून कोणतेंही धाडस किंवा साहसकर्म घडलें नाहीं तर त्यांत आश्चर्य कसलें? साहित्य हा एक समाज स्थितीचें प्रतिबिंब दाखविणारा आरसा आहे. जसा समाज असेल तसें त्याचें प्रतिबिंब त्यांत दिसतें. आमचें साहित्य व पाश्चात्यांचें साहित्य यांच्यांत जें जबरदस्त अंतर पडलें आहे तें केवळ मनुष्यांच्या वरवरच्या वर्त-

नामुळें पडलें आहे अशी पुष्कळांची समजूत आहे, पण ती साफ चुकीची आहे. हा भेद प्रकृतिमूलक आहे, कृत्रिम नाहीं.

---

## कायदे कौंसिलाचे नियम.

लॉर्ड मॉर्ले यांनीं कौंसिलाच्या सुधारणे या उदार योजनेनें आपलें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें आहे. या त्यांच्या योजनेचे मूळ उद्देश पुढें झालेल्या नियमांत पूर्णपणें उतरले नाहींत ही दुर्दैवाची गोष्ट आहे, तथापि हे नियम कालक्रमानें अनुभवांतीं फिरवतां येतील असें त्यावेळचे व्हाइसराय लॉर्ड मिंटो यांचें अभिवचन होतें आणि तें अभिवचन खरें करण्याची वेळ आतां आली आहे. लॉर्ड मोर्ले यांच्या कौंसिल ॲक्टाप्रमाणें नवीन कौंसिलरांची निवडणूक यंदा व्हावयाची आहे. अशा वेळीं सदर नियमांत काय काय फेरफार होतात इकडे आतां सर्वांचे डोळे लागणें स्वाभाविक आहे. सध्याच्या नियमांत दोन बाबतींत विशेषें करून फेरबदल व्हावयास पाहिजे आहे. पहिली गोष्ट सुशिक्षित लोकांचे प्रतिनिधि ज्यास्त निवडले गेले पाहिजेत व दुसरी गोष्ट मतदारांच्या संबंधांत हिंदु व मुसलमान यांच्यांत भेद ठेवून मुसलमानांना जे विशेष हक्क देण्यांत आले आहेत ही या दोन्ही बाबतींत कांहीं फेरफार करून सर्व प्रजेला संतुष्ट राखणें सरकारचें कर्तव्य आहे. यासाठीं सरकारनें योजिलेले नियमातले फेरफार मंजूर करण्यापूर्वीं लोकनायकांची सल्ला विचारणें अगत्याचें आहे. या बाबतींत बंगालचे नवे गव्हर्नर लॉर्ड कारमायकेल यांनीं प्रशंसनीय उदाहरण घालून दिलें आहे त्याचेंच अनुकरण लॉर्ड हार्डिंज करतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे. लॉर्ड कारमायकेल यांनीं लोकमत स्पष्टपणें कळावें ह्मणून मुद्दाम बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी व ना. भूपेंद्रनाथ बोस यांस दार्जिलिंग येथें बोलावून नेऊन त्यांच्याशीं या विषयासंबंधानें मोकळेपणानें चर्चा केली व सध्याच्या नियमांत कोठें फेरफार करावयास पाहिजेत ते सरकारपुढें मांडण्याची संधि बंगालच्या या दोघा पुढाऱ्यांस दिली. त्याचप्रमाणें बंगाल्यांतले जमीनदार, व सरकारी अधिकारी यांचें कान्फरन्सही भरविलें. लॉर्ड हार्डिंज तीच गोष्ट एकंदर हिंदुस्थानासंबंधानें करून ठळक ठळक देशी लोकनायक व सरकारी अंमलदार यांचें कान्फरन्स भरवून त्यांच्याशीं या नियमां संबंधानें चर्चा करतील व त्यांचा सल्ला घेतील तर सध्याच्या नियमांमुळें सुशिक्षित वर्ग व हिंदु किंवा मुसलमान इतर धर्मांचे लोक यांच्या संबंधानें अन्याय घडत आहे तें लाट साहेबांच्या चांगलें नजरेस येईल. चेंबर्स ऑफ कॉमर्ससारख्या मूठभर युरोपियन लोकांच्या संस्थांना आपले प्रतिनिधि कौंसिलांत पाठवितां येतात, आणि युनिव्हर्सिट्यासारख्या सुशिक्षितांच्या संस्थाना मात्र आहे. विण नाहीं याला काय ह्मणावयाचें लाविली हे मुसलमा[illegible]

नांची संख्या हिंदूंपेक्षां कमी ह्मणून त्यांच्या हक्काला जपण्यासाठीं त्यांना प्रतिनिधि निवडण्याचा विशेष हक्क जर द्यावयाचा, तर जेथें मुसलमानापेक्षां हिंदूंची संख्या कमी आहे अशा ठिकाणीं हिंदूच्या हक्कांना जपण्यासाठीं तसाच विशेष हक्क हिंदूंना मिळूं नये हा पंक्तिप्रपंच नव्हे काय? सर्व प्रांतांतल्या लोकनायकांना बोलावून त्यांच्या सल्ल्यानें नवीन नियम केल्यावर अन्यायाच्या ओरडीला व असंतोषाला जागाच राहणार नाहीं यासाठीं सर्वांचें एक कान्फरन्स भरविण्याची सूचना आह्मी करीत आहों. लॉर्ड हार्डिंज साहेबांचे इकडे लक्ष जाईल अशी आह्मी आशा करतों.

---

## यात सत्य किती आहे?

बंगालच्या इशान्य दिशेला आबोर नांवाचे डोंगरी लोकांचा प्रदेश आहे. गतवर्षीं डा. ग्रेगर्सन व मि. विल्यमसन या दोघां इंग्रजांचा व त्यांच्या बरोबरच्या कांहीं देशी नोकरांचा खून केल्याच्या आरोपावरून हिंदुस्थान सरकारनें मेजर जनरल बॉवर यांच्या आधिपत्याखालीं त्यांचेवर हल्ला करण्यासाठीं सैन्याची एक तुकडी पाठविली होती. या तुकडीनें आपलें काम फते करून परत मोर्चा नुकताच फिरविला आहे. या स्वारीसंबंधानें कांहीं कागदपत्र नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत. पण कलकत्याचें 'इंग्लिशमन' पत्र ह्मणतें कीं प्रसिद्ध झालेले कागदपत्रांतला कांहीं भाग गहाळ झालेला आहे! हा आरोप कितपत खरा आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं. ह्मणून 'इंग्लिशमन' पत्र काय ह्मणतें तें जसें तसेंच येथें देतों:—

"पुष्कळ विलंबानंतर स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं आबोरांच्या मुलुखावर स्वारी करण्यास जेव्हां मंजुरी दिली, तेव्हां सरहद्दीवरच्या प्रकरणाचा शेवटचा निर्णय आतां होणार असें पुष्कळांना वाटलें. या स्वारीचा उद्देश आबोरांनाच शिक्षा करण्याचा होता ही गोष्ट खरी आहे. पण ज्या जंगली लोकांत हे आबोर लोक प्रमुख आहेत अशा इतर जंगली लोकांवरही या स्वारीमुळें वचक बसेल असें सर्वांना वाटलें होतें. या आबोर स्वारीबरोबरच मिरी आणि मिश्मी यांच्या देशांत सर्व्हे करणारी एक टोळी जाईल असें सरकारनें जाहिर केल्यावरून ही गोष्ट सरकारनें मनावर घेतली आहे असें दिसून आलें. पण पुढें पाहतों तों काय? पहिली गोष्ट या स्वारीनें इंग्रजच्या प्रबलतेची छाप आबोरांवर पडावी तशी मुळींच पडली नाहीं,.......आणि त्या लोकांना शिक्षा घडली नाहीं मारल्या गेलेल्या लोकांची खाजगी जिंदगी अद्याप आबोरांच्याच हातांत आहे; आणि डॉ० ग्रेगर्सन यांना मारणाऱ्या व त्यांची छावणी लुटणाऱ्या लोकांचे गांवाशेजारीं इंग्रजांचें सैन्य तीन महिने तळ देऊन राहिलें तरी त्या गांवांत जाण्याचा प्रयत्न कोणीं केला नाहीं. त्या देशाची भूगोलविषयक माहिती मिळण्याकरितां गेलेल्या पार्टीला ऐन रंगाचे वेळीं हिंदुस्थानसरकारनें परत बोलाविलें आबोर लोकांशीं इंग्रजांनीं हें सौम्यपणाचें वर्तन ठेविलें त्याचा परिणाम असा झाला कीं मिरी जातीच्या लोकांनीं शोध करण्यासाठीं आलेल्या सर्व्हे पार्टीवर हल्ला केला. हा हल्ला मागें परतविण्यांत आला, पण तितक्यांत याही टोळीला परत फिरण्याविषयींचा हुकुम येऊन थडकला. यावरून इंग्रज आपणांस भितात अशी आबोरांची समजूत झालेली दिसते. या सर्व चुकांवर कळस चढविणारी चूक ह्मणजे आबोर लोकांच्या हालचालींवर नजर ठेवण्याला सोयीचें ठिकाण—रोटुंग— हेंही सोडून देण्यांत येणार आहे."

---

## राजकीय कैदी.

मद्रास इलाख्यांतले मि० चिदंबरम् पिले यांना राजद्रोही भाषण केल्याच्या गुन्ह्याबद्दल काळेपाण्याची शिक्षा झाली असता त्याना हिंदुस्थानांत सक्त मजुरीच्या कैद्या प्रमाणें कां वागविण्यांत येते? याबद्दल पार्लमेंटांत नुकतेंच प्रश्नोत्तरें झालीं, त्यावरून राजकीय कैद्यांविषयींच्या हिंदुस्थानच्या कायद्यांतच दोष आहे व त्याची सुधारणा होणें अवश्य दिसतें. लवकरच या संबंधाचें बिल कोणा बिनसरकारी सभासदांनीं वरिष्ठ कायदेकौंसिल पुढें आणून इष्ट सुधारणा घडवून आणावी अशी आमची सूचना आहे. या बाबतींत इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यांत केवढी तफावत आहे हें दाखविण्यास विलायतेंत नुकतेंच घडलेलें एक उदाहरण घेऊं. टॉम मॅन नांवाच्या एका माणसानें संप करणाऱ्या मजुरावर तुह्मी गोळी घालूं नका असा लष्करी शिपायांस उपदेश केला, हें कृत्य राजद्रोहाखालीं येऊन त्यांस त्याबद्दल फक्त सहा महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा झाली. याहून बऱ्याच कमी भयंकर स्वरूपाच्या राजद्रोहाच्या गुन्हेगारास हिंदुस्थानांत चार महा वर्षें सक्तमजुरी किंवा काळेपाणी अशा शिक्षा झाल्या आहेत! इतकी स्वल्प शिक्षा टॉम मॅनला मिळाली आहे. तरी त्यानें इंग्रज लोकांचें समाधान न होऊन ते त्याची अजीबात सुटका करण्यासाठीं आकाश पाताळ एक करीत आहेत. भूतदयेची प्रेरणा ही या उद्योगाच्या मुळाशीं आहे हें उघड आहे. पण तीच इंग्रज लोकांची भूतदया हिंदुस्थानच्या वाट्याला येत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट ह्मटली पाहिजे. राजकीय कैद्यांच्या वागणुकी विषयीं इंग्लंडचे माजी मुख्य प्रधान मि० डिझरायली (लॉर्ड बीकन्सफील्ड) यांनीं जें उत्कृष्ट तत्त्व आपल्या एका भाषणांत सांगितलें होतें तें विचार करण्यासारखें आहे. ते ह्मणाले कीं अशा राजकीय कैद्यांना देण्याची योग्य वागणूक ह्मणजे त्यांस शिक्षा देणें नव्हे, तर राजद्रोही मतांचा प्रसार त्यांना करतां येऊं नये इतका निर्बंध त्यांचेवर ठेवावयाचा येवढेंच. हेंच तत्त्व युरोपांतल्या इतर देशांतूनही पाळण्यांत येतें. आस्ट्रिया, जर्मनी, फ्रान्स, इटली, व हॉलंड या देशांतून राजकीय कैद्यांना नुसती अटक आहे. पण हिंदुस्थानांतला प्रकार सगळाच विचित्र! येथें कायद्यानेंच त्यांना खुनी, चोर, बदमाष वगैरे लोकांच्या पंक्तीला बसवून त्यांच्याकडून सक्त मजुरी घेण्याचें ठरविलें आहे. असा कायदा रद्द करून युरोपियन राष्ट्रांतल्या राजकीय गुन्हेगारां प्रमाणें इकडेही त्यांना अधिक सौम्यपणाची वागणूक मिळवून देण्याची खटपट कोणी नामदार सभासद करतील तर पार्लमेंटांतल्या लेबर पक्षाकडून त्यांच्या प्रयत्नास खात्रीनें दुजोरा मिळेल.

---

## लोक शिक्षण व सरकार.

सध्या हिंदुस्थानाला कोणती एक गोष्ट मुख्यत्वें करून पाहिजे असा कोणी प्रश्न केला तर आह्मी एका शब्दांत त्या प्रश्नाचें उत्तर देऊं. तें उत्तर ह्मणजे लोकशिक्षण हें होय. हल्लींचें महागाईचें शिक्षण सामान्य लोकांच्या आटोक्यांतलें नाहीं. आमची शिक्षणपद्धति ही सदोष आहे. शिक्षणाचीं साधनें ही इकडच्या लोकांना दुष्प्राप्य आहेत या गोष्टी ना० मि० गोखले यांनीं सिद्ध करावयास नकोत. खुद्द सरकारचे शिक्षणखात्याचे रिपोर्टच याची साक्ष देण्यास पुढें येतील. इतर देशाच्या मानानें आमचें सरकार शिक्षणाकडे किती कमी पैसा खर्च करतें या विषयींचें आंकडे पाहिले तर असें दिसतें कीं अमेरिकेंत दरमाणशीं १६, शिलिंग, स्विझर्लंडांत १३॥, आस्ट्रेलियांत ११, इंग्लंडांत १०, स्काटलंडांत ९॥॥, जर्मनींत १०॥॥, नार्वेत ९, फ्रान्सांत ४॥॥, जपानांत १॥ आणि राशियंत १, शि० २ पेन्स या प्रमाणें प्रमाण असतें. तेंच हिंदुस्थानाकडे पहा! हिंदुस्थानांत हा शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च माणशीं फक्त ७॥ पेन्स आहे! कोठें १६ शिलिंग आणि कोठें ७॥ पेन्स. पंचवीस पटींचें अंतर! अलीकडे सरकारनें शिक्षणाकडे सढळ हातानें खर्च करण्यास सुरुवात केली आहे हा सढळपणा आणखी दसपट वाढला तरी हिंदुस्थानांतला एकूण एक मुलगा शाळेस जाऊं लागला अशी स्थिति येण्यास कित्येक पिढ्या जाव्या लागतील!

---

## राव बहादूर

[ रमा होय दासी ]

कांहीं रत्नें विलक्षण असतात. तीं थापल्या किंमतीला बाजारांत क्वचितच जातात. त्यांच्या तेजाची ओळख पटतांच त्यांस संग्रहित करण्यास रत्नपारखी आनंदानें धांव घेतो. तसाच प्रकार रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांस 'राव बहादूर' करितांना आमच्या स्थानिक सरकाराचा झालेला आहे. श्रीमंत चक्रवर्ती बादशहाच्या ४८ व्या वाढदिवसाच्या सुमुहूर्तावर आमचे परम पूज्य नागरिक राजश्री आण्णासाहेब यांस हा किताब देण्यांत आला आहे. हे गृहस्थ ह्मणजे आमच्या प्रांताचें भूषण किंवा वैभव आहेत. यांचें चरित्र ह्मणजे वऱ्हाड प्रांतांतील देवकार्याची श्रीशिवराम मुखमुख सर्वच ब. ३२९ तेजा[illegible]

त्या आहेत असें दिसून येईल. हे स्वभावानें हंसवृत्ति आहेत. विहिरींतलें उदक जसें वर काढावयाचें तसें हे नेहमीं आपले अप्तमित्र परिचित व कोणत्याहि संबंधांत येणारे कोणीही जन यांच्या मधील सद्गुण प्रकाशांत आणितात. त्यांचें वर्धन करितात व त्यांस उपयोगांत आणितात. मंगल गोष्टींचे प्रवर्तक व प्रेरक या दृष्टीनें समाजातील सर्व बाजूंच्या चळवळींमध्यें तें अंतर्यामी असतात. सुधारकांचे पुरस्कर्ते हे आहेत, राष्ट्रीय चळवळीचे मार्गदर्शक आहेत, किंबहुना जहाल व मवाळ हे दोघेही त्यांच्या संस्कृतीनें चांगल्या प्रेरणा पावतात. अशा आनंदाचा अनुभव या थोर महात्म्याच्या परिचयामध्यें आहे आणि म्हणूनच हे जगन्मित्र आहेत. त्यांची दिनचर्या म्हणजे सहज योगाची प्रसन्न स्थिती होय. कोणीहि त्यांच्या कक्षेंत क्षणभर गेला तर तो आनंदानें व नवीन प्रेरणेनें परत येतो. कदाचित् याच वैचित्र्यामुळें ते राजदरबारीं किंवा लौकिकी रहदींत थोडेबहुत मागें पडत असत. शिक्षक इतके उत्तम कीं शिष्यांत हेच परीक्षेला जात आहेत कीं काय असा भास होई यांनीं इनस्पेक्टरीचे व डायरेक्टरीचे अधिकार असे चालविले कीं जणू काय हे अधिकारी नसून निगर्वी व प्रेमळ मार्गदर्शक मित्र असत. सार्वजनिक कार्यांत हे पुढारी खरे पण स्वस्थतेनें व शांततेनें गाडी हाकतांना सर्वांसच असें भासवित कीं खरे अधिकारी आपण सर्वजणच आहोत. प्रेम ही यांच्या आयुष्याची गुरुकिल्ली आहे आणि निस्पृहता, सत्यनिष्ठा व कार्यदक्षता या सद्गुणांनीं त्यांची स्फूर्ती बायकामध्यें, मुलाबाळामध्यें व शूद्रादिकामध्यें हि सारखीच आनंदप्रद होत असते. सुखांत काय व दुःखांत काय, हे सारखेच सौजन्यानें खेळत असतात. अशा सद्गृहस्थांस रावबहादुरीनें नवा तो काय मान मिळणार आहे पण त्यांच्या साहचर्यामुळें या बहुमानाची थोरवी वाढणार आहे. अर्थात ही राजाची श्री आमच्या आण्णासाहेबांस अलंकृत करितांना पाहून आह्मांस 'रमा होय दासी' या उक्तीची आठवण व सत्यता विशेष वाटते.

---

## मुसलमानी धर्माची नीतितत्वें.

हिंदुस्थान रिव्ह्यूच्या दरबारी अंकांत मि० अब्बास एम् तयबजी बॅरिस्टर यांनीं मुसलमानी धर्माचे नीतितत्वासंबंधानें एक लेख लिहीला आहे. तो लेख फारच वाचनीय आहे. त्यांनीं ह्मटल्या प्रमाणें हिंदु आणि मुसलमानाचे परस्परांतील द्वेषाचें कारण परस्परांचे धर्मतत्वाचें अज्ञान, हेंच होय. हें अज्ञान जसजसें दूर होईल तसतसें त्यांचे मध्यें भ्रातृभाव जास्त जास्त खात्रीनें वाढून त्यांचे मधील परस्परा विषयीचा गैर विश्वास दूर होईल. [illegible] मुसलमान राजपुरुषानीं दंडेलीवर [illegible] त्यांचीं मनें कलुषित तें त्याचें नांदात लागलो आहे. कायमच्या नाझी बदलाची करणें लागिली हे [illegible] तें इंग्रजी पुस्तकांपासून असतें. ह्मणून त्यांनीं खिश्चन नीतीतत्वांशीं तुलना करून मुसलमानी धर्मांतील नीतितत्वाविषयीं लिहिलें आहे.

इस्लामी धर्म देखील "दहा आज्ञा" मानतो. परंतु त्या आज्ञा व्यवहारोपयोगी होतील अशा तऱ्हेनें इस्लाम यांनीं त्यातील नीति नियमाची मांडणी केली आहे. नीतिसिद्धांत नुसते सांगण्या करितां अति उच्च असतील, आणि त्यांचा आचारांत मानवी स्वभावानुरूप उपयोग होणें अशक्य आहे तर ते जनतेस सांगून त्याचा उपयोग काय होणार. एखाद्या विशिष्ट जातीची नीतिमत्ता त्या त्या जातीची शारीरीक वाढ वगैरे अनुषंगीक गुणावर अवलंबून असते. त्याचे परिस्थितीस प्रतिकूळ अशा तऱ्हेचा नीतिसिद्धांत त्यास सांगून त्याचा काय उपयोग होणार व जरी कदाचित् सांगितला तरी तो आचारांत कसा येणार. इस्लाम यानें जे सिद्धांत सांगितले ते ख्राइस्ट प्रमाणें अति उच्च व केवळ काल्पनिक असे न सांगता परिस्थितीस अनुसरून सुलभ रीतीनें सांगितले. ख्राइस्टनें सांगितलें आहे कीं "दुष्टाचा प्रतिकार करू नको, परंतु तुझे उजवे गालावर मारलें असतां दुसरा गाल पुढें कर" "तुझा कोणी कोट घेईल तर तूं आपली चोंगडीसुद्धां दे" अशा तऱ्हेचा उपदेश इस्लाम यानें आरबलोकांस केला असतां तर त्याचा उपयोग काय झाला असतां? त्याचे अंगीं कितपत शांतता आली असती. इस्लाम याचा उपदेश पॅलस्टाईन मधील अत्यंत दीन झालेल्या लोकांस नसून विलक्षण कडव्या अशा आरबास होता. सर्व ख्रिश्चन राष्ट्रें या नीति मालेचें पठण करितात, परंतु दोन हजार वर्षांत तसें वागण्याचा कोणीही प्रयत्न केला नाहीं.

'जशास तसें' हा जो सेमिटिक जातीचा नीति सिद्धांत होता त्याचें उग्र स्वरूप कमी करण्या कडे इस्लामाचें लक्ष होतें. इस्लाम यानें सांगितलें आहे कीं 'तुझा बदला घेण्याचें सामर्थ्य आहे तरी बदला घेऊं नको कारण जो क्षमा करितो त्याजवर परमेश्वर कृपा करतो. जर शक्य असेल तर उलट अपराध करणारांचें चांगलें करावें, कारण परमेश्वर उदार अंतःकरणाचे मनुष्यावर प्रेम करतो' या संबंधानें पैगंबरांचे चरित्रांतील फार मनोरंजक दोन गोष्टी आहेत. इ. सनानंतर ६३० वे वर्षी मसलमान लोकांनीं मक्का शहर जिंकले. मक्केतून मुसलमान लोक पळून जाण्यापूर्वी ज्या हजारो लोकांनीं मुसलमानांचा छळ केला होता त्यामध्यें चववे सांपडले होते. या चौघांत एका मनुष्यानें पैगंबराचे मुलीस ठार मारलें होतें. तो पैगंबराचे हातांत सांपडला होता. त्यास त्याचे गुन्ह्याबद्दल शिक्षा करणें किंवा क्षमा करणें पैगंबराचे इच्छेवर होतें. तूं तिला काय सबब मारलें? असें विचारता, तो मनुष्य ह्मणाला, महाराजें, तिला ठार मारण्याचा माझा उद्देश नव्हता. मी आपल्या भाल्याचें काठीचे मागील टोकानें तिचे उंटावर मारलें, परंतु दुर्दैवानें ती स्त्री उंटावरून खालीं पडली व मरण पावली. अरब नीतिप्रमाणें कोणत्याही कारणानें मृत्यु घडल्यास तो खून समजला जात असे परंतु पैगंबरानें "उलट बदला न घेता, 'क्षमा करतो त्याजवर परमेश्वर प्रेम करतो" ह्मणून त्यास क्षमा केली.

इमाम हसनसंबंधानें एक गोष्ट आहे. एके वेळ तो आणि दुसरी मंडळी जेवणास बसली असतां त्याचा गुलाम गरम आमटीचें पातेलें आणितां आणितां इमाम हसनच्या आंगावर धक्का लागून पडला. व सर्व गरम आमटी त्याचे आंगावर सांडली. आपला मालक आपणास पाहिजे ती शिक्षा देऊं शकतो हें त्यास माहीत होतें. लगेच त्या गुलामानें गुडघ्यावर पडून वर लिहिलेल्या नीति नियमाचा पहिल्या भागाचा उच्चार केला. तो उच्चार करताच इमाम हसेन यानें नम्रतेनें मी 'तुला क्षमा करतो' असें ह्मटलें. लगेच गुलामानें "शक्य असल्यास परत उपकार कर कारण तसें करणाऱ्यास ईश्वर प्रेम करतो." याचा उच्चार केला. त्यावरून इमामहसेन यानें त्या गुलामास गुलामगिरींतून मुक्त केलें.

यावरून महमद पैगंबर यानें सांगितलेलीं नीतितत्वें किती तरी उदात्त आणि व्यवहार उपयोगी आहेत हें समजून येईल.

इस्लाम याची राजनीतितत्वें तर फार विचारणीय आहेत. राजशासनाबद्दल जो कांहीं गैरसमज आहे तो मुसलमान बादशहांचे गैरवर्तनानें उत्पन्न झाला आहे. बॅरिस्टर तयबजी यांनीं तीन गोष्टींबद्दल विचार केला आहे. १ धर्मौदार्य २ इस्लामी आमलांतील इतर जातींचे लोकांचे हक्क. ३ युद्धनीति. मदिना येथील राजसूत्रें पैगंबराचे हातीं आलीं तेव्हांचें स्थितीकडे लक्ष दिल्यास समजून येईल कीं रोमन बादशाही नाहींशी झाल्यापासून धर्मौदार्य असे मुळींच राहिलें नव्हतें.

अपूर्ण

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— गेल्या शनिवारीं सायंकाळीं एक चांगला पाऊस पडला व हवेतला थंडोसाच सांगतो कीं मृगनक्षत्राची शीतलता सर्वत्र झाली आहे. रोगराई कांहीं नाहीं.

रा० रा० रामराव दीनानाथ पांडे सबजज आकोला यांस वर्धा येथें डिस्ट्रीक्ट जज नेमण्यात आलें. आणि रा० रा० अबदूल हादी मुनसफ यांस पुन. येथेंच सबजज करण्यांत आलें.

मेजर ड्रायडन साहेब डिपुटी कमिशनर, आकोला हे गेल्या शुक्रवारच्या मेल गाडीनें सहा आठवड्यांच्या रजेवर विलायतेकडे रवाना झाले. प्रकृतीच्या स्वास्थ्या निमित्त आणि कांहीं घरगुती कामकाजा निमित यांनीं रजा घेतली आहे तेव्हां त्या प्रमाणें त्यांस विश्रांती व सौख्य हीं पूर्णपणें लाभोत असें आह्मी इच्छितों.

वरील रजेंत रा० रा० सोराबजी शापुरजी सबडिव्हीजनल मॅजिस्ट्रेट हे आफिशिएटींग डेपुटी कमिशनरचें काम पहाणार आहेत हें कळविण्यांस बहुत संतोष वाटतो. हा हस्सकाईन [illegible] बहुमान होय.

रा० रा० ब्राऊन साहेब आसि० कमिशनर हे यवतमाळच्या डिपुटी कमिशनरीचा कारभार खानबहादूर सय्यद मोईनुद्दीनखान यांच्या हवाली केल्यानंतर आकोल्यास दोन आठवड्यांत येऊन डिपुटी कमीशनर होतील.

---


## मोठी अडचण दूर झाली.

आजपर्यंत किर्लोस्कर बंधुंनीं तुमच्या बैलांस हलकीं जागारीं अशीं मोटेचीं चाकें तयार करून बैलांचे श्रम वाचविले. आतां तुम्हां स्वतःची आगर तुमचे घरांतील माणसांनीं मेहनत व वेळ वाचविण्यासाठीं घरांतील विहिरी करीतां लहानशीं परंतु मजबूत व ओढण्यास हलकीं जागारीं अशीं लोखंडी चाके (हातगडगडे) तयार केली आहेत. त्यावरनानें हातानें पाणी ओढण्याचे लांकडी सुधारलेल हातरहाटही केले आहेत. हाली उन्हाळ्याचे व पाण्याचे टंचाईचे दिवसांत सदरहु चाकांचा व रहाटांचा फार उपयोग आहे.

चाकाची किंमत रुपये ९

दोन रहाटांची किंमत रुपये १९

किर्लोस्करबंधु.

पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० २४८


---

## नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं कसबे फत्तेखेर्डा ता० मेहकर जि० बुलडाणा येथें गोविंदसा विष्णुसा आणि कंपनी या नावाची जिनिंग फ्याक्टरी आहे. त्या फ्याक्टरींत एक बायलर एक एंजिन व २० रेचे आहेत. हें सर्व यांत्रिक सामान व ज्या इमारतींत हीं सर्व यंत्रें आहेत ती इमारत व त्याशिवाय स्टोअर रुममध्यें वरील फ्याक्टरीचे उपयोगाचे व कांहीं जुने सामान आहे तें व शिवाय स्टोअर रुमची इमारत हीं सर्व जाहिर लिलावानें ता० ११-७-१२ रोजीं दुपारीं ११॥ व १२ वाजतां याचे दरम्यान जागेवर फत्तेखेर्डा येथें विकावयाची आहेत. मशिनरी सर्व दुरुस्त असून उत्तम काम देण्यासारखी आहे. करितां ज्याची ही फ्याक्टरी विकत घेण्याची इच्छा असेल [illegible]नीं सदहु ११ ७ १२ रोजी हरासाचे [illegible] हजर रहावे. सर्व जिनिंग फ्याक्टरी [illegible] अंदाजा किंमत १६००० पासून [illegible]००० रुपयेपर्यंत आहे. लिलाव तीनवार [illegible] रकम नगदी दिली पाहिजे; [illegible] प्रमाणें न दिल्यास फ्याक्टरीचा पुनः [illegible] होईल व त्यामुळें नुकसान [illegible] पैसे न भरलेल्या खरेदीदारास [illegible] लागेल. ता० १०-६-१२

A. R. Pimprikar
Receiver appointed
by the District Judge
Akola

[illegible] सं. ३ [illegible]

# जाहीरात.

## !!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

### !! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत. शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकिरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत. हे गूण आमच्या तपकीरींत एक वर्षेपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.




एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डझन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

[ सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिहींत आमचेवर दया करून लिहावें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ, मद्रास.

( MARATHI. ) नो. नं. ३०७

---

## नोटिशीचें उत्तर

नोटीस बेशमी जानकी मर्द सदु माळीन रा० रोहण ता० खामगांव

ईस:—

मी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते की वऱ्हाडसमाचारांतून ता० ३-६-१२ ईसवींत नोटीस दिली तींत मजकूर कीं तुह्मांस रक्तपितीचा आजार असल्यानें संसार होऊं शकत नाहीं व आजार नसल्यास सिव्हील सर्जन साहेबाचें सरटीफिकीट दाखवावें व अन्नवस्त्राबद्दल सावकाराचें कर्ज देऊन टाकावें ह्मणून वगैरे मजकूर त्यावरून लिहिलेला मजकूर अगदिच खोटा आहे. मी अजारी मुळींच नसून सरटीफिकीटाची मुळीच दाखविण्याची जरूर नाहीं. व तूं माझी लग्नाची बायको असल्यानें तुजला एक दोन वेळ आणलें होतें. त्यानंतर तूं गेल्यावर च्यार मंडळीसह घेण्यास आलो असतां तूं आली नसून व तुझ्या आईबापानें पाठविलें नाहीं. व त्यावेळीं तुजला व तुझे आईबापास सांगितलें होते कीं तूं जर येणार नाहींस तर तुजला माझे कडून अन्नवस्त्राबद्दल तुझा व तुझे वारसाचा हक्क मुळींच राहणार नाहीं वरून नोटीसीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासुन १५ दिवसाचें आंत तूं माझेवरीं यावे मी तुजला वागविण्यास तयार आहो व तुझे आईबाप दुसऱ्यासी गंधर्व लाऊन देऊन रूपये खाण्याचें खटपटीत आहेत. तें त्याचें नांदांत लागली आहे. विणाकारण माझी बदलामी करणें लाविली हे बरोबर नाहीं. जर तूं न आलीस तर सरकार मार्फत ताब्यांत घेऊन व कोर्ट खर्च जो लागेल तो व नोटीसीचा खर्च तुमचे जवळून भरून घेतला जाईल. कळावें तारीख १०-६-१२ इ०

सही.

सदु वा॥ परशराम माळी रा० पढूरजिरे याचे हातची नि० अंगे.
नो० नं० ३२४

---

## नोटीस

नोटीस बेशमी लाडोबाई जवजे मिश्रीचंद गुजराथी दुकान पेठ बाळापूर यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचेजवळ त्रिंबकराव बापुजी देशमुख निंबेकर याचे शेत मौजे निंबी ता० बाळापूर येथील स. नं. २८ यापैकीं दाहा एकर जमीन आह्मी त्रिंबकराव याजपासून खरेदी घेतली आहे. करितां या नोटिशीनें तुह्मास मुद्दाम कळविण्यांत येते कीं सदहु शेत तुमचेजवळ गहाण आहे तुमची रक्कम गहाणाची व कर्जरोख्याची देणें आहे तर तुह्मी तुमचे व्याजासुद्धां जी रक्कम आज मित्तीपर्यंत घेणे निघत असेल ती रक्कम आह्मास कळवावी. अगर ह्मणजे आह्मी तुह्मास आणून देतो. तुह्मी आमचेजवळून घेऊन जावे. करिता या नोटिशीनें कळविले आहे तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत घेऊन जावी आणि आह्मास पावती द्यावी. याप्रमाणें तुह्मी नाहीं कराल तर तुमचे रकमेचें व्याज बंद राहील पुढें तुह्मी फिर्यादवगैरे केल्यास त्याचा खर्चही मिळणार नाहीं. सबब नोटिशीनें कळविले आहे. कळावें ता० १२-६-१९१२

सही

मुगुटराव दलपतराव आ० पा० गोपाळराव बळीराम देशमुख निंबेकर द० मारोती परशराम गुमास्ता रा० निंबे ता० बाळापूर
नो० नं० ३२५

---

## नोटीस

रा. रा. जानजी वा॥ महीपती हटकर जात धनगर व आमृता वा॥ नागोजी लाहाने जात कुणबी उभयतां रा० मौजे पेनटाकळी ता० मेहकर जि० बुलढाणे यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी जे तुह्मास कुलमुखत्यारपत्र दिलें आहे ते आज ता० ३-६-१९१२ इसवीपासून रद्द केलें आहे. यापुढें तुह्मी माझे कुलमुखत्यार या नात्यानें कोणतीही कारवाई किंवा लिखापढी कराल तर ती मला कबूल नसून त्याची जबाबदारी तुमचेवर राहील कळावें ता ३-६-१९१२ इ.

सही

निशाणी बजाई मर्द जानजी घोंडगे रा० पेनटाकळी ता० मेहकर इचे हातची बांगडी
नो० नं० ३२६

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं रा० रा० जानजी वा॥ महीपती हटकर जात धनगर व आमृता वा॥ नागोजी लाहाने जात कुणबी उभयतां राहणार मौजे पेनटाकळी यांस माझे तर्फे जे कुलमुखत्यारपत्र होतें तें मी आज ता० ३-६-१९१२ ह्यापासून रद्द केलें आहे. यापुढें आमचेतर्फे कुलमुखत्यार यानात्यानें कोणतीही कारवाई किंवा लिखापढी करतील तर त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. कळावें ता० ३-६-१२ इ.

सही

नि० बजाई मर्द जानजी घोंडगे रा० पेनटाकळी ता० मेहकर इचे हातची बांगडी
नो० नं० ३२७

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस व शेट सावकार यांस व मौजे भाम येथील तेली मंडळी यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं मौजे भाम येथील आमचे स्वतःचें घर त्याची बहीण ह्मणजे माझी आत नामे अंबाई मर्द इयांगोजी सुतार इजला राहण्यास दिलें होतें. ती आतां वारली आहे. व माझा बापही वारला आहे. तिला फक्त घर राहण्यास दिलें होतें परंतु विक्री, गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देण्याचा अधिकार दिला नव्हता. इतके असतां तिचा मुलगा ह्मणजे माझा आतेभाऊ नामें रतन इयांगोजी व पांडू इयांगोजी यानीं तें घर विक्रीस काढले असल्याचे कळतें कारितां जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तें घर त्याजजवळून विकत, गहाण, खरेदी, बक्षीस अगर कोणत्याहीं रितीनें माझे सही शिवाय घेऊं नये घेतल्यास जो घेईल त्याजवर कोर्ट मार्फत योग्य तजविज केली जाईल व या नोटिशीचा खर्च व कोर्ट खर्च त्याजवळून भरून घेतला जाईल काळावें ता० ७-६-१९१२ इ०

सही.

वामन विठोबा सुतार रा० भाम ता० मुर्तीजापूर पो० धनज नि० आंगठा
नो० नं० ३२८

---

## जाहिर नोटीस

पारवतीबाई बापाचे नाव जानजी देशमुख राहाणार मौजे चरणगांव ता० बाळापूर जि० आकोला

इसः—

खालीं सही करणार यांचेकडून कळविण्यात येते कीं, मौजे चरणगांव येथील शेत

| | स. नं. | ए. गुं. | आ. रु. |
|---|---|---|---|
| शेत | ९२ | २६-३२ | ४० |

यांतील पश्चीम बाजुचा दोन जोडीचा हिस्सा ताडाचा नाऱ्याचे काठचा व आमचे घरापैकीं नीम्मे घर आणि मौजे दोलखेड येथील

| | स. नं. | ए. गुं. | आ. रु. |
|---|---|---|---|
| येथील | २५ | २७-२८ | २८ |

यातील एक त्रीतीऔंश हिस्सा पुर्वेकडील बाजूचा अशी आमचे मालकीची व आमचे ताब्यांत असलेली आह्मी तुजला तुझा वृद्धापकाळ असून कोणी पालन पोषण करण्यास नसल्यामुळें शेती वाहुन उपजीवीका करण्यास व घर राहाण्यास दिलें आहे मालकी व ताबा आमचा आहे तूं कोणतेच प्रकारची मालकीन नाहीं असे असतां आह्मी आतां असे ऐकतो कीं तूं वरील इस्टेट दुसऱ्यास गहाण, तोंडगहाण, पट्टेखत, खरेदी, बक्षीस यापैकीं कोणताही दस्तोऐवज पोकळ तुजला पैशाची जरूर नसतां करणार आहेस तर या नोटीसीनें कळवितो कीं अधीकार व मालकी नसतानां आमचे इस्टेटीचा असा कोणताही दस्तोऐवज करूं नये केल्यास तो बातल व रद्द समजला जाईल हि नोटीस दिली कळावें ता० १२।६।१९१२ इ.

सही

नामदेव लटुजी देशमुख चरणगांव
पुंडलीक शीवराम देशमुख
नो. नं. ३२९

## एकाच वस्तूपासून तीन देणग्या

सौंदर्य

आरोग्य

थोडा खर्च

जेव्हां तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखांना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतात:—काळे डाग, संधिवात, वशांतव्रण, पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, बद, फोड, चट्टे, आगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

### तर स्वत:चाच राजवैद्य बनून

रोग नष्ट करणें बरें नव्हे काय ?

डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

## आयोडाईझड सार्सापरीलानें

ते निखालस बरे होतात.

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

अनुभवतर पहा.

कि. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तम गुणास ४ बाटल्यांची पे. ख. सह किं. ४ रु.



### बालामृत हे काय आहे ?

अस्सल बालामृत हें

मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगांवर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, सपत्तन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे.

डा० गोखल एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें.

इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊं नका.

कि. ०१२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ता:--हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नो. नं. २८७



## इराणी बल

मोटारगाडी अटकावितां येते

( जोर ) साखळदंड तोडितां येतो !

इनाम रुपये ५०० !! इनाम रुपये ५०० !

प्राचीन इराणच्या रुस्तम व अस्पाद यार वगैरे बहादुर पहिलवानांची शक्ती ज्या योगानें जगविख्यात झाली तीं औषधें आह्मी हजारों मेहनतीनें मिळवरून आणलेलीं आहेत. गंधक सोडा दोन वस्तूंचे कुशलतेनें समिश्रण केलें ह्मणजे ज्याप्रमाणें फुलपावर दारू (Gun Powder) बनते त्याप्रमाणें सालममिश्री, दाक्षें, बदाम, पिस्ते, डाळिंब, सफरचंद वगैरे अत्यंत शक्तीवर्धक पदार्थांचें सत्व आह्मी शास्त्रीयरीत्या यंत्रानें बनविलेलें आहे. या पांच सात मेव्याच्या कुशल समिश्रणानें विद्युतशक्ती व जोर इतका उत्पन्न होतो कीं कसाही कमताकद मनुष्य असला तरी त्यांस तीन दिवसांत शक्ती येऊं लागते दहा बारा दिवस हे खाल्यावर चेहऱ्यावर लाली चढूं लागतें व गेलेली ताकद पुन्हां येतें. याच्या योगानें धातुपुष्टीही होतें. वृद्ध तरुण, स्त्री पुरुष या सर्वांस ही फायदा देणारी व मजेदार वस्तू आहे. दोन महिनें आमच्या सांगण्याप्रमाणें जर याचे सेवन झालें तर मनुष्य मोटारगाडी अडवूं शकेल व साखळदंड तोडूं शकेल खात्री पटविण्याकारितां हा जगविख्यात फळांचा मेवा आह्मीं समक्ष तीन दिवस फुकट खावयास देऊं या आमच्या मेव्यांत तांबे, पारा रुप्याचा भाग वगैरे रासायनिक द्रव्यें आहेत असें जो कोणी सिद्ध करील त्यास ५०० रुपये बक्षीस देऊं किंमत एक तोळ्याची २॥ रुपये हें पंधरा दिवस पुरतें. ॥. अर्धा रुपये १।=

बादशांही गोळी:—

१ गोळी खाल्यानें टिकाव व ताकत माहीती पडते:— किंमत १॥ रु. एक डझनची

### इराणी मर्दानी पट्टी.

या एकट्या पट्टीच्या योगानें मुंबईत हजारों माणसांचा फायदा झाला आहे. ज्या माणसाच्या (नसामध्यें) ताकद नाहीं. त्या माणसानें ही पट्टी सहा सात दिवस बांधली ह्मणजे त्यास जवान मनुष्याप्रमाणें ताकद येते. यापासून आग होत नाहीं किंवा फोड येत नाहीं जर कोणास या औषधाबद्दल भरवसा नसेल तर आह्मी कान्ट्रक्ट करून हें औषध पैसा घेतल्याशिवाय त्यास देऊं गुण आल्यावर पट्टीची किंमत व बक्षिस निराळें घेऊं कि. १० पटीची रु० ५ व पांच पट्टीची किं० रु. ३



खानदानी हकीम-सय्यद जाफर हुसेन तबरेजी ( इराण )

जाफरी दवाखाना जे जे. इस्पितलचे समोर जितेकराच्या नव्या बिल्डिंगच्या शेजारि पहिला माळा, मुंबई जाफरी दवाखान्यांत. नो० नं० १५७



ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

## सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[ १८६५ ]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

भांडवल तेरा कोटी रुपये.

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड नो. नं. १३



## Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

### FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in termes the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# जाहीरात.


## !!! डाक्टर जी. बी. यांची सुवासिक औषधी तपकीर !!!

### !! मागवा व खात्री करून घ्या !!




ह्या तपकीरीचा शेंकडों लेकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत. शिवाय वैद्य व डाक्टर लेकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशि, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणोंरें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत. हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २–८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बाळबोध लिपींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ, मद्रास.

नो. नं. ३०७



## नकली औषधानें फसू नका.

### डाक्टर चांदलीआ कृत प्रसिद्ध झालेलीं औषधें.

नपुसकत्व, नामर्दाई व नेभळेपणाचा समूळ नाश करून तारूण्यदशेची छटा फमटवून पूर्ण तरतरी व जोम आणणारी

### " बादशाही याकुती "

### ( सरकारी रजीस्टर नं. २२० आहे )

ही " याकुती " आजकाल कमताकत झालेल्या दुनियेला एक इश्वरी प्रसादच आहे. शिथिल झालेल्या शिरांना जोमदार बनविण्यांत, गेलेली स्मरण शक्ति परत भरपूर सजीव करण्यांत, अविचारानें धातुपात केल्यामुळें लहान वयांतच दिसणारी ह्यातारपणाची सर्व चिन्हें दूर करण्यांत, स्वप्नावस्था व लघवींतून जाणारी धातु बंद करण्यांत, विर्य वाहिन्यांना भरपूर विर्य पुरविण्यांत " बादशाही याकुती " ह्मणजे एक अमृत आहे. किं. डबी १ ची रु. १०

### कमजोरीवर " मदनमित्रलेप "

बाल्यावस्थेंत अविचारानें केलेला धातुपात शिथिलता ह्यांच्याकारितां तर हा लेप जणु काय अमूल्य रत्न व रामबाण उपाय होय. किं. डबी १ ची रु. २

### पू परम्यावर " प्रमेहान्तक "

जुन्या अथवा नव्या कोणत्याही प्रकारच्या हट्टी पू परम्यावर हें औषध थोड्या दिवसांत हटकून कायमचा गुण देणारा उपाय ह्मणावा लागतो किं. बा. १ चे रु. २

पत्ता:-- " चांदलीआ आणि कंपनी " काळ्का देवी रोड मुंबई.

नो. नं. ३३१


## नोटीस

| | |
|---|---|
| रा. रा. १ मारुती | वा॥ रामजी मानकर |
| " २ दत्तु | सर्वजण राहणार ख- |
| " ३ नारायण | डदगांव तालुका मल- |
| " ४ पंढरी | कापूर. |
| " ५ सदु | |

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तुमचे तीर्थरूप राजश्री रामजी कान्हुजी यांनीं जीवंतपणी तारिख ३०।११।१९०२ रोजीं आपली तीन खालील वर्णनाचीं शेतें आह्मांस ६ सहा हजार रुपयांस तोंडी विकत देऊन आमच्या ताब्यांत दिली. त्य शेताचें वर्णन येणें प्रमाणें:-

गोळेगांव बुजरुख तालुका जळगांव येथील

| स. नं. | ए. गुं. | आ. रु. | |
|---|---|---|---|
| ३० | ४८७ | ६ | सालीम |
| ३२ | ३९८२२ | ४६ | सालीम |
| २३ | ३१ | २७ | सालीम |

हीं शेतें तुह्मी आह्मास विकलीं पण आह्मा जवळ रोख नगदी रक्कम नसल्यामुळें तुमच्या वडिलांनीं सदर्हू रकमेला व्याज सुरू केंले आणि आमच्या कडून विक्रीच्या तारखेलाच ५१२ रुपये इसाऱ्याचे घेतले. बाकीची रक्कम फिटेपर्यंत आमच्याकडून तुह्मी रकमेच्या खात्रीसाठीं ह्मणून पोकळ दस्तेखत सालोसाल करून घेत आला आहां. सहा हजाराची रक्कम सव्याज चुकती दिल्या- नंतर तुह्मी खरिदीचा कागद आपल्या वडिलांच्या कबूलीप्रमाणें करून देण्याचें वारंवार अभिवचनहा देत आला आहां. आतां आमच्या समजुतीनें तुमची खरिदीची रक्कम तुमच्या घरांत गेल्या १० वर्षांत पोंचती झाली आहे. जर काहीं रक्कम हिशोबाअंती आह्माकडे निघेल तर ती आह्मी देण्यास तयार आहे. तुह्मी पंचा- समक्ष आपला हिशोब आणून आमची खात्री करून द्यावी व आपली रक्कम घ्यावी आणि आमच्या पांचजणांच्या नांवानें खरि- दीचा कागद लिहून नोंदून द्यावा. असें करण्याला तुह्माला १५ पंधरा दिवसाची मुदत दिली आहे. तुमच्या वडिलांचा व दुकानचा नावलौकिक मोठा असल्या कार- णामुळें आह्मी विशेष कागदपत्र करून घेतले नाहींत तथापि तुह्मां आपल्या वडि लांच्या श्रीदाल व प्रामाणीकपणाला जागून आमच्या खरिदीचा निकाल करावा नाहींतर दिवाणींत दावा करून नुकसानीसुद्धां व खर्चा सुद्धां सर्व दाद कोर्ट मार्फत मिळविण्यांत येईल. कळावें. ता. १२ जून १९१२

सही

झांगो सुकदेव हुरसाळ निशाणी स्वतांकरितां व इतर भागीनदार
१ भावजी देवसींग
२ चिमणाजी नारायण
४ धनु नारायण वनगर व
पांचवा मयत चहादू यांच्या
करितां झांगो सुकदेव हुरसाळ
निशाणी

नो. नं. ३३२

## नोटीस

नोटीस सखाराम भारतडक रा. वोर्डी ता० आकोट यास-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी बहीण भागीर्थी इचें लग्न संबंध तोडल्याबद्दल फारकत तीचा नवरा गणपत वल्द परशराम रा. आकोट याजकडून घेऊन तुमचेपाशीं ठेविली त्याजबद्दल पचांस सर्व महिती आहे हल्लीं मला भागीर्थी इचा गंधर्व करून देण्याचा विचार आहे त्या करितां फारकतीची फार जरूरी आहे फारकत वेळेवेळा मागितली असतां तुह्मी देतो देतो ह्मणून आजपर्यंत दिली नाहीं करितां या नोटि- शीनें कळविलें जातें कीं नोटीस पावता आह्मी ठेवलेली फारकत आमचे घरीं आ- णून द्यावी तसें न केल्यास आह्मी रीती- प्रमाणें तजवीज करूं व नोटीस हे फा- रकत समजून गंधर्व करूं व जबाबदार तुह्मी राहाल. ता. १३ ६-१२

सही

तुळसीराम वा भिवसन टिकार
वराड द० ख०

नो० नं० ३३३

## नोटीस

गणु वा फकीरचंद परदेशी कुंभार रा० उमरावती प्रांत वऱ्हाड

यांस—

खालीं सही करणार गंगु मर्द गणु परदेसी कुंभार रा० मंगरुळपीर ता० मंगरुळपीर जि आकोला इजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून या चार वर्षांपासून तुह्मी मजला विना- कारण सोडून दिले आहे मध्यंतरीं ३-४ वेळां मी नांदण्यास आली असून तह्मी नांदविले नाहीं या शिवाय २ ३ वेळां तुह्मी जाती भ्रष्ट झाले होते व मजला भ्रष्ट होण्याकारितां आग्रह केला होता तेव्हां मी पंच लोकाना विनंती वगैरे करून तुह्मास जातींत घेतले होते पुनः आतां तुह्मी जाती भ्रष्ट झाल्याचे ऐकण्यात आले आहे तरी ही नोटीस पोहचल्यापासून ८ दिवसाचे आत तुह्मी जातींत मिसळून जातींत आले आहात अशाबद्दल त्या आपले जातींचे पंच लोकांच्या सह्याचा कागद मजला आणून दाखवावा व शिवाय अन्नवस्त्राबद्दल मजवर झालेलें कर्ज २०० दोनशे रुपये हे देऊन लेखी पावती घ्यावी व मजला नांदविण्यास घेऊन जावे असें न केल्यास तुह्मी मला नांदवित नाहीं असें समजून व ना उमेद होऊन दुसरा नवरा करीन अगर माझे मर्जीस येईल तसें वागेन व मग तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं कारण कीं माझा तरुणपणाचा वेळ व्यर्थ चालला असून शिवाय अन्नवस्त्राची तकलीफ सोसवत नाहीं. कळावें ता० १८-६-१९१२ इ०

द० शेखइस्माल अर्जनवीस वाशीम

सही

गंगु मर्द गणु इची निशाणी
बांगडी द० बरप्रमाणें

नो० नं० ३३४

Registered NN.4

# ...डसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला—– सोमवार तारीख २४ माहे जून सन १९१२ ई० [ अंक २५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस....... १ रुपया
शहरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

मुंबई ब्य.केची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक राहील तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

## खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.

यांचे दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | " | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाळ | " | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | " | १ |
| नागाच्या गोळया | " | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | " | २ |
| खोकल्याच्या गोळया | " | २ |
| पोलादभस्म | | ३ |
| लक्ष्मी विलास | " | १५ |
| त्रिभूवन किर्ती | " | २ |
| श्वास कुठार | " | २ |
| सुवर्णमालनीवसंत | " | ६॥ |
| लघुमालनीवसंत | " | २ |
| समिर पन्नग | " | ५ |
| रससिंदुर | " | ३ |
| चंद्रोदय | | १२ |
| हिंगाष्टक चुर्ण | बाटली | ०≈ |
| डोळ्यांचें औषध | " | |
| मोठी | " | ।= |
| लहान | " | ⅃ |
| लिनिमेंट आयोडिन | " | ।॥। |
| टि. आयोडिन | " | ।= |
| महावातास्त्र तेल | " | |
| मोठी | " | ॥≡ |
| मध्यम | " | ।–॥ |
| लहान | " | ८≡ |
| उमाचा शिर्का | " | ।≡ |
| मध बाटली. | | |
| मोठी | " | ।= |
| लहान | " | ८=॥ |
| पिंनसावर तेल | " | ।॥। |
| ग्लिसराईन बाटली. | | ८≡ |
| गजकर्ण अर्क | " | ।= |
| गजकर्ण मलम | " | ४=॥ |
| शंखद्राव. | तोळा | ।॥। |
| कुंचल्यादि वटी | " | ।॥। |
| हिंगणबेटाचे तेल | " | ०= |
| नारायण चुर्ण | " | ०= |
| इच्छाभेदी जुलाब डबन | | ०≈ |
| गृहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | " | २ |
| शितोपला चुर्ण | " | ०= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | " | ०≈ |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.

ता. १।१।१२

जोगळेकर आणि कंपनी लि. आकोला.
नो० नं० ११

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पहावा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एस. आणि सन्स
पुलाजवळ आकोले

## मोठीअडचण दूर झाली.

आजपर्यंत किर्लोस्कर बंधुनीं तुमच्य बैलांस हलकी जाणारीं अशीं मोटेचीं चाकें तयार करून बैलांचें श्रम वाचविलें. आतां तुम्हीं स्वतःची अगर तुमचे घरांतील माणसांचीं मेहनत व वेळ वाचविण्यासाठीं घरांतील विहिरी करीतां लहानशीं परंतु मजबूत व ओढण्यास हलकीं जाणारीं अशीं लोखंडी चाकें (हातगडगडे) तयार केलीं आहेत. याचप्रमाणें "हातानें पाणी ओढण्याचे" लोखंडी सुधारलेले हातरहाटहि केले आहेत. हल्लीं उन्हाळ्याचे व पाण्याचे टचाईचे दिवसांत सदरहु चाकांचा व रहाटांचा फार उपयोग आहे.

चाकाची किंमत रुपये ५
दोन रहाटांची किंमत रुपये १५

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० २४०

### हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें पूर्व स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो किं. ८४

हीं औषधें सर्व औषधा विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

## निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जनसमाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाचो वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्याही पातकें कशीं होतात व त्यांचा परिणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कमा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखे सोसावी लागतात. ते तपसीलवार लिहिण्यात अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परिणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आस वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टी विषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकारितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केले आहे भाड्यानें घेतलेले घर केव्हां सोडावे लागेल याचा निश्चय नसतो या कारितां मुद्दाम विकत घेतलेले घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगानियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक मी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर

ता० १६-५-१२ अकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

### जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, मौजे पोफाळी ता. पुसद जि० यवतमाळ येथील शेत सर्वे नं० ७९ हें शेत माझें पूर्ण मॉलिकिचें असून कदीमकबज्यांत आहे. त्याचें खातें हल्लीं माझी चुलत बहीण विठाबाई हिचे नांवचे आहे परंतु सदर्हु शेताशीं तिचा काडीइतकाही संबंध नाहीं. तर तिचेकडून कोणी खरेदी अगर गहाण वगैरे घेऊं नये. घेतल्यास रद्द समजले जाईल. ता. १०-६-१२ इ.

सही

गोरख नारायण पटवारी मुकाम
नो० नं० ३४३ पोफाळी ता पुसद

मागील अंकावरुन पुढें चालु.

## मुसलमानी धर्माची नीतितत्वें.

व ह्मणूनच आश्चर्य वाटतें कीं तरवारीच्या जोरावर धर्मस्थापना केली असें ख्रिश्चन लोक ज्या धर्माबद्दल ह्मणतात त्याच धर्मानें खरें पहातां प्रत्येक वेळीं धर्मौदार्य दाखविण्या करितां लोकांवर सक्ती केली आहे. पैगंबराची आज्ञा 'हें परमेश्वरावर विश्वास न ठेवणाऱ्यांनो तुह्मी ज्याची पुजा करिता त्याची पुजा मी करणार नाहीं व मी ज्याची पुजा करितो त्याची तुह्मी पुजा करणार नाहीं तुमचा धर्म तुह्मास व माझा धर्म मला" "तुह्मी लोकांस इस्लामावर विश्वास ठेवण्यास जबरदस्तीनें लावाल काय? परमेश्वराचे परवानगी शिवाय कोणीही विश्वास ठेवणार नाहीं." "तुह्मी फक्त उपदेशक आहात तुह्मी शास्ते नाहीं, करितां जोकोणी नाकारतो त्यास त्याचें ईश्वराच्या मार्गानेंच भाऊदे" दररोज मुसलमान लोक आपल्या नित्यच्या प्रार्थनेंत ह्मणत असतात. धर्माचें कामांत सक्ति नाहीं" 'अशातऱ्हेनें पैगंबरानें धर्म संबंधी कोणावर जुलुम केला नाहीं. व करण्याबद्दल सांगीतले नाहीं. कुराणांतील कित्येक वाक्यांचा विपरीत अर्थ करून इस्लाम द्वेष्ट्यांनीं त्याची निंदा केली आहे. जसे 'काफिरा बरोबर लढ" 'काफीर जेथें सापडेल तेथे त्यास ठार कर" वगैरे वगैरे. हीं वाक्यें संदर्भानें व प्रसंग लक्षांत घेऊन घेतली पाहिजेत. एकवेळ एका मुसलमानानें गंमत केली तो ह्मणाला „ निमाज पढूं नका कारण तसें कुराणांत सांगितले आहे. लोक चकीत झाले. परंतु कोणी उत्तर देईना. त्यानंतर कुराणांत पाहिले तों „ निशेमध्यें असतांना निमाज पढूं नका" असे होते. अशा तऱ्हेनें लोक अर्थाचा अनर्थ करतात कापत नाहिंशी होई पावेतो काफराशी लढ' असें सांगितले आहे. बेदर येथें मुसलमानांचीं कोरेस्तसाशी जी पहिली लढाई झाली. त्यावेळचा हा उपदेश आहे. सर्व उपाय हरले ह्मणजे लढाई करावी असें आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं 'धर्म संबंधी लढाईस सुरवात करण्याची मनाई आहे' "मुसलमानें तर सर्व लोकांची एकसहा कत्तल करावी ह्मणून हुकूम नाहीं. आणि राज्य तृष्णेनें होणाऱ्या लढायासही वाक्यें लागू नाहींत.

धर्माचे बाबतींत जबरदस्ती न करण्याबद्दलचा उपदेश पैगंबरानें स्वतः शब्दशः पाळला होता. पैगंबरास जे कांहीं लढाईचे प्रसंग आले त्याचे चार भाग करता येतील १ शत्रूकडून झालेल्या हल्यास तोंड देणें २ शत्रुस पळऊन लावण्याकरितां ३ तहमोडतील त्यांचे पारिपत्य करण्याकारितां. ४ शत्रूनें आपल्या वकिलाचा वगैरे नाश केल्यास. अशा तऱ्हेच्या लढाया नवीन राजनीति प्रमाणें देखील न्यायाच्या ठरतील ख्रिस्तान लोकास चांगले रीतीनें वागविल्याची उदाहरणें आहेत.

---

'मनुष्यास आत्मा आहे गाईस नाहीं' अशा तऱ्हेचे वाक्यावर आपण हिंदूलोक नेहमी टीका करीत असतो. केवळ थट्टाच करण्याची बुद्धी असल्यामुळें त्याचें खरे अर्थाकडे कोणी लक्ष देत नाहीं. 'आत्मा' या शब्दानें "क्षरःसर्वाणि भूतानि कूटस्थो क्षर उच्यते" यातील 'कूटस्थ' अर्थ घेतो. परंतु इंग्रजीत 'सोल' शब्दानें 'कूटस्थ' घेतला जात नसून 'जीवात्मा' ज्याचे ठिकाणीं कर्तृत्व, भोक्तृत्वादी गूण आहे असें जें व्यक्ति स्वरूप त्यास 'आत्मा' या शब्दानें दर्शवितो.

मनुष्य कोटींत जें जीवात्म्याचे विशिष्ट स्वरूप आहे तें इतर जड वस्तूत अथवा पश्वादिकांत नाहीं हें कोणास सांगण्याची अवश्यकता नाहीं. मनुष्ये तर जीवांचे ठिकाणी व्यक्तिवाचक अहंकार नाहीं. त्यांचे बहुतेक व्यवहार केवळ बाह्यविषय प्रेरीत असतात. मनुष्य सृष्टि स्वभावास अनुकूल अशा तऱ्हेचें वर्तन ठेऊन आपली उन्नति करू शकतो तो स्वतंत्र आहे. इतर जीवांत तें विशिष्ट ज्ञान नसून तें परतंत्र आहेत.

मि० लेडबीटर साहेब यांनीं नोव्हेंबरचे 'थिऑसोफिस्ट' मासिक पुस्तकांत The doctrine of the Group Soul "जीवसमुच्चय तत्व" याबद्दल लिहिले आहे. खनिज वस्तू, वनस्पति व प्राणी कोटी या सर्वांत चैतन्य आहे परंतु त्यांचे ठिकाणी व्यक्तिविशेषत्व नसून प्रत्येक वस्तु, प्रत्येक वनस्पति अथवा प्रत्येक जीव हा कोण्यातरी अनेक वस्तू, वनस्पति अथवा सजातीय अनेक जीव संग्रहाचा अंशभूत असतो. मुंग्याचे एका समुच्चय जीवात्म्याचे एक लाख भाग असूं शकतील- ह्मणजे एक लाख मुंग्याचा एकच व्यक्ति जीवात्मा असतो. पशूमधील सिंह समुच्चय जीवात्म्याचे शंभर भाग असू शकतील— ह्मणजे शंभर सिंहाचा एक एक समुच्चय आत्मा असतो याजबद्दल मि० लेडबीटर साहेब लिहतात. उदाहरणार्थ मनुष्यं व्यक्तिप्रमाणें सिंहाची स्वतंत्र व्यक्ति नाहीं. सिंह मरण पावतो तेव्हां त्यांतील जीव चैतन्यास स्वतंत्र गती नसून तों ज्या समुच्चयाचा भाग असेल त्या समुच्चयात ते जाऊन मिळते. अशा त्या समुदायास अथवा जीवचैतन्य खजिन्यास ग्रुपसोल ह्मणजे समुच्चय आत्मा असें ह्मणतात. अशा एक एका खजिन्याशी अनेक सिंह शरीरांचा संबंध जोडलेला असतो. समजा शंभरा शंभराचा कळप असतो. अशा तऱ्हेनें तो प्राणी जिवंत असता त्याचे शरीरांत चैतन्य खजिन्यांतील शंभरावा हिस्सा येतो. मनुष्याप्रमाणें तो प्राणी जिवंत असतां एक तऱ्हेनें स्वतंत्र असून तो व्यक्ति स्थिति भोगित असतो. परंतु तें त्याचे व्यक्तिस्वरूप कायमचे नसून तात्पुरतें असतें. त्याचें शरीर पडताच त्यांतील जीवात्मा नेऊन असा त्या खजिन्यांत मिळविलेले अनुभव वगैरे घेऊन माघारा जातो. खजिन्यांत जाऊन मिळाल्या नंतर त्यास व्यक्ति या नात्यानें निराळे निघता येत नाहीं. त्या खजिन्यांत येऊन मिळणाऱ्या सर्व सिंहाचे अनुभव एकत्र हो[ऊन] त्यांतून नवीन उत्पन्न होणाऱ्या उपजत बुद्धि येते.

ही गोष्ट समजाविण्याकरितां लेडबीटर साहेब यांनीं उदाहरण फार मजेचें दिलें आहे. अशी कल्पना करूं कीं. ग्रुपसोलर अथवा जीवसमूह रूप एका बकेटांत शंभर लहान टंबरेल पाणी ठेविलें आहे. प्रत्येक टंबरेलभर पाणी एका सिंव्हाचे जीव चैतन्याबरोबर आहे. ते सर्व सिंह जिवंत असतील तेव्हां तें बकेट रिकामें राहील. परंतु प्रत्येक सिंह मरताच त्याचे शरीरांतील जीव चैतन्यरूप टंबरेलभर पाणी परत त्या मोठ्या बकेटांत ओतलें जातें. मात्र हें पाणी प्रथम बकेटांतून घेतलें तसेंच नसून त्यांत त्या सिंव्हाचे जिवंतपणी मिळाले त्या अनुभवाचे रंगानें रंगलेले असें असतें. अशा तऱ्हेनें प्रत्येक सिंहाचे निरनिराळे अनुभवरूपरंग एकत्र झाल्यानें बकेटांतील पाण्याचा रंगही मुळचें रंगापेक्षां विचित्र बनतो. असें समजा कीं त्या बकेटांत वरचेवर पडणाऱ्या रंगाचे पाण्यांत नकळत असे बकेटाचे मध्यभागी त्या पाण्याचे दोन भाग करणारा असा पापुद्रा जमत जातो. व तो पापुद्रा इतका पक्का होतो कीं त्यांतील पाण्याचे उजवेकडील आणि डावीकडील असें दोन भाग व नंतर ज्या भागांतून जे टंबरेलभर पाणी घेतलें असेल त्याचे भागांत तें जाऊन पडतें. अशा तऱ्हेनें त्या पाण्यांत फरक पडता पडता दोही बाजूचे पाण्याचे गुण अगदी वेगवेगळे होतात. असें झाल्यावर एका बकेटाची दोन बकेटे झाल्या सारखेच होते व कांहीं कालानें ती अगदीच वेगवेगळी होतात. जसजसी अनुभवरूपरंगाची पुढें अधीक अधीक बसत जातात तसतसें जीव चैतन्य समूहाचे अनेक भाग होऊन त्या प्रत्येक समूहातील जीव संख्या कमीकमी होत जाते. ती संख्या इतकी कमी होते कीं, अखेरीस व्यक्तिरूप एक स्वतंत्र जीव राहून तो फिरून त्या समूहजीवचैतन्यात जाईनासा होतो..

जे लोक कुत्रा मांजर वगैरे प्राण्यावर फार प्रेम करतात व ज्यास मरणोत्तर देखील त्या प्राण्याची संगत सुटू नये असें वाटत असते त्यास मि० लेडबीटर यांनी केलेल्या वर्णनावासून फार आनंद होणार आहे. कारण जनावरास देखील मनुष्यत्वास आणणे अगदींच अशक्य नाहीं. जनावरांतील समूहचैतन्यास व्यक्तिचैतन्याचे स्वरूपास आणणे ह्मणजे त्याची विलक्षण प्रगती करणें होय व त्यास पशुत्वापासून सोडविणेच होय.

वर लिहिलेल्या वर्णनावरून मनुष्य आणि मनुष्ये तर पश्वादिक वस्तु व जीव या मधील आत्मभेद काय आहे हे लक्षात येईल.

चि. ह. मराठे

---

वऱ्हाडसमाचार.

अ. आषाढ शुद्ध १० शके १८३४ परिधावी.

## इंडिया बिल

ता० १० जून रोजीं विलायतेंत पार्लमेंटाच्या कॉमन्स सभेंत इंडिया बिलाचें तिसरें वाचन झालें. यावेळीं जो वादाविवाद झाला त्यांत सरजॉन डी. रीस यांनीं बिलाविरुद्ध भाषण करतांना बरींच गमतीचीं प्रमाणें पुढें केलीं. तीं वाचलीं असतां कोणालाही हंसूं लोटल्यावांचून राहणार नाहीं. सरकारनें चळवळी लोकांच्या खटपटीला भिऊन वंगभंग रद्द केला याबद्दल त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांना टपका दिला व दिल्ली राजधानी करण्यांत ही सरकारानें चुक केली आहे असें ह्मटलें. त्यांच्या विधानाला बिनतोड उत्तर मि० मॉंटेग यांनीं तेथल्या तेथें देऊन रीस साहेबांस निरुत्तर केलें. मि० मॉंटेग साहेबांनीं यावेळच्या आपल्या भाषणांत एक अप्रतिम तत्त्व सांगितलें. तें जर सगळे अधिकारी पूर्णपणें लक्षांत वागवितील तर हिंदुस्थानांत लोकांना रामराज्यांतल्या इतकें सुख निश्चयानें लागेल. तें तत्त्व हें कीं हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीचा विशेष हा आहे कीं तेथल्या लोकांना पार्लमेंटाच्या द्वारें आपल्या तक्रारी विलायतेंतल्या जनतेपुढें मांडतां येत नसल्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांनाच त्यांच्या तक्रारी मिटविण्याविषयीं दक्षता ठेविली पाहिजे. हिंदुस्थानावर राज्य करणारे अधिकारी परके असतात. लोकांच्या मनाचें व स्वभावाचें खरें ज्ञान फार थोड्या अधिकाऱ्यांना असतें. अशा स्थितींत निराश्रित अशा हिंदी लोकांचे वाली ह्मणजे प्रजेच्या तक्रारींची माहिती करून घेऊन त्या सदय अंतःकरणानें व सहानुभूतिप्रेरित सदिच्छेनें सरकारी अधिकाऱ्यांनींच मिटविल्या पाहिजेत अमकी एक गोष्ट चुकीची आहे असें दिसत असून ती ठरली ती ठरली असें ह्मणून चालणें चांगलें नाहीं. अशी वागणूक ईश्वराच्या घरीं रुजू व्हावयाची नाहीं व श्रीमान् चक्रवर्ती जॉर्ज बादशहानीं घालून दिलेल्या नियमालाही सोडून होईल. हिंदी प्रजेचीं दुःखें समजून घेणें हें काम आतां पूर्वीच्या सारखें मुष्किलीचेंही नाहीं. सुदैवानें इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाल्यानें इकडे होत आहे व कांग्रेसचे पुढारी अर्थात लोकनायक हे सरकारी अधिकाऱ्यांशीं स्नेहभावानें वागणारे असून लोकांचीं दुःखें सरळपणानें अधिकाऱ्यांना समजावून देण्यांत सर्वदा तत्पर आहेत. अशा वेळीं जी गोष्ट अनुभवानें लोकांना कष्टदायक आहे असें कळून आलें तीच हट्टानें पुढें चालू ठेवण्यांत शहाणपणा नाहीं व मुत्सद्दीपणाही नाहीं. वंगभंग रद्द करून त्या प्रांताची नवी व्यवस्था

लावण्यांत हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी हे सद्भावानें प्रेरित झाले होते व मि. मॉटेग यांनीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें जें उदार तत्त्व रीस साहेबांना उत्तर देतांना स्पष्टपणें सांगितलें तेंच त्यांच्या निर्मळ मनाची व उदार विचारांची साक्ष देण्यास पुरें आहे मी. मॉटेगसारख्या जबाबदार प्रधानानें जें हें तत्त्व आदर्श ह्मणून जाहिररीतीनें सर्वांपुढें मांडलें आहे त्याबद्दल सर्व हिंदुस्थानदेश त्यांचा ऋणी राहील. रीज साहेब कांहींही ह्मणोत, मि० मॉटेग, लॉर्ड क्र्यू व लॉर्ड हार्डिंज यांनीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या तत्त्वांत जी सुधारणा केली आहे ती हिंदुस्थानच्या इतिहासात चिरस्मरणीय राहील.

## स्त्रीशिक्षणाचा विजय.

आमचे उमरावतीचे सुप्रसिद्ध नागरिक रा. अण्णासाहेब जोशी यांची कन्या कु. नागूताई या विद्यापीठातली वैद्यकीची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्याचा सुप्रसंग नुकताच येऊन गेला. त्यानंतर बंगाल्यांतही अशा प्रकारें स्त्रीशिक्षणाची जयपताका फडकविणारी एक कुमारी निघालेली पाहून आमचा तो आनंद द्विगुणित होत आहे. कुमारी यामिनी सेन या कलकत्त्यास एल. एम. ऍंड एस.ची परीक्षा पास झाल्यानंतर कांहीं दिवस नेपाळ संस्थानांत आपल्या वैद्यकीच्या ज्ञानाचा फायदा तेथील स्त्रियांना देत होत्या. पुढें अधिक अभ्यास करण्यासाठीं त्या विलायतेंत गेल्या व तेथें ग्लासगो युनिव्हर्सिटीची कठीण अशी एफ. आर. सी. एस.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या ही गोष्ट त्यांना अत्यंत भूषणावह आहे. कु० यामिनी सेन यांचें घराणें सुशिक्षणाविषयीं व सुशीलतेविषयीं प्रसिद्ध आहे. यांची एक बहीण श्रीमती कामिनीराय या एम. ए. [अ]सून बंगाली भाषेतल्या नामांकित व [प्र]भावन् कवींत त्यांची गणना होते. [आपला हिंदुस्थ]ान देश हळूं हळूं स्त्रीशिक्षणाच्या [दिश]नेटानें पुढें पाऊल टाकीत [आ]हे [याचें प्रत्य]क्ष प्रमाण ह्मणजे [...] अशी [...]त.

## कापसाचें पीक.

विलायतेंतले कापसाचे व्यापारी व गिरणीवाले यांची एक संयुक्त संस्था आहे. या संस्थेनें जगांत कोठें कसा कापूस पिकतो याविषयींची संपूर्ण माहिती मिळवण्यासाठीं आपले सेक्रेटरी मि स्मिट यांना पाठविलें होते. हे साहेब नुकतेच हिंदुस्थानांत हिंडून गेले. त्यांनीं येथील स्थिति पाहून जो रिपोर्ट आपल्या संस्थेकडे पाठविला आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे. तो साग्र देणें शक्य नसल्यामुळें महत्त्वाचा सारांश तेवढा येथें देतो. ते ह्मणतात कीं लांब धाग्याचा कापूस चांगला असावा अशी हिंदुस्थान सरकारच्या मनाची पक्की समजूत होऊन बसली आहे व या कापसाला भावही चांगला येतो असें दिसून आल्यावरून जेथें पाण्याची सुबत्ता आहे अशा ठिकाणचे शेतकरी हाच कापूस लावूं लागले आहेत. सिंध, पंजाब, गुजराथ व मद्रास इलाख्याचा दक्षिण भाग या प्रदेशांत यासाठीं इरिगेशनचें काम झपाट्यानें चालले आहे व या प्रदेशांत असा कापूस पेरतील त्यांनाच जमिनी देण्यांत येतात. यासाठीं इरिगेशनचीं मोठ्या खर्चाचीं कामें सुरू आहेत. हा खर्च सकट पडतो सरकार सगळ्या कर देणाऱ्या लोकांवर आणि यापासून फायदा होणार तो हा कापूस विकत घेणाऱ्या म्यांचेस्टरचा! इरिगेशन प्रीत्यर्थ होत असलेल्या कोट्यावधि रुपयांच्या खर्चीपैकीं एक पैही युरोपियन व्यापारी देत नसतां त्यांच्या विनंतीवरून सरकार कापसाचें पीक वाढविण्याच्या खटपटीला लागलें आहे. पण सरकारच्या या वर्तनासंबंधानें कायदेकौंसिलांतला कोणी सभासद ब्र काढीत नाहीं!

## ऐतिहासिक माहिती.

मुंबईचें 'इतिहाससंग्रह' मासिक पुस्तक फार अनियमितपणानें निघतें खरें, पण त्यांतली माहिती अत्यंत चित्तवेधक असते. त्या मासिकाच्या तीन अंकांचा एक जोड अंक नुकताच बाहेर पडला आहे. त्यांत अनेक प्रकारची उत्तम माहिती आहे. तींतून मधुमक्षिकाव्रतानें पुढील सार आह्मी आमच्या वाचकांस अर्पण करीत आहों:—

१ विसाजी कृष्ण बिनीवाले हे कऱ्हाडे ब्राह्मण प्रथम पेशव्यांचे पदरीं लहानसे कारकून होते. श्री नानासाहेब पेशव्यांनीं त्यांच्या अंगची मर्दुमकी पाहून प्रथम त्यांना स्वतंत्र पागा दिली व पुढें आपल्या आघाडीच्या फौजेचें ह्मणजे बिनीचे मुख्य सरदार केलें. ह्मणून बिनीवाले हें नांव त्यांस पडलें. कर्नाटकांतील राजकारणात हे अग्रणी होते. दिल्लीच्या बादशहाला अंकित करून तेथें मराठ्याचें वर्चस्व स्थापावें ही पेशव्यांची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचें श्रेय विसाजी कृष्ण यांनीं घेतलें, तेव्हां या असामान्य कृत्याबद्दल त्यांची फार वाहवा झाली. २ महादजी शिंदे यांच्या एका पत्रांत कसबे पुणें पेठ राजबाग असा एक उल्लेख आढळतो. शिवाजी महाराज व त्यांची आई जिजाबाई पुण्यास कसबापेठेंतल्या आपल्या वाड्यांत राहत असत. (या वाड्याला अंबारखाना ह्मणत हा वाडा पुण्याच्या म्युनिसिपालिटीनें नुकता पाडून सपाट मैदान केलें आहे व तेथें आतां सर्कशीचे खेळ होत असतात!) तेव्हां राजबागही याच वाड्याजवळ असावी असें वाटतें पण हल्लीं तिचा मागमूस सुद्धां लागत नाहीं.

३ इंग्रजी तऱ्हेची घड्याळें आपल्याइकडे पेशव्यांच्या वेळींच आलीं असावीं असें मानण्यास आधार आहे. थोरले बाजीराव पेशवे यांच्या जवळचें एक घड्याळ कॅ. बॉकर यांनीं दुरुस्त करून दिलें असा एका पत्रांत उल्लेख सांपडतो. श्री. सवाई माधवरावाच्या वेळीं तर घड्याळांचा प्रवेश दरबारांत पुष्कळच झाला होता.

४ सुभेदार मल्हारराव होळकर यांचा पुत्र खंडेराव (साध्वी अहिल्याबाई हिचा पति) याच्या लग्नाच्या वेळची लग्न चिठ्ठी सांपडली आहे. ती अशी आहे—

राजश्री लक्ष्मण शंकर कमाविसदार प्रगणें बासवाडा गोसावी यांसी—अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित मलारजी होळकर दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करणें. ह्या नंतर चिरंजीव राजश्री खंडेराऊ त्याच्या लग्नाची तीथ ज्येष्ट शु ७ सुरंजेस कर्तव्य निश्चय झाला आहे. तरीं आपण येऊन लग्नमंडप शोभिवंत करावा. रवाना चंद्र २१ मोहरम हे विनंति.

या निमंत्रणपत्रीकेच्या भाषेवरून गेल्या दीड दोनशें वर्षांत लग्न चिठ्ठीच्या भाषेंत विशेषसा फरक झाला नाहीं हें दिसून येईल.

५ इ. स. १७७१ सालीं स[ा]तान्यास ज बाजाराचे निरख होते त्यांतल्या कित्येक बाबी सध्याच्या महागाईच्या काळीं मजेदार वाटतील. गहू दररुपयास ३। पायली, तांदूळ सडीक २॥ पायली, तुरीचीडाळ ३ पायली, गोडे तेल २ पायली, पावटे ६ पायली, साखर २॥ शेर (इतकी महाग? असण्याचें कारण तेव्हां मॉरिशसहून ती येत नसे.) तूप १॥। शेर, तेल २॥ शेर, गूळ ९ शेर, दूध १२ शेर, लोणी ४॥ शेर, कागदाचें रीम ३ रुपये, दौलताबाई कागदाचें रीम ८ रुपये पासून ३॥ रुपयेपर्यंत, लांकडें ४॥ रु. खंडी, मिरच्या रुपयास अर्धामण विकलेलीं केळीं रु. १२५, पेरू मोठे १२५, मुळे २ मण, कांदे ६४, मेंढ्या ३ मण, दही १४ शेर, इ.

६ थोरले माधवराव पेशवे यांची समदृष्टि व न्यायप्रीति यांविषयींचा लौकिक प्रसिद्धच आहे. हिंदु, मुसलमान व ख्रिस्ती यांच्या मध्यें ते भेद ठेवित नसत. पाद्री फेलवाद्र फिरंगी यानें रेवदंडा येथील आपल्या देवास कांहीं नेमणूक मिळावी ह्मणून अर्ज केल्यावरून त्या देवास पेशव्यांनीं नेमणूक करून दिली. त्याचप्रमाणें फिरंग्याच्या देवीच्या उत्सवाचे वेळीं तोफेचे बार काढण्याची परवानगी दिली. आणि देवालयाच्या जीर्णोद्धारासाठीं लाकडेंही देवविलीं.

७ पेशव्यांचें अस्सल तहनामे व करारमदारांच्या यादीसंबंधाचें कागद रत्नाप्रमाणें बहुमोल समजून ते जवाहीरखान्यांत ठेवीत असत.

८ नानाफडणीस हे फार धूर्त, दूरदर्शी व चाणाक्ष मुत्सद्दी ह्मणून प्रसिद्ध होते. पण त्यांच्याही हातून कित्येक वेळां चुका घडल्या व आश्चर्याची गोष्ट ही कीं त्या चुका स्पष्टपणें दाखविणारे बाणेदार सरदारही त्यावेळीं होते. नानांनीं राघोबा दादांना बुंदेल खंडांत जहागिर देण्याचें कबूल केल्यावरून दादासाहेब निघाले, पण ते मध्येंच भडोच येथें इंग्रजांकडे गेले, तेव्हां नानांनीं त्यांचा पाठलाग करण्याविषयीं शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांस लिहिलें. शिवाजी विठ्ठलांनीं नानांस उत्तर लिहिलें त्यांत त्यांची चूक स्पष्टपणें कळविली ते लिहितात—"आपण राज्यांतलीं खुळें मोडून चांगलाच बंदोबस्त केला पण श्रीमंताची खानगी झांसीप्रांतीं केली येविशींची दुरदेशी ध्यानांत आणिली नाहीं. दूरदेशी पाठवून बंदोबस्त होण्यासारिखा असता तरी कै० रावसाहेबास सन्निध बाळगावयाचें कारण काय होतें? तथापि आपण खानगी केली, परंतु एका आल्यांन पांचसात हजार फौज समागमें देऊन, श्रीमंता जवळील तोफा व पलटणें हुजूर ठेवून, इकडे पुरतेपणीं खानगी करावयाची होती."

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— वर्षा ऋतूची मंगल ध्वजा मृग नक्षत्रानें रोंविली आहे तेव्हां आतां आर्द्रा, पुनर्वसु इत्यादि नक्षत्रें आपल्या अमृत वृष्टीनें वनसृष्टीला नवी मनोहर बनवूं लागतील असें सर्व लक्षणें सांगतात. वारा तुफान सुटतो, ढगांची गर्दी होत असते, आणि इतर चिन्हें देखील तितकींच अनुकूळ आहेत. रोगराई नसून सार्वजनिक आरोग्य विशेष उत्तम आहे.

अंजन— यंदा गुरांचा चारा जितका महाग आहे असा पूर्वीं कधींच नव्हता. दुष्काळापेक्षां अधीक खडतर प्रसंग पाहून आतां तरी लोक एकट्या कपाशीचा नाद सोडून फेरपाळीनें जवारी पेरतील असा भरंवसा आहे. भावाच्या दृष्टीनें यंदा जवारीचें पीक कडबा वगैरे मिळून लोकांस उत्पन्न कांहीं कमी नसून उलटे कपाशीपेक्षां अधिक आहे.

रा० रा० इ० जी० जी० किलूरो शाळाखात्याचे इन्स्पेक्टर हे रजेवरून विलायतेहून परत येतांच वऱ्हाडच्या इन्स्पेक्टरीवर दाखल होतील.

आणि प्रस्तुतचे इन्स्पेक्टर खानबहादूर निजामुद्दीन अहमद यांची बदली छत्तिसगड विभागांवर केली आहे.

रा० रा० बाळकृष्ण रामचंद्र गोडबोले बी० ए० एल० एल० बी, यांस मुनसफ नेमून आकोल्यास नेमल्या अन्वये ते येथील कोर्टावर गेल्या सोमवारीं रूजूं झाले.

रा० रा० उत्तमसिंग प्रासिक्युटींग इन्स्पेक्टर यांस चिखलीहून बुलढाण्यास बदलण्यांत आलें.

तसेंच रा० रा० धीरजसिंग सर्कल इन्स्पेक्टर, मुरवाडा यांस बुलडाणा येथें बदललें.

'वऱ्हाड विद्याप्रसारक मंडळी'ची सभा येत्या रविवारीं उमरावतीस भरणार असून त्या सभेपुढें उमरावती वनिता-हायस्कूलाला या मंडळीची इमारत देण्यासंबंधानें प्रश्न आहे. मंडळीचा हेतु एवढाच दिसतो कीं स्थानिक सरकारनें वनिता-हायस्कूल काढतांना या मंडळीच्या नाममंत्रानें त्या संस्थेचें नामाभिधान करावें. हेतु स्तुत्य आहे

गूढ-प्रश्न— येथील मुनसिपालिटीची जी सानिटरी कमिटी आहे तिचे अध्यक्ष सिव्हिल सर्जन हेच असावेत असा मे० कमिशनर साहेबांचा अभिप्राय आहे. लोकांच्या हक्कांचा प्रश्न आहे तेव्हां अध्यक्ष

...वा अधिकार लोकांच्या कडेसच अ-...किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या हुक-...खालीं मुनसिपालिटी जावी असा प्रश्न मुनसिपल देवर्षीं पुढें आला आहे. ...ल सेनेने मुनसिपालिटीचा कारभार सल्लागार एत्रेटेर? काय तो प्रश्न.

...लिचपूर मुनसफ कोर्टांत १०० रुपया...चें स्मालकाजचे दावे चालविण्याचें ...कार देण्यांत आले आहेत. ...च ...रची योजना आकोट, बाळापूर ...ना येथें व्हावयाला पाहिजे आहे.

उमरावतीचे पोलीस इन्स्पेक्टर रा० रा० ...महंमदखान यांस १ महिन्याची हक्काची ...ा देऊन त्यांच्या जागीं रा० रा० रॉडेल ...स इन्स्पेक्टर नेमण्यांत आले.

ना० रावबहादूर रगनाथ नरसिंह मुधोळकर ...वकीलीच्या कामानिमित्त आज येथें येणार आहेत. तेव्हां त्यांच्या या भेटीचा लाभ ...थील मंडळी एखाद्या सार्वजनीक व्याख्याना-...द्वारें सर्व लोकांस करून देतील तर बरें.

खनिज द्रव्यें— वऱ्हाडापेक्षां मध्यप्रांत खनिज संपत्ती संबंधानें फार समृद्ध आहे. वऱ्हाडांतील खनिजा संबंधानें अद्याप कोठें कांहींच मागमूस नाहीं व तत्संबंधी कोणताच उद्योगधंदा इकडे अर्थात् चालू नाहीं. तथापि तज्ञ लोक असें म्हणत असतात कीं या प्रांतांतही खनिजद्रव्यें पृथ्वीच्या पोटांतून बाहेर काढण्या साठीं पुष्कळसे उद्योग निघण्या सारखे आहेत. असलीं कार्यें राजकीय आश्रयावर चालत असतात तेव्हां सरकारानें या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे.

## नोटीस

सोनाई मर्द कर्णाजी पाटील राहणार मनबद ता० आकोट

इला:

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमच्या मुखत्यारानें ११।६।१२ ची नोटीस दिली ती तुम्हाला ... हकीकत विचारून दिली असें दिसत ...ी, पुष्कळसा मजकूर लबाडीचा आहे.

आम्ही आपल्या व त्यांच्या हक्का प्रमाणें वहिवाट करूं, शेतींत कोणी येईल तर त्याला शेतीबाहेर हाकलून देऊं, आणि आम्हाला बिनाकारण या नोटिशीच्या भानगडींत पाडलें याबद्दल आमची सर्व नुकसानी तुम्हाकडून भरून घेऊं त्या शिवाय तुम्ही १४।१।१९१२ रोजीं आम्हापैकीं सही करणार नं. २ व नं. ४ आम्हांस मनबद येथील स. नं. १०९ चे खरेदीखत करून दिलें आहे. तें अजून नोंदणें आहे. पण त्या पूर्वींच तुम्ही हा नंबर गीरधारीलाल नमनादास दुकान केळीवेळी यांच्याकडे गहाण असल्याचें व एक त्रितीऑंश हिस्सा खरेदीही असल्याचें आता आम्हांस कळलें तर तुम्ही सदर्हू गहाणाचा व खरीदीचा हक्क तोडून त्या सावकाराची चुकती नोंदलेली पावती आणून दाखल करावी, असें न केल्यास तुम्हावर कोर्टा मार्फत दावा करून योग्य दाद मिळवावी लागेल. ही गहाणाची व एक त्रितीऑंश हिश्श्याची खरिदीची गोष्ट तुम्ही लपवून ठेविली व तुमचा इरादा आम्हाला फसविण्याचा होता. या संबंधानें तुम्हावर आमच्या नुकसानीचा दावा स्वतंत्र करूं आणि जरूर दिसल्यास तुम्हावर फौजदारी प्रकरण ही चालविण्यांत येईल.

१४।१।१९१२ च्या खरिदी अन्वये स. नं. १०९ संबंधानें आमचा १०।३।१९१० च्या कौलपत्रांतील ९ वर्षांचा हक्क कमी होतो म्हणून त्याची नुकसानी भरून काढण्यासाठीं मनबद येथील स. नं, १०२ व स. नं. १०७ मधील ३ एकर ८ गुंठे जमीन ही फुसला १३२७, १३२८ व १३२९ या तीन सालाच्या मोगवट्यासाठीं तुम्ही देण्याची कबूली केली तर तुम्ही त्या प्रमाणें १३२७,२८ व २९ या तीन सालाचा जाबा पट्टा अजून करून दिला नाहीं. तर तो पट्टा योग्य प्रकारें लिहून नोंदून आणून द्यावा. असें करण्यास आठ दिवसांची मुदत दिली आहे. मुदत चुकल्यास त्या बद्दलही दावा करावा लागेल. कळावें ता० २२।६।१२ इ.

सह्या

(फारसींत) मनसूरखां वा भिकनखां राहणार भैरेवाडी द. खु.
(२) सखाराम वा लक्ष्मण द. खु.
(३) मुगटराव भाऊराव देशमुख द खु.
(४) भाऊराव बनाम देशमुख तर्फे मुगटराव सुकंजण रा. भैरेवाडी
नो. नं. ३४४ ता. आकोट

## नोटीस

सर्व लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं कजबे फत्तेखेर्डा ता० मेहकर जि० बुलडाणा येथें गोविंदराम विष्णूसा आणि कंपनी या नांवाची जिनिंग फ्याक्टरी आहे. त्या फ्याक्टरींत एक बायलर एक एंजिन व २० रेचे आहेत. हें सर्व यांत्रिक सामान व ज्या इमारतींत ही सर्व यंत्र आहेत ती इमारत व त्याशिवाय स्टोअर रूममध्ये वरील फ्याक्टरीचे उपयोगाचे व कांहीं जूनें सामान आहे तें व शिवाय स्टोअर रूमची इमारत ही सर्व जाहिर लिलावानें ता० ११-८-१२ रोजीं दुपारीं ११॥ व १२ वाजतां याचे दरम्यान जागेवर फत्तेखेर्डा येथें विकावयाची आहेत. मशीनरी सर्व दुरुस्त असून उत्तम काम देण्यासारखी आहे. करितां ज्याची ही फ्याक्टरी विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु ११-७-१२ रोजीं हराशाचे वेळीं हजर रहावें. सर्व जिनिंग फ्याक्टरीची अंदाजा किंमत १६००० पासून २०००० रुपयेपर्यंत आहे. लिलाव तीनवार पुकारल्या बरोबर रक्कम नगदी दिली पाहिजे; त्या प्रमाणें न दिल्यास फ्याक्टरीचा पुनः फेर लिलाव होईल व त्यामुळें नुकसान आल्यास पैसे न भरलेल्या खरेदीदारांस द्यावे लागेल. ता० १०-६-१२

A. R. pimprikar
Receiver appointed
by the Ditrict gudge
AKOLA.

नो० नं० ३३०

## नोटीस

नोटीस वेशमी पाडू वलद विठोबा डोंककर राहणार पिंप्री डोंककराची

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीनें कळविले जाते कीं, तुम्ही मुलगी नामे बाव्हळी ही माझी लग्नाची बायको आहे आम्ही आनंदानें नांदत असतां तूं तीला घेऊन गेलास व मी मागतात नाहीं अशी खोटीच गोष्ट रचून माझे बायकोचे नांवानें मला नोटीस दिली. तुमचे लिहिले प्रमाणें मी सर्टीफीकेट मिळविलें आहे तरी नोटीस पावल्यापासून चार दिवसाचे आंत सर्टीफीकेट पाहून माझी बायको दागीन्यासह माझे घरीं आणून घालावी मी वागविण्यास तयार आहे व विनाकारण नोटीसा वगैरे देऊन मला खर्चीं केलें सबब, माझे खर्चाचे रुपये २५ पंचवीस द्यावें असे न केल्यास मला कोर्ट मार्फत बायको ताब्यांत घ्यावी लागेल व त्याजबद्दलचा खर्च व नोटीस खर्च असा सर्व तुमचे जवळून घेतला जाईल कळावे ता० १४-६-१२ इसवी

सही

गोविंदा वलद उदेभान कोकाटे
रा. कडतवाडी ता. आकोट
निशाणी रेघ असे

नो. नं. ३४१

## नोटीस

गोसाई जवजे अच्युतराव देशमुख रा० जामठी बुजरूक ता० मुर्तिजापूर—

मी खालीं सही करणार या नोटीशीनें कळवितो कीं जामठी येथील तुमच्या मालकीचा सर्वे नंबर १८७ हा तुम्ही मला ६ वर्षांचे पट्ट्यानें गेल्या सालचे पोळ्याचे सुमारास दिला व लवकरच पट्टेखत करून देण्याचे कबूल केले. या शेताबद्दल मी तुम्हास दरसाल रुपये ५९ देण्याचे ठरले होते व वायदा तुम्हास द्यावयाचा होता. या प्रमाणें मी तुम्हास रुपये देण्यास आलो असतां तुम्ही घेत नाहीं. व शेत.संबंधी मला कांहीं एक करणें नाहीं असें म्हणतां. गांवचे पाटील लक्ष्मण तुंरराव देशमुख तुमचे दीर यांनीं माझे पाशीं वायद्याबद्दल तगादा केल्यामुळें मी तुमचे करितां १६४=॥। वायदा त्यांचे स्वाधीन केला आहे व बाकीचे ३८॥।-। मी गणपत वलद नारायण बोळी रा० जामठी बुजरूक याजपाशीं घरवर ठेविले आहेत त्याजपासून तुम्ही माझे नांवानें पावती लिहून देऊन रुपये घेऊन जावे. यापुढें मी गेल्या सालचें पट्ट्याचें रुपयाबाद जबाबदार नाहीं. दुसरें तुम्ही अजून मला पट्टाही करून दिला नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत ठरल्या प्रमाणें पट्टेखत करून द्यावें. माझे ऐकण्यास असें आले आहे कीं तुमचे दीर लक्ष्मणराव हें माझे जवळीलचा ताबा जबरदस्तीनें घेणार आहेत. तरी तुम्ही मला पट्टेखत करून नोंदून न दिल्यामुळें माझे जे नुकसान होईल त्याबद्दल मी कोर्टांत दावा करीन व सर्व नुकसान भरून घेईल कळावें ता० १२।६।१२ इ० मुक्काम आकोला.

सही

भगवान वलद राघोजी फुलमाळी रा० जामठी.

नो० नं० ३१६

## नोटीस

नोटीस वेशमी येसोदी मर्द तुकाराम टाक कुणबी रा० इटकी ता० दर्यापूर जि० उमरावती इस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा भाऊ नामे संपत हा मरण पावल्यास अजमास १॥ महिना झाला व त्याचे दिवसाचे कार्यही मी केले. व त्याला एक अज्ञान मुलगा आहे. व तूं त्याची वडील बहीण अहेस तूं त्या अज्ञान मुलास समजत नसल्यामुळें तूं त्याची सर्व इस्टेट व कागदपत्र, नगदी रुपये घेऊन गेली ती येणेप्रमाणें—

रोख नगदी रुपये दोनशें २०० सोन्याची मुर्दी १ तोळे २ नग १ वजन तोळे १॥ व एक गाय व दोन दस्ता ऐवज असे तूं आपले नवऱ्याचे घरीं त्या मुलासह घेऊन गेली. त्या अज्ञान मुलाचा पालन कर्ता मी आहे तुला अधिकार कांहीं नाहीं. करितां या नोटीशीनें कळवितो कीं ही नोटीस पावले पासून आठ दिवसाचे आंत तूं सर्व नेलेली इस्टेट पंचासमक्ष सावकाराचे घरीं किंवा पंचाजवळ मुलगा सज्ञान होईपर्यंत त्याचे जवळ ठेवावी. व वर लिहिलेल्या इस्टेटीची तूं अफरातफर करूं नये. केल्यास दिवाणी दावा करून नोटीशीचे खर्चसुद्धां रक्कम भरून घेतली जाईल. कळावें ता. १३-६-१२ इ.

सही

वळीराम वा लक्ष्मणजी भोंगे पुंड द० खु.

नो० नं० ३४७

## नोटीस

खालीं सही करणार इजकडून ... वलद चहादाजी जात कुणबी ... लवाड रा० देवरी पोष्ट पळ... आकोट जि० आकोला यांस ...ण्यांत येतें कीं तुम्ही ... करून आकोट मुक्कामीं ... पांच रुपयाच्या स्टांपावर ता० ७-... इ. रोजीं कुलमुखत्यारपत्र लिहून नोंदून घेतलें. तें ता. १४-६-१२ इ. रोजींपासून रद्द केलें आहे. यापुढें जो तुम्ही शेट सावकार व इतर लोक यांच्याशीं व्यवहार कराल तो रद्द आहे असें समजावें. जर तुम्ही माझे इस्टेटीची अफरातफर कराल तर तुम्हाला जबाबदार धरून तुमची व्यवस्था कोर्टांकडून केली जाईल. कळावें ता.१४-६-१९१२

सही

तुळसाई मर्द माधोजी कणबी अडनाव हेबरडे रा० देवरी ता० आकोट जि० आकोला नि० खु० हातची बायडी असे.

नो० नं० ३४८

## नोटीस

नोटीस बेशमी खेतसीदास जगन्नाथ मारवाडी रा० जामठी बु॥ ता० मुर्तिजापूर यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा भाऊ नामें सुर्यभान हा तुमचेवरीं ६६ रुपये सालाप्रमाणें ठेविला व त्याचे सालखतही आपण करून घेतले आहे. त्यानें सगरी तुमचे घरीं ८॥ महिनें काम केलें त्याउपर आपले बैलाचे शिंग मोडल्यामुळें आपण त्यावर आळ घालून त्याला मारले व कामावरून काढलें दोनचार वेळ आह्मी तुमचे घरीं राहिलेलें ३॥ महिन्याचें पैसे घ्यावें नाहींतर दुसरा मनुष्य किंवा मला स्वत: कामावर बदली घ्यावा असें सांगण्यास आलो होतो. परंतु आपण सांगितले दस्तऐवजांत लिहिल्या प्रमाणें सहा आणे रोजाप्रमाणें पैसे घेईन. तर आमची इतके पैसे देण्याची शक्ती नाहीं. आह्मी पडीत दिवस भरण्यास तयार आहो. किंवा ६६ रुपये सालाप्रमाणें पडित दिवसांचे पैसे घ्यावे असें ह्मटले असतांही आपण ती गोष्ट नाकारली वरून तुह्मांस नोटीशीनें कळवितो कीं मी पैसे देण्यास तयार आहे, व पडींत दिवस भरण्यास तयार आहे. करितां नोटीस पावल्यापासून आपण आठ दिवसांचे आंत रुपये घेऊन जाऊन पावती द्यावी अगर कामावर घ्यावें. इतक्याउपर आपण तसें न केल्यास माझेवर व माझे भावावर पैशाबद्दल दावा वगैरे केल्यास कोर्टखर्च वगैरे देणार नाहीं. व आपल्या जवळून माझे नोटीशीचा खर्च भरून घेतला जाईल कळावें ता० १६।६।१२

सही

जयराम वा॥ गणू कुणबी रा० जामठी ता० मुर्तिजापूर नि० आंगठा.

नो० नं० ३३५

## नोटीस

नोटीस बेशमी सदु वलद भदु जात तेली राहणार व्याळा ता० बाळापूर नि० आकोला यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून आपण मला फक्त एक वेळ नांदविण्यास नेऊन मला फार छळून त्रास दिला. आपण संसार करण्यास योग्य नसून मला पातीव्रत्यापासून भ्रष्ट करूं पाहिल्यावरून मी माझे आईबापास मला नेण्याकरितां निरोप पाठविला त्यावरून माझा बाप पंच समागमे घेऊन व्याळे मुक्कामीं आला व मला घेऊन गेला त्या गोष्टीस आज सरासरी ४ वर्षे झालीं त्या अवधींत आपण मला खाण्यास मुळीच दिलें नाहीं. वरून मी सावकाराचें कर्ज रुपये १९० काढून आजपर्यंत मी आपला उदरनिर्वाह केला. आतां मला कोणीही कर्ज देत नाहीं ह्मणून मी आपल्यास या नोटीशीनें कळवितें कीं ही नोटीस पावतांच आठ दिवसांत सावकाराचे झालेले कर्ज रुपये १९० व्याजासह देऊन पुढच्या माझ्या खाण्यापिण्याची सोय करावी. न केल्यास मी रुपयाबद्दल कोर्टात फिर्याद करून पैसे वसूल केले जातील व मी दुसरा घरठाव करीन मग आपला मजवर कोणतेही प्रकारचा नवरेपणाचा हक्क रहाणार नाहीं कळावें. ता० १९-६-१९१२ इ०

सही

तुळसी मर्द सदू तेलीन नि० आंगठा.
तर्फे नारायण वा॥ नरसाजी तेली नि० आंगठा.

नो० नं० ३३६

## नोटीस

नोटीस बाऱ्हळी मर्द गोविंदा कोकाटे हल्ली रहणार पिंपरी डीककाराची ता० आकोट हिलः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तूं हस्तलिखीत नोटीस तारीख २० माहे एप्रिल रोजीं दिली ती पावली मजकूर समजला तूं आपलें नोटीशींत लिहिलें कीं "तुह्मी संसारास योग्य असल्याबद्दल सिव्हिलसर्जन साहेबांचे सर्टिफीकीट आणावे मी नांदण्यास तयार आहे" त्याप्रमाणें मी असि० सर्जन साहेब लिमये यांचे कडेस परिक्षा देऊन सर्टिफिकीट मिळविले आहे त्याचे मराठी भाषांतराचा उतारा तुझे समजुतीकरितां देतो तो खालीं लिहिलें प्रमाणें:—

"गोविंदा वल्लद उदेभान यांस मी तपासले आहे त्यावरून तो संसारास योग्य आहे असें मी त्यास सर्टिफीकीट दिलें आहे ता० १० माहे ६ सन १९१२ सही व्ही पी लिमये अ० सर्जन आकोला" येणें प्रमाणें सर्टिफिकीट आहे सबब तुला कळवावयाचे कीं नोटीस पावल्यापासून चार दिवसांचे आंत तुझे कोणी खात्रीचा लिहिणार आणून मजजवळ असलेले असल सर्टिफिकीट पाहून खात्री करून घेऊन माझे घरीं दागीन्यासह नांदण्यास यावे मी तुला वागविण्यास तयार आहे जर तूं न येशील तर मला कोर्ट मार्फत तुला ताब्यांत घ्यावे लागेल व तो सर्व खर्च तुझे बापाजवळून भरून घेतला जाईल. मी पहिले पासून तुला वागवीत असता तुझे बापानें तुला नेऊन तुजकडून मला नोटीस वगैरे देऊन त्याचे उत्तरा करितां खर्ची केलें त्यामुळें मला २५ पंचवीस रुपये खर्च आला आहे तो मी तुझे बापाजवळून घेईन तूं लिहिलेस कीं माझे खावटीबद्दलचे रुपये यावे पण मी तुला कांहीं वरांतून हाकून लावले नाहीं तूंच आपले बापाचे मनानें माहेरी राहिलीस सबब खावटी खर्च मी देणार नाहीं कळावें ता० १४-६-१२ इ.

सही

गोविंदा वल्लद उदेभान कोकाटे रा० कडतवाडी ता० आकोट नि० रेघ

नो. नं. ३३७

## नोटीस

नोटीस बेशमी सिदु वा॥ सुर्यभान पाटील रा० येवलखेड ता० व जि० आकोला यांसः

नोटीस देणार जानकीदास मेघणीराम नोटीस देतो कीं तुमची ता० १०-६-१२

ची नोटीस पावली नोटीशींत लिहिलेला तमाम मजकूर खोटा आहे. ६० रुपये भरण्यापैकीं मुळींच राहिले नाहींत त्याच प्रमाणे ४ वर्षाचा करार केलेला नसून ६ महिन्याचाच करार तुह्मी केला होता. माझे दुकानावर तुह्मी ता० ९-६-१२ रोजीं फक्त हिशोब पुसण्याकरितां आला होता बरोबर रुपये वगैरे तुह्मी कांहींच आणिले नव्हते. दुकानावर रोकड्या नसून किल्या त्याचे जवळ आहेत सबब १५ मिनिटे बसा ह्मणुन मी तुह्मास सांगितलें व तुह्मांस हिशोब सांगतो. आपण उठून चालता झालात व ही खोटी नोटीस तुह्मी दिली आहे. आजपर्यंतचें व्याजाचे रुपये निघतात ते व मुद्दल तुह्मी वाटेल तेवेळीं आमचे दुकानावर आणून द्यावे व आपला दस्तऐवज माघारा घेऊन जावा तसें न केल्यास कायद्याप्रमाणे आह्मी फिर्याद करून तोपर्यंत व्याजासह व या नोटीशीचे खर्चासह रुपये वसुल करून घेऊं कळावें ता० १८-६-१२ इ.

सही

जानकीदास मंगणीराम द० मु०

नो. नं. ३३८

---

## नोटिशीचें उत्तर

चिरंजिव राजश्री मारोतीगीर गुरु घोंडगार गोसावी रा० हल्लीं येवदे तालुका दर्यापूर जिल्हा उमरावती

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा प्रत्यक्ष पुतण्या असून मजला थाप देऊन तूं मुर्तीजापूर येथें [ वर्ग मुबदल्याचे प्रकर्णांत जबाब देण्याचे निमित्तानें घेऊन जाऊन ] दगलबाजीनें व मला दहशत घालून मजपासून माझे घराचा हक्क माझे मरणा नंतर तुला प्राप्त व्हावा अशा मतलबाचा एक रुपयाचे स्टांपावर मजपासून कररनाना तारीख २१-५-१२ रोजीं लिहून घेतला आहेस. या बाबतींत तुजवर फौजदारी काम चालवावें परंतु तूं पुतण्या असलेमुळें मला तसें करणें इष्ट दिसत नाहीं. सबब या नोटीशीनें कळाविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत तूं दगलबाजीनें लिहून घेतलेला करारनामा परत आणून द्यावा व तसें न केल्यास सदर्हू करारनामा रद्द आहे असें समजावें कळावें तारीख १९ माहे जून सन १९१२ इ.

सही

लुंगशी मर्द शंकरगीर गोसावी

रा. सांगव तालुके मुर्तीजापूर नि० खु० बांगडी

नो. नं. ३३९

---

## नोटीस

नोटीस बेशमी नामु वा सुर्यभान कुणबी टुमाळे रा० भवार पोष्ट तामगांव ता० जळगांव जि० बुलडाणा

यांस:—

मी खालीं सही करणार कळविते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज बारा महिने झाले माझे आईबापाचें घरीं आपण डागीने काढून घऊन आणून घातलें व दोन तीन वेळां निरोप पाठविला तरी नेण्यास आलें नाहीं मी कर्ज काढून उदरनिर्वाह केला त्याचे रु० १०० शंभर झाले ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सावकाराचे रुपये देऊन मला घेऊन जाणे असें न केल्यास तुमचा नवरेपणाचा संबंध राहणार नाहीं मी हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन कळावें ता० १८-६-१२ इ०

सही

तानी मर्द नामु कुणबी रा०

भवार हल्लीं कळमखेड पोष्ट

तामगांव ता० जळगांव

जि० बुलडाणा निशाणी

नो. नं. ३४० हातची बांगडी असे

---

## नोटीस

नोटीस बेशमी तेताराम वा सखाराम हजाम रा० मोटकुन्ह पोष्ट कुन्ह ता० मलकापूर जि० बुलडाणे

यांस:—

मी खालीं सही करणार कळविते कीं मी तुह्मी लग्नाची बायको आहे. व च्यार वर्षें झाले तुह्मी मला नेले नाहीं मी सावकाराचे कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे त्याचे रुपये २०० दोनशे झाले तुह्मांस दोन वेळां निरोप पाठविला तुह्मी आले नाहीं तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सावकाराचे रुपये आणून मला घेऊन जाणे असे न केल्यास तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं मी हीच फारकतो समजून दुसरा घरठाव करीन कळावें ता० १८-६-१२ इ.

सही

राधी मर्द तेताराम हजाम

रा० मोट हल्लीं कळमखेड

पो० तामगांव ता० जळगांव जि० बुलडाणा,

नो. नं. ३४१ नि० बांगडी असे

---

## नोटीस

रा० जयराम वल्लद तुकाराम फंगाळ रा० मौजे पाथर प्र० लोणार ता० मेहकर जि० बुलडाणें यासी नोटीस देणार रंगु मर्द दगडु जाट आ० पा० बाप तोलाजी वल्लद बाळाजी जाट रा० मौजे टीवटीकी प्र० लोणार ता० मेहकर जि० बुलडाणें नोटीस देतो कीं तुह्मांस आह्मांन तर्फे कुलमुखत्यार पत्र दिलें असून तिचें जिनगीची तुह्मी अफरा तफर करीत आहा करितां तुमचे मुखत्यारपत्र आज तारखे पासून रद्द केलें आहे तरी तुह्मी तिच्या तर्फे कोणतेही काम करूं नये केल्यास तें बातल असें व तो व्यवहार उपयोगी होणार नाहीं. व त्याजबद्दल जबाबदार आह्मी होणार नाहीं. कळावें ता० १८-६-१२

सही.

रंगु मर्द दगडु आ० पा० बा०

तोलाजी वा बाळाजी दस्तुर खुद

नो० नं० ३४२

---